


# परभणीत

## पोलिसांकडून निर्बंध आणि

## अमानुष अत्याचार

परभणी पोलिसांच्या क्रूर, बेकायदेशीर आणि घटनाविरोधी वर्तनाचा पर्दाफाश करणारा सत्यशोधन समितीचा अहवाल (10-15 डिसेंबर 2024)

**दत्ता सोपान पवार, पोलिस, प्रशासन आणि राज्य सरकार या सर्वांनी राज्यघटनेला बट्टा लावला आहे!**

# अहवाल निर्देशांक


| सामग्री | पृष्ठ क्र. |
|---|---|
| **परभणी हिंसाचार घटनेच्या सत्यशोधनाची पार्श्वभूमी** | **5** |
| **पार्श्वभूमी** | **7** |
| **स्वतंत्र प्रसारमाध्यमातून प्रसिद्ध झालेली सोपान पवारची माहिती** | **9** |
| **सत्यशोधन समितीच्या तपासावर आधारित घटनाक्रम** | **17** |
| **शोधमोहिमेदरम्यान पोलिसांच्या हिंसाचाराचा सामना करावा लागलेल्या दलित समुदायातील व्यक्तींचे अनुभव (सत्यशोधन समितीने घेतलेल्या मुलाखती आणि माध्यमातून प्रसिद्ध बातम्यांच्या आधारे)** | **22** |
| **निष्काळजीपणा की हातमिळवणी?** | **28** |
| **कोणती पावले उचलायला पाहिजे होती** | **30** |
| **प्राथमिक निष्कर्ष** | **31** |
| **परभणी हिंसाचारामुळे पीडित व्यक्तींनी केलेल्या वैयक्तिक तक्रारी** | **33** |
| **वैयक्तिक तक्रारींचा गोषवारा** | **34** |
| **हिंसाचाराचे मूळ कारण - एफआयआरमध्ये कशाचा समावेश केला गेलेला नाही** 37 | **37** |
| **कायदा आणि पोलीस मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन** | **40** |
| **शोधमोहीम आणि जमाव पांगवण्यासाठी पोलीस नियमावली व कायदे** | **44** |
| **आठ एफआयआरचा एकत्रित गोषवारा आणि विश्लेषण** | **46** |
| **परिशिष्टे:**<br><br>Annexure 1: Copy of Post Mortem/Forensic Report<br>Annexure 2: Final Post Mortem Report (Divya Marathi dtd 22-1-2025)<br>Annexure 3 : List of FIRs lodged by Police between December 11-13, 2024<br>Annexure 4: List of Private Complaints Filed by Victim survivors between December 19-24, 2024<br>Annexure 5: Links to media reports and videos | <br><br>**51**<br>**52**<br>**53**<br>**76**<br><br>**96** |

# परभणीत

# पोलिसांकडून निर्बंध
# आणि अमानुष अत्याचार

परभणी पोलिसांच्या क्रूर, बेकायदेशीर आणि घटनाविरोधी वर्तनाचा पर्दाफाश करणारा सत्यशोधन समितीचा अहवाल (10-15 डिसेंबर 2024)

**दत्ता सोपान पवार, पोलिस, प्रशासन आणि राज्य सरकार या सर्वांनी राज्यघटनेला बट्टा लावला आहे!**

**Cover Artwork by Sunil Abhiman Awchar**

# परभणी हिंसाचार घटनेच्या सत्यशोधनाची पार्श्वभूमी



10 डिसेंबर 2024 रोजी संविधानाच्या प्रतिकृतीच्या विटंबनेच्या घटनेनंतर काही दिवसांतच सत्यशोधन समितीचे गठन करण्यात आले. शोध मोहिमेदरम्यान परभणी पोलिसांनी निष्पाप नागरिकांवर केलेला हिंसाचार आणि 35 वर्षीय सोमनाथ वेंकट सूर्यवंशीचा कोठडीतील मृत्यू या घटनांचा तपास करण्याच्या हेतूने ही समिती तयार केली. समिती सदस्यांमध्ये ॲड. अभय टाकसाळ (सीपीआय), ॲड. पवन जोंधळे, सुधीर सालवे, कॉ. विकास गायकवाड, कॉ. प्रीतम घागवे आणि राहुल प्रधान यांचा समावेश होता. वरिष्ठ मानवाधिकार कार्यकर्त्या व सिटिझन्स फॉर जस्टिस अँड पीसच्या सचिव तिस्ता सेटलवाड आणि वरिष्ठ पत्रकार व कवी राजू परुळेकर यांनी मार्गदर्शन केले.

समितीतील काही सदस्य परभणीत दोन दिवस होते, तर बाकी सदस्य एक आठवडा होते आणि एक सदस्य स्थानिक रहिवासी आहेत. परभणीतील वास्तव्यात समितीने विविध लोकांशी बातचीत केली. त्यानंतर पोलिसांनी नोंदवलेल्या एफआयआर आणि पोलिस अत्याचाराच्या पीडितांकडून दाखल झालेल्या खाजगी तक्रारी गोळा करून त्यांचे विश्लेषण केले. पोलिसी हिंसेचा बळी ठरलेला शहीद सोमनाथ सूर्यवंशीची आई विजयाबाई सूर्यवंशी आणि त्यांचे दोन भाऊ अविनाश व प्रेमनाथ यांची समितीने भेट घेतली. भीमनगर, प्रियदर्शिनी नगर आणि सारंगनगर येथील शोध मोहिमेतील अन्य पीडितांचीही भेट घेऊन त्यांची सविस्तर निवेदने नोंदवली. स्वतंत्र पत्रकार शर्मिष्ठा भोसले यांनी घटनास्थळी असताना पोलीस महानिरीक्षक शिवाजी उमप यांची भेट व

मुलाखत घेतली आणि त्याचा आधार व संदर्भ सत्यशोधन समितीने घेतला आहे. तसेच इतर पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांचीही भेट घेतली.

या सर्व माहिती व विश्लेषणावर आधारित सदर सत्यशोधन समिती अहवाल तयार केला आहे.



*The Fact-Finding Team*

# पार्श्वभूमी




**1.** 10 डिसेंबर 2024 या दिवशी परभणीमध्ये सकल हिंदू समाज एकता मोर्चाला परवानगी मिळाली होती. जरी पूर्वानुभव होता की अशा कार्यक्रमातून समाजातील दबलेले समुदाय, अल्पसंख्य यांना लक्ष्य केले जाते, त्यांच्याविरुद्ध द्वेषपूर्ण भाषणे केली जातात आणि सामाजिक तणाव वाढतो, तरी ही परवानगी देण्यात आली होती. या दिवशी शहरात संरक्षणासाठी पुरेसे पोलिस बळही तैनात नव्हते. माननीय सर्वोच्च न्यायालयाने अलिकडेच दिलेल्या निर्देशांनुसार अशा कार्यक्रमांच्या वेळी पोलिसांनी प्रतिबंधक उपाययोजना केल्या पाहिजेत, भाषणांचे व्हिडिओ रेकॉर्डींग केले पाहिजे आणि पुरेसा पोलिस बंदोबस्त असला पाहिजे. तसेच, भाषणातून सामाजिक द्वेष पसरवणारी वक्तव्ये केली असतील तर एफआयआर दाखल केले पाहिजेत. अशी खबरदारी घेतली होती का याची चौकशी सत्यशोधन समितीने केली असता पुरेशा प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या नव्हत्या असे लक्षात आले.

**टीप: सत्यशोधन समितीला उपलब्ध झालेल्या माहितीनुसार गुन्हेगारी कायद्याच्या संबंधित कलमांखाली कोणतेही गुन्हे नोंदवलेले नाहीत. [कलम 196, भान्यासं, म्हणजेच आधीच्या भादंवितील कलम 153 (a) आणि (b)]. सर्वोच्च न्यायालयानाच्या निर्देशांचे पालनही झाले नव्हते**

**व त्यात सुचवलेल्या प्रतिबंधक उपाययोजना, जसे भाषणांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे, गुन्हेगारांविरुद्ध कारवाई इत्यादी.**

2. दत्ता सोपान पवार नावाच्या व्यक्तीने कथितरित्या परभणी शहराच्या प्रवेशस्थानी असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासमोरील राज्यघटनेच्या प्रतिकृतीची विटंबना केल्याचे सत्यशोधन समितीला सांगण्यात आले.

या व्यक्तीबद्दल वारंवार चौकशी करूनही अधिकाऱ्यांनी समितीला कोणतेही तपशील देण्याचे टाळले.



## स्वतंत्र प्रसारमाध्यमातून प्रसिद्ध झालेली सोपान पवारची माहिती



स्वतंत्र प्रसारमाध्यमांमध्ये ज्या बातम्या आल्या आहेत त्यानुसार राज्यघटना प्रतिकृतीची विटंबना करणारा सोपान पवार याची “मानसिक स्थिती अस्थिर” त्याच्या अटकेनंतर काही तासात जाहीर करण्यात आले. ‘दि वायर’ मध्ये प्रसिद्ध झालेले पोलिसांचे म्हणणे आहे की सोपान पवार हा धनगर समाजाचा होता. “आपल्या कृतीचे परिणाम काय होतील हे न समजून” त्याने हे कृत्य केले. १० डिसेंबरला पवारची अटक झाल्यानंतर अवघ्या काही तासात, तपासाची जबाबदारी सांभाळणारे नांदेडचे विशेष पोलिस निरीक्षक अधिकारी शिवाजी उमप यांनी पवार “माथेफीरू” असल्याचे जाहीर केले. त्यांचे हे निदान कोणत्या पुराव्यावर आधारित आहे, पवारच्या मानसिक स्थितीची वैद्यकीय तपासणी झाली का, याचे स्पष्टीकरण त्यांनी दिले नाही.

**संदर्भ:** https://thewire.in/caste/parbhani-violence-police-accused-of-beating-up-dalit-youth-carrying-out-combing-operations

सबरंगइंडिया नियतकालिकात 24 डिसेंबर 2024 ला शर्मिष्ठा भोसलेंचा लेख प्रकाशित झाला आहे, त्यात लेखिकेने नमूद केले आहे की “दत्ता सोपान पवार सध्या अज्ञात ठिकाणी तुरुंगात आहे, अशी माहिती परभणीचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक यशवंत काळे यांनी दिली आहे.”

**स्रोत:** https://sabrangindia.in/special-report-they-came-like-monkeys-they-came-like-nazis-ambedkari-bastis-in-parbhani-face-the-traumas-of-police-brutality/

3. घटनेच्या प्रत्यक्षदर्शींनी सत्यशोधन समितीला दिलेल्या माहितीनुसार, राज्यघटना प्रतिकृतीची विटंबना घडल्यानंतर पोलिसांकडून दिरंगाई झाली. वाढता सामाजिक तणाव नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी ठाम पाऊले उचलली नाहीत आणि गुंडगिरी, लूट करणाऱ्या जमावाला अटकाव केला नाही. पोलीसांनीच वाहनांची आणि दुकानांची तोडफोड होऊ दिली. नंतर त्याचा वापर शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या नागरिकांना लक्ष्य करण्यासाठी केला. प्रत्यक्षदर्शींनी असेही सांगितले की, "पोलिसांनी ज्याप्रकारे शोध मोहीम राबवली, लोकांच्या घरात घुसून अनधिकृतपणे आणि विनाकारण त्यांना मारहाण केली, महिलांनाही मारहाण केली आणि नंतर त्यांना पोलीस ठाण्यात डांबून ठेवले. यावरून दलित वस्त्यांतल्या लोकांची अमानवी रितीने छळवणूक करण्याचा पूर्वनियोजित कट असल्यासारखे वाटत होते."



*The Fact-Finding Team*

4. घटनेच्या प्रत्यक्षदर्शींनी सत्यशोधन समितीला दिलेल्या माहितीनुसार, राज्यघटना प्रतिकृतीची विटंबना घडल्यानंतर पोलिसांकडून दिरंगाई झाली. वाढता सामाजिक तणाव नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी ठाम पाऊले उचलली नाहीत आणि गुंडगिरी, लूट करणाऱ्या जमावाला अटकाव केला नाही. पोलीसांनीच वाहनांची आणि दुकानांची तोडफोड होऊ दिली. नंतर त्याचा वापर शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या नागरिकांना लक्ष्य करण्यासाठी केला. प्रत्यक्षदर्शींनी असेही सांगितले की, "पोलिसांनी ज्याप्रकारे शोध मोहीम राबवली, लोकांच्या घरात घुसून अनधिकृतपणे आणि विनाकारण त्यांना मारहाण केली, महिलांनाही मारहाण केली आणि नंतर त्यांना पोलीस ठाण्यात डांबून ठेवले. यावरून दलित वस्त्यांतल्या लोकांची अमानवी रितीने छळवणूक करण्याचा पूर्वनियोजित कट असल्यासारखे वाटत होते."

5. बेकायदेशीरपणे आणि अमानुषरित्या चालवलेली शोधमोहीम, लोकांना तुरुंगात डांबणे या पोलिसी बडग्याचे पर्यवसान एका गंभीर घटनेमध्ये झाले. ती घटना म्हणजे उच्चशिक्षित आणि कायद्याचा विद्यार्थी असलेल्या ३५ वर्षीय सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू - पोलिस कोठडीतील तीव्र मारहाणीमुळे न्यायालयीन कोठडीत नेल्यानंतर लगेचच त्याचा मृत्यू झाला. याखेरीज कित्येक महिला, अल्पवयीन आणि अन्य नागरिकांना पोलिसांच्या मारहाणीचे लक्ष्य ठरले, हेही गंभीर आहे.

१५ डिसेंबर २०२४ ला सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू झाला. पोस्ट मॉर्टेमच्या प्राथमिक अहवालामध्ये “अनेक दुखापतींमुळे बसलेल्या धक्क्यामुळे” मृत्यू झाल्याचे निदान नोंदवले आहे. सोमनाथची आई विजयाबाई सूर्यवंशींनी दंडाधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदवली आहे. (भान्यासं कलम 183, पूर्वीच्या भादंविचे कलम 164). त्यांचे निवेदन प्रथम श्रेणी दंडाधिकाऱ्यांसमोर नोंदवण्यात आले असले आणि त्यात सोमनाथ सूर्यवंशीला पोलिस कोठडीत मारहाण करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्याचे नाव सांगितले असले तरीही या अधिकाऱ्याविरुद्ध अद्याप केस दाखल झालेली नाही. शोधमाहीमे दरम्यान आणि पोलिस कोठडीत असताना पोलिसांडून झालेल्या अमानुष मारहाणीच्या विरुद्ध १२ जणांनी तक्रार दाखल केली असून, त्यांनी रजिस्टर पोस्टाने आपल्या तक्रारी पोलिसांना पाठवल्या आहेत. त्यांचे एफआयआर अद्याप नोंदवले गेलेले नाहीत. उलट, महाराष्ट्राचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केलेले वक्तव्य आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आई विजयाबाई सूर्यवंशी यांनी त्यांना दिलेले प्रत्युत्तर यामध्ये विरोधाभास आहे. आपल्या मुलाचा कोठडीतील मारहाणीमुळे झालेल्या मृत्यूविषयी विजयाबाईंनी अत्यंत ठाम भूमिका घेतली आहे. त्यांनी मुख्यमंत्र्यांचे विधान फेटाळले आहे आणि मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेली १० लाख रुपयांची नुकसानभरपाई स्वीकारण्यास नकार दिला आहे. दोषी पोलीस अधिकाऱ्यांना जन्मठेपेची शिक्षा दिली जावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.



*Somnath Suryavanshi*

[1] Contrary to the findings in the preliminary post-mortem report, Maharashtra chief minister Devendra Fadnavis on December 20, 2924 claimed that 35-year-old law student Somnath Vyankat Suryawanshi died because of his “underlying health condition” and not due to custodial torture. The provisional post-mortem report had attributed the cause of death to “shock following multiple injuries”. https://thewire.in/rights/parbhani-violence-fadnavis-says-law-student-died-due-to-health-condition-not-police-torture/?mid_related_new

6. रविवार, 15 डिसेंबर 2024, सकाळी ९ वाजता, पोलिसांनी विजयाबाईंना सोमनाथ हार्ट ॲटॅकनं गेल्याचं कळवलं. त्याला मारहाण झाली आहे हे पोस्ट मॉर्टेममधून सूचित होतंय. पण श्वसनाच्या आजारानं त्याचा मृत्यू झाल्याचं मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत सांगितलं. विजयाबाई सांगतात की, अटक होण्यापूर्वी सोमनाथची प्रकृती व्यवस्थित होती. त्याला श्वसनाचा त्रास, अस्थमा किंवा बाकी कसला त्रास होत नव्हता. पोलिसांच्या मारहाणीमुळे तो गेला, हेच त्यांचं म्हणणं आहे. यावरून, सरकार सोमनाथच्या मारेकऱ्यांना पाठिशी तर घालत नाहीये अशी शंका घेण्यास वाव आहे.

7. सत्यशोधन समितीने ज्या मुलाखती घेतल्या त्यातून मिळालेल्या माहितीनुसार, मृत सोमनाथचे शव परभणीला आणू नये, याकरिता जालना पोलिस अधिक्षकांनी सोमनाथची आई विजयाबाईंवर दबाव आणला. "परभणीत ७० हजार लोक जमलेत, तिथं दंगल उसळली तर तुमची जबाबदारी राहील," असं त्यांनी विजयाबाईंना सांगितल्याचं छापून आलंय. त्यावर विजयाबाईंनी म्हणाल्या, "माझा मुलगा पाच दिवस तुमच्या पोलिस कोठडीत होता. त्याचं शव तुम्ही मला देता आणि त्याच्या मृत्यूची जबाबदारी मात्र घेत नाही, पण त्या ७०,००० जणांची जबाबदारी मला घ्यायला सांगताय? मला जाऊ देणार की मीपण इथंच प्राण सोडू." विजयाबाई सूर्यवंशींनी अशी ठाम भूमिका घेतल्यावर त्यांना परभणीला जाऊ दिलं. त्यानंतर सोमनाथ सूर्यवंशीवर शांततापूर्ण वातावरणात अंतिम संस्कार झाले.



*Vijay Wakode*

8. परभणीत या काळात शांततापूर्ण वातावरण राखण्यात लोकनेते विजय वाकोडेंनी मोठी भूमिका निभावली. सोमनाथच्या अंत्यसंस्कारानंतर हार्ट ॲटॅकने वाकोडेंचा मृत्यू झाला असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. अशा प्रकारे सोमनाथ सूर्यवंशी, विजय वाकोडे, पोलिसांच्या शोधमोहीमेत लक्ष्य ठरलेले आणि कोठडीतील मारहाण सहन केलेले निष्पाप रहिवासी परभणीतील अत्याचारी आणि क्रूर पोलीस आणि प्रशासनाच्या कारवाईचे बळी ठरले आहेत.

पोलिसी अत्याचाराने वस्तीतील अनेक महिला, पुरुष, तरूण आणि लहान मुलांवर जबर मानसिक आघात झाला आहे.

**9.** सत्यशोधन समितीने भीमनगर, प्रियदर्शिनी नगर आणि सारंग नगर येथील पुढील रहिवासींसोबत मिटींग घेतली आणि त्यांच्या मुलाखती रेकॉर्ड केल्या: सुधाकर सखाराम जाधव, विशाल गायकवाड, राधाबाई सोनवणे, वैभव काकडे, पूजा जाधव, उन्नती जोंधळे, उद्धव वायाळ, शिवाजी थोरात, बबिता राजू सावंत, राजू माकसरे हे आहेत. आपल्याला अपमानित वाटलं, दु:ख झालं असं त्यांनी सांगितलं. त्यांनी विचारलं की, "पोलीस आणि एसआरपींनी इतक्या अमानुष क्रूर पद्धतीनं वागायची काय गरज होती? आम्ही दहशतवादी असल्यासारखं ते आमच्यावर तुटून पडले. घराच्या दारं, खिडक्या तोडून टाकल्या. बाथरूम आणि संडासची दारं तोडली! पुरुष पोलिसांनी महिलांना अमानुषपणे मारलं, वयस्कर लोकांनाही सोडलं नाही. जातीवाचक शिवीगाळ केली आणि 'XXX त्यांची लायकीच ती आहे' म्हणून हिणवलं. काठ्यांनी मारलं आणि लाथांनी तुडवलं. त्यांनी बुटाचे पायांनी लोकांची डोकी चिरडली, रक्तबंबाळ होईपर्यंत. लोकांची डोकी फोडली आणि हाता-पायांना फ्रॅक्चर होईपर्यंत मारलं. हे सगळं शोधमोहिमेच्या दरम्यान झालं. नंतर, पोलिस चौकीमध्ये हातावर आणि पायांच्या तळव्यांवर बेल्टनं मारलं. त्या मारहाणीच्या खुणा शरीरावर दिसणार नाहीत अशा रितीने मारहाण आणि छळ केला. त्यांनी, विशेष करून सुंद्रीने सांगितलं (सत्यशोधन समितीला दिलेल्या माहितीनुसार), लोकांना जमिनीवर उड्या मारायला भाग पाडले, आपलेच तळवे भिंतीवर आपटायला भाग पाडले. इतकी जबर मारहाण करूनही थांबले नाहीत. "आणखी पाहिजे का..." असं उपरोधिकपणे विचारत राहिले. माया पंडित ही ओली बाळंतीण, तिचं बाळ सव्वा महिन्याचं आहे. तिच्या घराचं आणि बाथरूमचं पोलिसांनी तोडलं. आणि घरात शिरून बाळासमोरच तिला जबरी मारहाण केली.



आंबेडकरवादी युवक वैभव काकडेनं खरं तर तथाकथित हिंसक जमावापासून एका पोलिसाची सुटका केली, पण बदल्यात त्याला काय मिळालं? वैभवनं दुचाकीवरून जात एका व्यक्तीच्या सोबत जाऊन त्याला वाचवलं. पण पोलिसांनी त्याला काठ्यांनी मारलं. त्याचा पाय फ्रॅक्चर झाला.

पूजा जाधव आणि तिच्या सोबत १८ पेक्षा कमी वयाच्या आणखी काही मुली, सर्वांना पोलिस चौकीत रितसर अटक न करता डांबून ठेवलं. तिथे त्यांना रात्री उशीरापर्यंत डांबून पोलिसांनी बेल्ट आणि काठ्यांनी मारहाण केली. त्यांना अपमानित करत लैंगिक अत्याचाराच्या हेतूने पुरुष पोलीस त्यांच्या मांड्यावर उभे राहिले, असं सुंद्रीनं सांगितलं.

पोलिसांच्या क्रूर अत्याचाराचा सामना केलेल्या या सर्वांनी त्यांचे अनुभव तपशीलवारपणे सत्यशोधन समितीला सांगितले आहेत. जातीचा आकस ठेऊन आमच्याशी असं वागायची काय गरज होती पोलिसांना, असा प्रश्न त्यांनी विचारला आहे.



एका प्रत्यक्षदर्शी पत्रकाराने म्हटले की परभणीची घटना म्हणजे प्रशासनाचे ढळढळीत अपयश आहे. राज्यघटनेच्या प्रतिकृतीची विटंबना घडण्याच्या आधी आणि घडल्यानंतरही कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने कोणतीही खबरदारी घेतली गेली नाही किंवा प्रतिबंधक उपाययोजना केल्या नाहीत. प्रत्यक्षदर्शींच्या मते, हिंसक जमावातील एका व्यक्तीने विजय वाकोडेंना मारण्यासाठी त्यांच्या दिशेने रॉड फेकला, पण तो चुकून दुसऱ्या

कोणालातरी लागला. जर हिंसक जमाव दलितांचा असता तर त्यांनी वाकोडेंना का लक्ष्य केलं असतं, असा प्रश्न लोक विचारताहेत.  जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षक आणि पोलिस अधिकाऱ्यांनी १० डिसेंबरच्या घटनेनंतर दलित वस्त्यांना भेट द्यायला पाहिजे होती. शांतता प्रस्थापित करण्यासाठी मिटींगा घेऊन लोकांमध्ये विश्वासाचे वातावरण तयार करायला हवे होते. "पण त्यांनी असे काहीही केले नाही. हिंसक जमावाला त्यांच्या कारवाया करून पांगायला वेळ दिला. त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली नाही. हे चिंताजनक आहे," असे त्यांनी म्हटले.

10. वर नमूद केलेल्या वस्त्यांमध्ये शोधमोहिमेदरम्यान एक व्हिडिओ व्हायरल झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सही रेडीयममध्ये काचेवर असलेली एक रिक्षा पोलीस आणि एसआरपी फोडर आहेत असा तो व्हिडीओ होता. ही नासधूस लोकांना अपमानित करण्याच्या हेतून करत असल्याचे रिक्षा मालकानेही  पाहिले. या रिक्षांच्या मालकांनी - राजू मकसारे, शेख सलिम शेय, उस्मान, शेख मिर्झा शेय, करीम, वंदना भास्कर घोडकी - वरील प्रसंग सत्यशोधन समितीला सविस्तर सांगितला.

11. पोलिस अधिक्षकांच्या बदलीची मागणी करत बंद पुकारला गेला आणि व्यापाऱ्यांना दुकाने बंद ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. नंतर विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी बंद मागे घेण्यासाठी लोकांचे मन वळवले. याची अधिक माहिती घेण्यासाठी व्यापारी संघटनेचे श्री. हाके यांना भेटण्याचा प्रयत्न सत्यशोधन समितीने केला, पण त्यांची भेट होऊ शकली नाही.



**12.** वरील घटनांच्या पार्श्वभूमीवर असे दिसून येते की परभणी घटनेच्या या प्रकरणात दोषी असलेल्या पोलिस अधिकाऱ्यांना राज्य सरकार पाठिशी घालते आहे आणि सत्य दाबून टाकत आहे.

**13.** वरील घटनाक्रम आणि काही पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वर्तनातून तीव्र जातीभेदाची मानसिकता व द्वेषपूर्ण वातावरण असल्याचे स्पष्ट होते.

**14.** 20 जानेवारी 2025 रोजी सत्यशोधन समितीचा अहवाल तयार होऊन वितरित करेपर्यंत, पोलिसी हिंसेविरुद्ध झालेल्या १२ जणांच्या तक्रारी आणि पोलिस कोठडीत मृत्यू पावलेल्या सोमनाथ सूर्यवंशीच्या आईची तक्रार, यापैकी कोणत्याही तक्रारीची एफआयआर नोंद झालेली नाही अथवा त्यांच्या तक्रारीत नावे नमूद असलेल्या पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणतीही कारवाई झालेली नाही.

# सत्यशोधन समितीच्या तपासावर आधारित घटनाक्रम

**डिसेंबर 10, 2024:**
सकल हिंदू समाज मोर्चाची परभणीमध्ये मिटींग

**डिसेंबर 10, 2024:**
भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची दत्ता सोपान पवारकडून विटंबना

**डिसेंबर 10, 2024:**
विटंबनेची घटना घडल्यापासून अवघ्या काही तासांमध्ये दत्ता सोपान पवार "मनोरूग्ण" आणि "माथेफिरू" असल्याचे जाहीर. त्याच दिवशी पवार विरुद्ध एफआयआर दाखल.

**डिसेंबर 11, 2024:**
स्थानिक आंबेडकरी संस्थांनी 'बंद' पुकारला.

**डिसेंबर 11, 2024:**
काही तासांनंतर पोलिसांनी आंबेडकरी वस्त्यांमध्ये शोध मोहीम सुरू केली, मारहाण केली आणि सोमनाथ सूर्यवंशीसह ४० जणांना ताब्यात घेतले.

**डिसेंबर 11, 2024:**
बंदच्या दिवशी साधारण युवक, स्त्रिया व पुरुषांच्या साधारण शंभर जणांच्या जमावाने कथितरित्या जिल्हाधिकार्यालयात घुसून धुमाकूळ घातला. घोषणाबाजी करत तोडफोड केली, दस्तावेज फाडले आणि फर्निचरचे नुकसान केले. तासाभराने आलेल्या पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली आणि कलम १४४ लागू केले.

**डिसेंबर 11- 13, 2024:**
बंद दरम्यान घडलेली जाळपोळ, लूटमार, दंगल आणि इतर गुन्ह्यांसाठी पोलिसांनी एफआयआर दाखल केले. त्या सार्वजनिक ठिकाणी नसलेल्या अनेकांची नावे एफआयआरमध्ये घालून त्यांना दोषी ठरवले आहे.

**डिसेंबर 12, 2024:**
ताब्यात घेतलेल्या लोकांना मॅजिस्ट्रेट समोर नेले. त्यांच्या अंगावर मारहाणीच्या जखमा दिसत होत्या, काहींना रक्त आले होते, सूज आली होती आणि पोलिसी छळाच्या खुणा उघड दिसत होत्या. पण पोलिसांच्या मारहाणीमुळे लोक न्यायाधीशांसमोर बोलायला घाबरत होते. न्यायालयाने दोन दिवसांची पोलिस कस्टडी वाढवून दिली.

**डिसेंबर 14, 2024:**
अटक आरोपींना पुन्हा कोर्टासमोर सादर केले आणि या वेळेपर्यंत अटकेत असलेल्यांची परिस्थिथी आणखी गंभीर झाली होती. त्यांना न्यायालयीन कोठडीत पाठवण्याचे आदेश मॅजिस्ट्रेट कोर्टाने दिले.

**डिसेंबर 14, 2024:**
सोमनाथ सूर्यवंशी आणि इतर आरोपींचे पोलिस कोठडीतून न्यायालयीन कोठडीत हस्तांतरण झाले.

**सकाळी 6:49 वा., डिसेंबर 15, 2024:**
पोलिस कोठडीतून न्यायालयीन कोठडीमध्ये पाठवल्यावर अर्धा दिवस उलटल्यावर सोमनाथ सूर्यवंशीच्या छातीत दुखू लागले आणि त्यानंतर त्याचा मृत्यू झाला.

**सकाळी 9:00 वा., डिसेंबर 15, 2024:**
सोमनाथ सूर्यवंशीची आई विजयाबाईंना त्यांच्या मुलाचा मृत्यू झाल्याची माहिती कळवण्यात आली.

**डिसेंबर 16, 2024:**
पोस्ट मॉर्टमच्या प्राथमिक अहवालामध्ये "अनेक दुखापतींमुळे बसलेल्या धक्क्यामुळे" मृत्यू झाल्याचे निदान नोंदवले आहे.

**डिसेंबर 16, 2024:**
या दिवशी संध्याकाळी मोठ्या जनसमुदायाच्या उपस्थितीत सोमनाथवर अंतिम संस्कार करण्यात आले.

**डिसेंबर 17, 2024:**
आंबेडकरी नेते विजय वाकोडे यांचा हार्ट अॅटॅकमुळे आकस्मिक मृत्यू

**डिसेंबर 18-19, 2024:**
अटक केलेल्या बहुसंख्य जणांची जामीनावर सुटका.

**डिसेंबर 20, 2024:**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमनाथ सूर्यवंशीच्या कुटुंबियांना रू. १० लाखाची मदत जाहीर केली.

**डिसेंबर 19- 27, 2024:**
या कालावधीमध्ये पोलिसांच्या अत्याचाराला बळी पडलेल्या व्यक्तींनी व त्यांच्या नातेवाईकांनी पोलिसांच्या छळाविरुद्ध वैयक्तिक तक्रारी दाखल केल्या.

**जानेवारी 15, 2025:**
सोमनाथ सूर्यवंशीचा पोलिस कोठडीतील मृत्यू आणि परभणीत दलित समुदायाविरुद्ध पोलिसांची कारवाई यांच्या तपासासाठी न्या. व्ही एल अचिल्या, मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश, यांच्या अध्यक्षतेखाली न्यायालयीन आयोगाचे गठन.

**टीप:** सदर अहवाला जाहीर करण्याच्या दिवसापर्यंतचे, जानेवारी 23, 2025चे, जमिनी वास्तव: अ) अंतिम पोस्ट मॉर्टम अहवाल न्यायालयासमोर सादर झाला आहे आणि ब) भान्यासं कलम १९६ [माजी सीआरपीसी कलम १७६ (१)] अंतर्गत अहवाल सादर -कोठडीतील मृत्यूचा न्यायालयीन चौकशी अहवाल न्यायालयासमोर सादर झाला आहे.

### “तुम्ही १० लाख सहजपणे देताय. मदत दिली की आमच्या लेकरांना मारायला तुम्ही मोकळे. हे मी कधीच मान्य करणार नाही.”

*- सत्यशोधन समितीसमोर विजयाबाई सूर्यवंशींचे कथन:*



विजयाबाई वेंकट सूर्यवंशी. जितक्या मेहनती तितक्याच स्वाभिमानी. विजयाबाई आणि त्यांचे पती वेंकट सूर्यवंशी यांची चार मुलं. सोमनाथ, प्रेमनाथ, अविनाश आणि सोनाली. त्यांचं मूळ गाव रामलिंग मुदगड, तालुका निलंगा, जिल्हा लातूर.

दगड फोडणं हा आपल्या वडार समाजाचा पारंपरिक व्यवसाय करत दोघांनी कष्टानं घर चालवलं आणि चारही लेकरांना शिकवलं.

सोमनाथनं एम ए अर्थशास्त्र, त्यानंतर बीएड केलं. नंतरही त्याचं शिकणं चालू होतं. सध्या एलएलबीच्या तिसऱ्या वर्षात शिकत असताना सोमनाथचा दु:खद मृत्यू झाला. अविनाशनं एमएस्सी आणि बीएड केलं आहे. प्रेमनाथ बीएसस्सी तर सोनाली बारावी शिकतेय. सोमनाथ आणि त्याची भावंडं म्हणजे सूर्यवंशी कुटुंबातली शिकणारी पहिली पिढी. गावातही वडार समाजात उच्चशिक्षण घेणाऱ्या भावंडांचं एकमात्र घर.  घेणारं को पहिली

विजयाबाईंचे पती वेंकट सूर्यवंशी २०१८ साली वारले. सोमनाथ सगळ्यात मोठा मुलगा. घर चालवण्यासाठी त्यानं शिक्षणाबरोबरच एलआयसी एजंट म्हणून काम सुरू केलं. विजयाबाईंनी सांगितलं की ९ डिसेंबर २०२४ ला त्यांचं आणि सोमनाथचं शेवटचं फोन संभाषण झालं.

पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं, तुरुंगात नेलं तोवर त्याची प्रकृती अगदी व्यवस्थित होती. कोठडीत संशयास्पद मृत्यू होण्याच्या आधीपर्यंत त्याला ना कसला आजार होता ना त्रास. १५ डिसेंबर २०२४ च्या सकाळी विजयाबाईंना पोलिसांकडून पहिल्यांदा फोन आला. त्यांनी सोमनाथचं नाव, जात विचारली, तुमचाच मुलगा आहे का हेही विचारलं. हार्ट अ‍ॅटॅकनं त्याचा मृत्यू झाला असं सांगितलं. त्याचं शव औरंगाबादला नेलं होतं. विजयाबाई परभणीला गेल्या, तिथे अशोक घोरबंद हे पोलिस अधिकारी त्यांना पोलिस महानिरीक्षकांकडे घेऊन गेले.

विजयाबाईंनी सत्यशोधन समितीला सांगितलं की त्यांनी अशोक घोरबंदला ओळखलं, कारण त्यांचा व्हायरल झालेला व्हिडिओ विजयाबाईंनी पाहिला होता. त्यांनी समिती सदस्यांना सांगितलं की अविनाश आणि प्रेमनाथला पोलिसात नोकरी मिळवून द्यायला मदत करेन आणि पोलिस भरतीच्या प्रक्रियेत लागेल ती मदत करेन, असं घोरबंदनी त्यांना सांगितलं. सोमनाथचं शव परभणीत न आणता थेट गावाला नेऊन अंत्यसंस्कार करा, असंही त्यांनी विजयाबाईंना सांगितलं. पोलिस महानिरीक्षक शहाजी उमप यांच्या भेटीत त्यांनी विजयाबाईंना विचारलं की “तुमच्या मुलाला अस्थमा होता का?” “त्याला अस्थमा नव्हता,” असं विजयाबाईंनी सांगितलं. मग ते म्हणाले, “तुमच्या मुलाचा हार्ट अ‍ॅटॅकनं मृत्यू झाला. पोस्ट-मॉर्टेमसाठी बॉडी औरंगाबादला नेली आहे.” त्यावर विजयाबाईंनी ठामपणं म्हटलं, “माझा मुलगा पोलिसांच्या मारहाणीमुळं गेला. त्याला तुम्ही न्यायच्या आधी त्याला कसलाही त्रास होत नव्हता. ज्यांनी त्याला मारलं त्यांना शिक्षा करा. मला न्याय मिळाला पाहिजे.”

या भेटीनंतर त्या प्रेमनाथ आणि अविनाश यांच्यासोबत औरंगाबादमधील सरकारी मेडिकल कॉलेजला गेल्या. पोस्ट-मॉर्टेमनंतर अ‍ॅम्ब्युलन्समधून सोमनाथचं शव घेऊन ते परभणीकडे निघाले. वाटेत पाचोडजवळ असताना पोलिस अधिक्षकांनी (एसपी) त्यांची अ‍ॅम्ब्युलन्स थांबवली. त्यांच्यासोबत बराच पोलिस ताफा होता. अ‍ॅम्ब्युलन्सच्या ड्रायव्हरला गाडीतून खेचून खाली उतरवलं, गाडीची किल्ली हिसकावून घेतली आणि जवळपास दोन तास त्याला ताब्यात ठेवलं. विजयाबाईंनी सांगितलं, पोलिस दबाव टाकत होते. सोमनाथचं शव परभणीला न नेता लातूरला त्यांच्या गावी न्यायला सांगत होते. त्यांचा इतका दबाव असूनही विजयाबाईंनी परिस्थितीचा धीरानं सामना केला. परभणीत ७०,००० हून अधिक लोक जमले होते, अंत्यसंस्कार गावीच करा आणि परभणीत आणू नका असा पोलिसांचा दबाव होता. “दंगलीची शक्यता” आहे असं पोलिसांचं म्हणणं होतं. तसं काही झालं तर त्याची जबाबदारी तुम्ही घेणार का, या पोलिसांच्या प्रश्नावर विजयाबाईंनी दिलेलं उत्तर थक्क करणारं आणि त्यांच्या ताकदीचा प्रत्यय देणारं आहे.



विजयाबाई म्हणाल्या, “माझा मुलगा पाच दिवस तुमच्या पोलिस कोठडीत होता. या पाच दिवसात तुम्ही एकदाही संपर्क केला नाही. सोमनाथचा जीव गेल्यानंतर तुम्ही मला कळवलं. त्याला अटक करून मृत्यू होईपर्यंतच्या दिवसांची जबाबदारी तुम्ही घेणार का? कोण घेणार त्याची जबाबदारी? तुमच्या ताब्यात असताना तो मेला त्याची जबाबदारी तुम्ही नाही घेत आणि त्या ७०,००० जणांची जबाबदारी मला घ्यायला सांगताय?” त्यांच्या या उत्तरावर पोलिस निशब्द झाले. तोवर आजूबाजूच्या गावातले लोकही औरंगाबादमध्ये जमले होते.

त्यानंतर सोमनाथचं शव परभणीला आणलं. आंबेडकरी जनसागराच्या साक्षीनं आणि शांततापूर्ण वातावरणात अंतिम संस्कार पार पडले.

विजयाबाईंनी पोलिस तक्रार दाखल केली आहे. आपल्या मुलाचा पोलिस कस्टडीतील मृत्यू हा खून आहे, त्याची चौकशीची मागणी त्यांनी केली आहे. मॅजिस्ट्रेट चौकशीमध्येही त्यांनी आपलं म्हणणं सांगितलं आहे. नुकसान भरपाई म्हणून महाराष्ट्र सरकारनं त्यांना रू. १० लाख देऊ केले, पण विजयाबाईंनी ना ही मदत घेतली, ना त्या कसल्याही दबावाला बळी पडल्या. ‘दोषींना शिक्षा झाली पाहिजे आणि सोमनाथला न्याय मिळाला पाहिजे’, ही मागणी त्या ठामपण मांडताहेत.

सरकारी मदतीबद्दल त्या म्हणाल्या, “तुमचे दहा लाख तुमच्याजवळ ठेवा.” “त्या पैशातून पोलिसांना आणखी खुराक खायला घाला, म्हणजे आमच्या लेकरांना मारायची आणखी ताकद त्यांच्यात येईल!”

“तुम्ही अगदी सहजपणे मदत देऊ करताय. मदत दिली की आमच्या लेकरांना मारायला तुम्ही मोकळे. हे मी कधीच मान्य करणार नाही. मला न्याय हवाय. अनेकजण मला भेटायला येतात आणि सहानुभूती दाखवतात. पण आईचं काळीज आहे माझं, न्याय मिळाल्याशिवाय ते शांत होणार नाही.”



## शोधमोहिमेदरम्यान पोलिसांच्या हिंसाचाराचा सामना करावा लागलेल्या दलित समुदायातील व्यक्तींचे अनुभव (सत्यशोधन समितीने घेतलेल्या मुलाखती आणि माध्यमातून प्रसिद्ध बातम्यांच्या आधारे)

1. **रमेश (55, रोजमजुरी):** रमेश यांनी सांगितले की, पोलिसांनी त्यांच्या घरावर छापा टाकला आणि जबर मारहाण केली. या हल्ल्यामुळे त्यांना गंभीर शारीरिक इजा झाली. पण वैद्यकीय किंवा कायदेशीर मदत मिळाली नाही. आपला अनुभव सांगताना त्यांचा आवाज कापत होता. तुम्ही झोपेत असताना कुणीतरी मोठ्या धोंडा तुमच्यावर टाकला की जसे वाटेल तसाच माझ्या मनाचा थरकाप या पोलिसांच्या हल्ल्याने उडाला आहे, असे त्यांनी म्हटले. त्यांची पत्नी सुमनताईने सांगितले की, पतीला वाचवायचा प्रयत्न करत असताना त्यांनाही मारहाण करण्यात आली. या हिंसेचा त्यांना खूप त्रास होत आहे. मारहाणीमुळे व जखमांमुळे रोजच्या कामे करणे अवघड झाले आहे. झाल्या घटनेचा मुलाच्या मनावरही परिणाम झाला आहे आणि त्याला शाळा सोडून कामाला जावण लागत आहे. एका स्वतंत्र पत्रकाराने 24 डिसेंबरच्या सबरंग इंडियासाठी लिहिलेल्या लेखातून हा अनुभव घेतला आहे.

   **स्रोत:** https://sabrangindia.in/special-report-they-came-like-monkeys-they-came-like-nazis-ambedkari-bastis-in-parbhani-face-the-traumas-of-police-brutality/

2. **विजयाबाई सूर्यवंशी (मृत सोमनाथ सूर्यवंशीची आई):** सोमनाथ या आपल्या मुलाचा पोलिसांच्या मारहाणीमुळे मृत्यू झाला. आपल्यावर कोसळलेल्या दु:खातून त्या सावरलेल्या नाहीत. त्यांनी सांगितले की सोमनाथ कायद्याचे शिक्षण घेत होता, एलआयसी एजंट

म्हणून कामही करत होता आणि वडिलांच्या मृत्यूनंतर घराला हातभार लावण्यासाठी शिकता शिकता काम करत होता. त्याची पत्रकारिता आणि कायद्याच्या शिक्षणाची कागदपत्रे पोलिसांना दाखवली तरीही पोलिसांना त्याला डांबून ठेवले, मारहाण केली आणि अतोनात छळ केला आणि "अनेक दुखापतींमुळे" त्याचा मृत्यू झाला. विजयाबाईंनी दु:ख बाजूला ठेवून आपलं म्हणणं मांडलं आणि मुलाला न्याय मिळाला पाहिजे ही मागणी केली. त्यांच्या कुटुंबाने पोलिसांविरुद्ध तक्रार केली आहे. भान्यासं कलम १८३ (आधीचे १६४ सीआरपीसी) खाली त्यांचे निवेदन नोंदवून घेतले आहे. पण पोलिसांचे वर्तन दलितांबाबत नेहमीच अमानुष असते, मात्र त्यांच्या तक्रारींची एफआयआर नोंद करताना दिरंगाई केली जाते. मारहाण करणाऱ्या पोलिसांविरुद्धही अद्याप कोणतीही कारवाई केलेली नाही. अशोक घोरबंद या पोलिस अधिकाऱ्याचे निलंबन केल्याच्या बातम्या बाहेर आल्या आहे पण अधिकृतरित्या तसे जाहीर झालेले नाही. ही माहिती दि वायर आणि सबरंगइंडिया मध्ये प्रसिद्ध झाली आहे.

**स्रोत:** https://thewire.in/caste/parbhani-violence-man-picked-up-in-combing-operation-dies-in-police-custody

https://sabrangindia.in/special-report-they-came-like-monkeys-they-came-like-nazis-ambedkari-bastis-in-parbhani-face-the-traumas-of-police-brutality/

3. **वत्सलाबाई मानवते (अ-प्रशिक्षित वैद्यकीय सहाय्यक):** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक वारसा मानणाऱ्या आणि समाजमाध्यमांवर सक्रिय असलेल्या वत्सलाबाई यांनाही पोलिसांच्या शोधमोहिमेदरम्यान मारहाणीचा सामना करावा लागला. त्यांचा विनयभंग करण्यात आला, शारीरिक मारहाण झाली, आणि पोलिसांनी मारहाणीमध्ये हेतूपुरस्कर शरीराच्या संवेदनशील भागांना लक्ष्य केले. वत्सलाबाईंना उच्च रक्तदाब आहे, याआधीची अँजिओग्राफी झाली आहे, आरोग्याच्या अशा समस्या असूनही पोलिसांनी त्याची दखल घेतली नाही. वत्सलाबाईंच्या निवेदनानुसार, त्यांना लैंगिक हिंसेचा सामना करावा लागला. तसेच पोलिसांनी त्यांना त्यांचा मोबाइल फोन अनलॉक करण्यासाठी धमकावले, तसे न केल्यास त्यांच्यावर जबरदस्तीने लघवी करण्याची धमकी दिली. त्यांचा मोबाइल जप्त करण्यात आला असून तो अद्याप परत केलेला नाही. या हिंसेच्या मानसिक धक्क्यातून त्या अद्याप सावरलेल्या नाहीत, तरी न्यायासाठी संघर्षशील आहेत. हा प्रसंग सबरंग इंडियासाठी स्वतंत्र पत्रकाराने घेतलेल्या मुलाखतीत 24 डिसेंबरच्या अंकात प्रसिद्ध झाला आहे.

स्रोत: https://sabrangindia.in/special-report-they-came-like-monkeys-they-came-like-nazis-ambedkari-bastis-in-parbhani-face-the-traumas-of-police-brutality/



**<u>FF Report:</u>** वत्सलाबाई मानवते यांचे नाव एफआयआर क्रमांक 0591 मध्ये आरोपी म्हणून आलेले आहे, ही तक्रार अमृत आदिनाथ शिराळेने दाखल केली होती. पोलिस आणि एसआरपीएफ वस्तीतल्या निर्दोष लोकांना कोणताही ठोस पुरावा वा कारण नसताना मारहाण करत होते, त्याचे लाईव्ह व्हिडिओ चित्रण वत्सलाबाईंनी केले. त्यामुळे त्यांच्यावर पोलिसांचा रोष होता. पोलिसांनी त्यांना केवळ मारहाणच केली नाही, तर लैंगिक छळही केला. दोन पुरुष पोलीसांनी त्यांच्या मांड्या दाबून धरल्या, काहींनी त्यांचे केस ओढले आणि बाकी पोलिस व एसआरपीएफच्या लोकांनी त्यांना मारहाण केली. या अत्याचारामुळे त्यांच्या संपूर्ण शरीरावर गंभीर जखमा झाल्या आहेत, शरीराच्या खासगी भागांवरही इजा झाल्या आहेत.

**स्रोत:** https://www.youtube.com/watch?v=41xoyn1RHyQ

प्रसंगावधान राखत त्यांनी व्हिडिओ रेकॉर्डिंग केले आणि याच कारणाने रोष धरून पोलिसांनी त्यांचे नाव एफआयआरमध्ये घातले आहे.

**स्रोत:** https://sabrangindia.in/special-report-they-came-like-monkeys-they-came-like-nazis-ambedkari-bastis-in-parbhani-face-the-traumas-of-police-brutality/

4. **माया पंडित (नवजात बाळाची स्तनदा माता):** माया पंडितांनी सांगितले की पोलीस घरात घुसल्यावर त्यांनी आपल्या लहान बाळासोबत लपण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी त्यांना जबरदस्तीने बाहेर काढले. माझं लहान बाळ अंगावर पिणारं आहे असं त्या सांगत राहिल्या, पण त्यांचा विरोध डावलून त्यांना लाठीने मारहाण केली. जे घडले त्याची भीती अजून त्यांच्या बोलण्यात जाणवते. त्या म्हणाल्या, दरवाजा उघड म्हणून पोलीस धमकावत ओरडत होते आणि माझं लहान बाळ घेऊन मी काय करू हे मला सुचत नव्हतं, असहाय्य वाटत होतं. त्यांना शारीरिक आणि मानसिक दोन्ही प्रकारच्या हिंसेचा सामना करावा लागला आणि त्याचे दीर्घकालीन परिणाम सहन करावे लागत आहेत.

**स्रोत:** https://sabrangindia.in/special-report-they-came-like-monkeys-they-came-like-nazis-ambedkari-bastis-in-parbhani-face-the-traumas-of-police-brutality/

5. **अहिल्यानगरमधील युवक (1):** अहिल्यानगरच्या युवकाने पोलिस कारवायांदरम्यान आणि त्यानंतर संपूर्ण समुदायात भीतीचे वातावरण असल्याचे सांगितले. त्यांनी सांगितले की, लहान मुले, वृद्ध, आणि बाळांना पाजणाऱ्या महिलांनाही सोडले नाही. अनेक युवकांना मारहाणीमुळे गंभीर दुखापती झाल्या आहेत, हाता-पायांना प्लास्टर लावावे लागले आहे. त्यांच्या वाहनांचे आणि मालमत्तेचे नुकसान केले गेले आहे. पोलिसांनी अश्रुधुराचा वापर केला आणि हिंसाचार केला. विनाकारण आपल्याला गुन्हेगारासारखे वागवले गेले आहे याचे दु:ख लोकांच्या मनात आहे.

**स्रोत:** https://sabrangindia.in/special-report-they-came-like-monkeys-they-came-like-nazis-ambedkari-bastis-in-parbhani-face-the-traumas-of-police-brutality/



6. **अहिल्यानगरमधील युवक (2):** या युवकाने सांगितले की लोकांच्यात तीव्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिस पुन्हा येतील आणि हिंसा करतील अशा अफवा पसरल्यामुळे लोक भीतीच्या छायेखाली राहात आहेत. लहान मुले, वृद्ध आणि सर्वसामान्य नागरिक या सर्वांशी पोलिसांनी क्रूर वर्तन केले. पोलिसांच्या मारहाणीचे लाईव्ह फूटेजच्या स्वरूपात पुरावे उपलब्ध आहेत, पण त्याची दखल घेऊन अधिकाऱ्यांनी किंवा राजकीय नेत्यांनी ठोस मदत किंवा कारवाई केलेली नाही. त्यामुळे लोकांना मुद्दाम वेगळे पाडल्यासारखे आणि अत्याचाराचे लक्ष्य केल्यासारखे वाटत आहे.

**स्रोत:** https://sabrangindia.in/special-report-they-came-like-monkeys-they-came-like-nazis-ambedkari-bastis-in-parbhani-face-the-traumas-of-police-brutality/



7. **संभाजी ब्रिगेडचे नेते (बालाजी मोहिते, गजानन जोगदंड आणि स्वप्नील गरूड):** मराठा समाजाच्या नेत्यांनी पोलिसांच्या क्रूर वर्तनाचा निषेध केला. सकल हिंदू समाज मोर्चासाठी मोठा जमाव जमा होत असताना आवश्यक ती प्रतिबंधक पावले उचलण्यात प्रशासनाने हलगर्जीपणा केला असे मत मांडले. परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी कलम 144 लागू करणे किंवा तत्सम कायदेशीर कारवाई तत्काळ केली नाही, याबद्दल खेद व्यक्त केला. पोलिसांच्या या भूमिकेमुळे हिंसा चिघळण्यास मदत झाली असे म्हटले.

**स्रोत:** https://sabrangindia.in/special-report-they-came-like-monkeys-they-came-like-nazis-ambedkari-bastis-in-parbhani-face-the-traumas-of-police-brutality/

8. **कॉ. राजन क्षीरसागर (सीपीआय):** परभणीत पोलिस अत्याचारांच्या पॅटर्न दिसून येतो, असे क्षीरसागर म्हणाले. पोलिसांच्या कारवायांची तुलना त्यांनी इस्रायली सैन्याने पॅलेस्टिनी नागरिकांवर वापरलेल्या रणनीतींशी केली. त्यांनी या गंभीर परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त केली. ते म्हणाले की, सत्ताधारी पक्षाकडून पोलिस शक्तीचा गैरवापर केला जात आहे, असहमतीचे आवाज दडपले जात आहेत आणि वंचित समुदायांना धमकावले जात आहे. हे रोखायला विरोधी पक्ष कमकुवत ठरत आहे, ही खेदाची बाब आहे.

**स्रोत:** https://sabrangindia.in/special-report-they-came-like-monkeys-they-came-like-nazis-ambedkari-bastis-in-parbhani-face-the-traumas-of-police-brutality/



9. **व्हिडीओ फिल्मचा पुरावा: पोलिसांच्या शोधमोहिमेदरम्यान नागरिकांनी घेतलेले खाजगी व्हिडीओ**

परभणीतील दलित वस्त्यांमध्ये पोलिसांनी विनाकारण केलेली शोधमोहीम व त्यादरम्यान केलेले अत्याचार यांचे व्हिडिओ सत्यशोधन समितीकडे उपलब्ध आहेत. यापैकी अनेक व्हिडिओ सार्वजनिक डोमेनमध्येही उपलब्ध आहेत. या घटनांची स्वतंत्रपणे चौकशी होणे अत्यावश्यक आहे. भीमनगर आणि प्रियदर्शिनी नगरमध्ये पोलिसांनी आंबेडकरी समाजाच्या घरांमध्ये जबरदस्तीने प्रवेश केला आणि वस्तीतील पुरुष व महिलांना विनाकारण मारहाण केली, असे आरोप आहेत. व्हिडिओंमध्ये तरुणांना पोलिसांकडून निर्दयतेने मारहाण करताना दाखवले आहे. एका व्हिडिओमध्ये, प्रियदर्शिनी नगरमध्ये तैनात असलेल्या पोलीस तुकडीतील एक पोलीस वस्तीतील एका वाहनाची तोडफोड करताना स्पष्ट दिसत आहे.

**स्रोत:** https://x.com/deepali_writes/status/1867479889798123737

वत्सलाबाई मानवते यांच्यावरील पोलिस अत्याचाराचा CCTV व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये प्रियदर्शिनी नगर, परभणीच्या एका मोकळ्या मैदानात पोलिसांनी एका महिलेभोवती जमून तिला निर्दय मारहाण करत असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. याशिवाय, SRP कर्मचाऱ्यांच्या बेकायदेशीर वर्तनाचा आणखी एक व्हिडिओ सार्वजनिक करण्यात आला आहे.

## निष्काळजीपणा की हातमिळवणी?



**A.** परभणीतील साम्यवादी नेते कॉ. राजन क्षीरसागर यांनी म्हटले की, पोलिसांनी दलित वस्त्यांवर केलेले हल्ले इस्रायली रणनीतींच्या धर्तीवर केलेले दिसतात. हिंगोली येथील एसआरपीएफ प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य गेल्या काही वर्षांपासून इस्रायलमधून प्रशिक्षण घेत आहेत, आणि त्याच पद्धतींचा वापर करत ते आंबेडकरी समाजाला त्रास देत आहेत. पत्रकार शर्मिष्ठा भोसले यांनी स्वतंत्रपणे "सबरंग इंडिया"साठी लेख लिहिला, ज्यात त्यांनी परभणीतील घटनेचे वर्णन करताना म्हटले आहे, "ते माकडांसारखे येतात; ते नाझींप्रमाणे येतात." या लेखात त्यांनी परभणीतील पोलिस अत्याचारामुळे आंबेडकरी वस्त्यांतील लोकांवर कसा आघात झाला, त्यांना काय सहन करावे लागले हे सांगितले आहे. हा लेख 24 डिसेंबरच्या "सबरंगइंडिया" न्यूज पोर्टलवर प्रकाशित झाला आहे.

**B.** पोलीस महानिरीक्षक शहाजी उमप यांनी मात्र म्हटले आहे की, "पहिल्या दिवसापासून आम्ही परिस्थिती पारदर्शकतेने आणि योग्य प्रकारे हाताळली आहे. आमच्यावर अनेक आरोप आहेत याची मला जाणीव आहे, आणि चौकशी सुरू आहे. त्यामुळे काही काळ वाट

बघा, संयम बाळगा." पत्रकार शर्मिष्ठा भोसले यांनी सोमनाथ सूर्यवंशी आणि वत्सलाबाई मानवते यांच्या मोबाईल फोनविषयी विचारले असता, उमप समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत.

**C.** राज्य सरकारचे काही अधिकारी, पोलीस आणि प्रशासकीय कर्मचारी यांच्या मनातील तीव्र दलित-विरोध आणि द्वेषभावना परभणीतील घटनेच्या मुळाशी आहे.

**D.** परभणीमध्ये रक्षकच भक्षक बनले आहेत.

## कोणती पावले उचलायला पाहिजे होती



1. लोकांच्या तक्रारींनुसार, दोषी पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांवर तत्काळ एफआयआर दाखल करावा. संबंधित व्यक्तींना निलंबित करून त्यांच्या जबाबदारीची चौकशी सन्माननीय उच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली करण्यात यावी.

2. शोधमोहिमेदरम्यान आणि पोलीस कोठडीत जखमी झालेल्या व्यक्तींना योग्य भरपाई द्यावी आणि सोमनाथ सूर्यवंशीच्या कुटुंबीयांना भरपाई देण्यात यावी, तसेच त्यांच्या दोन्ही भावांना सरकारी नोकरी द्यावी.

3. सकल हिंदू समाज मोर्चाच्या बैठकांची स्वतंत्र चौकशी करावी. तसेच सोमनाथ सूर्यवंशीच्या पोलीस कोठडीतील अत्याचाराची आणि न्यायालयीन कोठडीतील मृत्यूची स्वतंत्र चौकशी व्हावी. दोन्ही चौकशा निवृत्त उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांद्वारे करण्यात याव्यात.

4. राज्यघटना प्रतिकृतीची विटंबना करणाऱ्या दत्ता सोपान पवारचे सत्य जनतेसमोर आणावे - तो कोणाशी संबंधित आहे, त्याच्या मागे कोण आहे, त्याची पार्श्वभूमी इत्यादी. त्याला हे कृत्य करायला उद्युक्त करणारे कोणी असेल, तर त्यांची नावेही जाहीर करावीत.

## प्राथमिक निष्कर्ष



- परभणीतील संविधानाची विटंबना केवळ दत्ता सोपन पवारने केलेली नाही, तर त्या घटनेनंतर 10 आणि 11 डिसेंबर रोजी कथित हिंसक जमावातील सदस्यांना तत्काळ अटक न करणारे अधिकारीही तितकेच जबाबदार आहेत. त्यांच्यामुळे तणाव वाढला आणि या सामाजिक तणावाचा फायदा घेत शांततापूर्ण आंदोलकांवर हल्ला करून त्यांना ताब्यात घेण्यात आले.

- शोधमोहिमेदरम्यान आणि त्यानंतर पोलीस कोठडीत पोलिसांनी ज्या अमानुषपणे आणि क्रूरपणे मारहाण केली, दलित वस्तीतल्या घरांचे दारे-खिडक्या फोडल्या हे भयंकर आहे. पोलिसी वर्तनाचा व कारवायांचा हा प्रकार भीषण आणि धक्कादायक आहे.

- या घटनासांठी जबाबदार पोलिस दलातील सर्व व्यक्ती आणि शोधमोहीम (कॉम्बिंग ऑपरेशन) राबवण्यासाठी ज्यांना नियुक्त केले आणि ज्यांना आदेश दिले गेले, त्या सर्व पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांची नावे जाहीर करावी.

- सोमनाथ सूर्यवंशी आणि विजय वाकोडे यांना पोलिस कोठडीत ठेवलेल्या काळात (अडीच दिवस) जे पोलीस अधिकारी व कर्मचारी ड्यूटीवर होते, त्यांची नावे जाहीर करावी आणि त्यांच्यावर कारवाई करावी.

- या सर्वजणांनी, दलितविरोधी आणि भेदभावपूर्ण कारवायांद्वारे, वैयक्तिक आणि सामूहिकपणे, भारतीय संविधान आणि आंतरराष्ट्रीय मानवाधिकार कायद्यांचे उल्लंघन केले आहे, तसेच मानवी हक्कांची मूलभूत तत्वांची पायमल्ली केली आहे.

## पुढील माहिती सार्वजनिक करावी ही सत्यशोधन समिती मागणी:

i. डेप्युटेशन रजिस्टरची तपासणीतून 10 ते 16 डिसेंबर 2024 दरम्यान परभणीत घडलेल्या घटनांसाठी जबाबदार असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची नावे.

ii. त्या कालावधीमध्ये पोलिस, कर्मचारी, आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिलेल्या ड्यूटी आणि त्यांनी केलेल्या कृतींची सविस्तर माहिती.

iii. सकल हिंदू समाज मोर्चासाठी 10 डिसेंबर 2024 रोजी पोलीस बंदोबस्त, प्रतिबंधात्मक उपाययोजना इत्यादीसाठी दिलेले सर्व पोलीस आदेश; 11 डिसेंबर 2024 रोजी कथित हिंसक जमाव जमल्यावर आणि मालमत्तेची नासधूस सुरू झाल्यावर दिलेले आदेश.

iv. 10 आणि 11 डिसेंबर 2024 रोजी परभणीत घडलेल्या घटनांवरील पोलीस केस डायरीतील सविस्तर माहिती.

v. 10 आणि 11 डिसेंबर 2024 रोजी पोलिसांनी केलेल्या कारवायांचे अधिकृत व्हिडिओ रेकॉर्डिंग.

vi. डिसेंबर 2020 मध्ये तीन न्यायाधीशांच्या पीठाने दिलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निर्णयानुसार, सर्व पोलिस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे अनिवार्य करण्यात आले आहे. परभणीतील पोलिस ठाण्यांमध्ये असे सीसीटीव्ही कॅमेरांची बसवलेले आहेर का, याबाबतची माहिती सार्वजनिक केली जावी. कोर्टाचा हा आदेश पोलिस ठाण्यांमधील पारदर्शकतेसाठी आणि आरोपी व अंडरट्रायलच्या मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी देण्यात आला होता. त्याच्या अंमलबजावणी व पूर्ततेसाठी न्यायालयाने केंद्र सरकारला आणि राज्य सरकारांनी वेळोवेळी मुदत दिली आहे. हा विषय अद्याप प्रलंबित आहे.

ही माहिती सार्वजनिक केली जावी आणि संबंधित सीसीटीव्ही फुटेज प्रसिद्ध करण्यात यावे, अशी सत्यशोधन समितीची मागणी आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने पोलिस कोठडीत अशा दुर्दैवी आणि हिंसक मृत्यूंची पुनरावृत्ती होऊ नये, या हेतूने हा ऐतिहासिक निर्णय दिला होता. सर्व पोलिस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसवण्याचा विषय अद्याप सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

# परभणी हिंसाचारामुळे पीडित व्यक्तींनी केलेल्या वैयक्तिक तक्रारी



सत्यशोधन समितीला मिळालेल्या एफआयआरमध्ये अद्याप वैयक्तिक बारा तक्रारींचा कोणताही उल्लेख नाही. त्या एफआयआरमध्ये मुख्यतः आंदोलनादरम्यान झालेल्या कथित तोडफोड व नुकसान यांवर भर आहे, जमाव हिंसक झाल्याने पोलिसांनी बळाचा वापर करावा लागला, अशा प्रकारे पोलिसी कारवाईचे समर्थन करण्यासाठी त्या एफआयआर केल्या आहेत. तर, हिंसाचाराचा सामना केलेल्या पीडित व्यक्तींच्या तक्रारी एफआयआरमध्ये रूपांतरित केलेल्या नाहीत. असे नेहमीच होते, विशेषतः कायद्याचे रक्षक भक्षक बनून लोकांना लक्ष्य करतात, तेव्हा लोकांच्या तक्रारींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. **हिंसापीडित बचावलेल्या व्यक्तींच्या खाजगी तक्रारी सत्यशोधन समितीला मिळाल्या आहेत आणि त्यांचा सारांश पुढे दिला आहे.**

## वैयक्तिक तक्रारींचा गोषवारा

सत्यशोधन समितीकडे उपलब्ध असलेल्या आठ तक्रारींमध्ये (एकूण 12 तक्रारी स्थानिक पोलीस ठाण्यात दाखल झाल्याचे सांगितले गेले आहे) पोलिसांचे गैरवर्तन, कोठडीत झालेला हिंसाचार, जातीय भेदभाव, आणि धमकी यांसारख्या गंभीर आरोपांचा उल्लेख आहे. या घटना 10 डिसेंबर 2024 ते 19 डिसेंबर 2024 या कालावधीत परभणीच्या मोढा पोलीस ठाण्यात आणि कायदा अंमलबजावणी यंत्रणेमार्फत घडल्या आहेत. यामध्ये अमानुष मारहाण, जातीय शिवीगाळ, बेकायदेशीर अटक आणि कथित कोठडीतील मृत्यू यांचा समावेश आहे.

**खाली या तक्रारींमधील मुख्य मुद्द्यांचा सारांश दिला आहे, ज्याची प्रतींपैकी आठ सत्यशोधन पथकाकडे उपलब्ध आहेत.**

**<u>विजयाबाई वेंकट सूर्यवंशीची तक्रार:</u>** 15 डिसेंबर रोजी विजयाबाई वेंकट सूर्यवंशी (वय 60 वर्षे) या लातूर जिल्ह्यातील रामलिंग मुदगड येथील मजुरीकाम करणाऱ्या महिलेला परभणी पोलिसांकडून कळवण्यात आले की विजयाबाईंचा मुलगा सोमनाथ वेंकट सूर्यवंशीचा (शिवाजी कॉलेजातील तृतीय वर्षाचा कायद्याचा विद्यार्थी) हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला आहे. मात्र, औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयाच्या शवविच्छेदन अहवालातून पोलिस कोठडीत झालेल्या मारहाणीचे पुरावे उपलब्ध झाले आहेत. सोमनाथला मोढा पोलीस ठाण्यात सलग तीन दिवस मारहाण करण्यात आली, ज्यामुळे त्याचा मृत्यू झाला, असे कार्यकर्त्यांनी आणि प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

मोढा पोलिस आणि पोलिस अधिक्षकांकडे अनेक तक्रारी करूनदेखील मृत्यूस जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवरील कारवाईला जाणूनबुजून विलंब केला गेला. विजयाबाई वेंकट सूर्यवंशींनी 18 डिसेंबर रोजी दोन आणि 25 डिसेंबर रोजी एक अशा एकूण तीन तक्रारी दाखल केली. या तक्रारी गोंढा पोलीस ठाणे, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी आणि पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालय, नांदेड येथे पाठवण्यात आल्या. तथापि, या तक्रारींचे एफआयआरमध्ये रूपांतर अद्याप झालेले नाही. (सत्यशोधन समितीकडे विजयाबाईंच्या तक्रारींच्या प्रती आहेत.)

**<u>विजय दशरथ वाकोडेंची तक्रार:</u>** इतर तक्रारदारांच्या निवेदनांनुसार, सोमनाथवर झालेल्या अत्याचारांचा संदर्भ 10 डिसेंबरपासून सुरू झालेल्या पोलिस कारवायांशी आहे. या दिवशी दलित कार्यकर्ता विजय दशरथ वाकोडे यांनी संविधानाच्या प्रतीच्या विटंबनेविरोधात शांततापूर्ण आंदोलन केले होते. विजय दशरथ वाकोडेंचा मुलगा, आशीष विजय वाकोडे, यांनी नवी मोढा पोलीस ठाण्याच्या निरीक्षकांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, त्यांच्या वडिलांच्या आंदोलनामुळे अधिकारी शरद मारे, तुरनार आणि अशोक घोरबंद यांच्याकडून त्यांचा छळ झाला आणि धमकावण्यात आले. 16 डिसेंबर रोजी, सोमनाथ सूर्यवंशी यांच्या अंत्यसंस्कारात सहभागी झाल्यानंतर, विजय वाकोडे यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांचा मृत्यू झाला. हा

मृत्यू पोलिसांच्या सततच्या धमक्यांमुळे झाल्याचा आरोप आहे. आशीष विजय वाकोडे यांनी 19 डिसेंबर 2024 रोजी दिलेल्या तक्रारीत, त्यांच्या वडिलांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या अधिकाऱ्यांवर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा अंतर्गत योग्य कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.

**धम्मदीप जनार्दन मोगलेंची तक्रार:** 11 डिसेंबर 2024 ला, पोलिस अधीक्षक कार्यालयाजवळच्या शोधमोहिमेदरम्यान पोलिसांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या धम्मदीप जनार्दन मोगले यांना अडवले. त्यांना जातीय शिवीगाळ केली आणि निर्दयपणे मारहाण करण्यात आली. त्यांना मोढा पोलीस ठाण्यात ताब्यात ठेवण्यात आले, जिथे त्यांनी सोमनाथ सूर्यवंशी यांची गंभीर स्थितीही पाहिली. पोलिसांच्या रोषाच्या भीतीने मोगले यांनी लगेच तक्रार दाखल केली नाही, उशीरा केली. वरील घटना आणि 19 डिसेंबर 2024 सहाय्यक पोलिस निरीक्षक बंदखडके यांनी दिलेल्या धमकीची घटना, अशा दोन्ही घटनांच्या दोन खाजगी तक्रारी त्यांनी १९ डिसेंबरला दिल्या. बंदखडकेनी त्यांना तक्रार दाखल केली तर खोट्या केसेस करून तुरुंगात टाकेन अशी धमकी दिली होती. ही दोन्ही तक्रारी मोढा पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांकडे दिल्या आहेत, पण अद्याप त्यांचे एफआयआरमध्ये रूपांतर झालेले नाही.

**आशिश लिंबाजी बनसोडे आणि सतीश रमेश भालेराव यांच्या तक्रारी:** तसेच, आशीष लिम्बाजी बानसोडे आणि सतीश रमेश भालेराव यांनी त्यांच्या स्वतंत्र खाजगी तक्रारी, दिनांक 27 डिसेंबर 2024, जिल्हा पोलीस अधीक्षक, परभणी यांना दिल्या आहेत. या तक्रारींमध्ये त्यांनी शोधमोहिमेदरम्यान त्यांना किरकोळ कारणांसाठी ताब्यात घेतल्याचे म्हटले आहे (निळ्या रुमालाचा वापर केल्यामुळे). दोघांनाही गंभीर शारीरिक मारहाण, जातीय शिवीगाळ, आणि न्यायालयात काहीही न सांगण्याचा दबाव व धमकी या गोष्टी सांगितल्या आहेत. प्रत्यक्षदर्शींनी सातत्याने मारहाण व अत्याचार करणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे सांगितलेली व नोंदवलेली आहेत. त्यामध्ये तुरनार, पठाण, आणि एका महिला कॉन्स्टेबलचा समावेश आहे.

सतीश रमेश भालेरावला 11 डिसेंबरला लग्नाच्या आमंत्रणांचे वाटप करत असताना अटक करण्यात आली. दोन दिवस नानलपेठ पोलीस ठाण्यात ठेवले आणि अमानुष छळ केला, कपडे काढून दोन दिवस मारहाण केली. महिलांवर आणि मुलांवरही पोलिसांनी अत्याचार केले. अटक केलेल्यांना “महारेडे” आणि “धेडगे” अशी जातीय शिवीगाळ करून अपमानित केले. याच प्रकारच्या पोलिस कोठडीतील अननन्वित हिंसाचारामुळे सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू झाला, असे लक्षात येते. सतीश रमेश भालेरावची 26 डिसेंबर 2024 ची मोढा पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांना दिलेल्या तक्रारीची प्रत सत्यशोधन समितीकडे उपलब्ध आहे.

**रमेश बाबुराव गोरेंची तक्रार:** रमेश बबुराव गोरे यांनी 27 डिसेंबर 2024 रोजी जिल्हा पोलीस अधीक्षकांना दिलेल्या खाजगी तक्रारीत त्यांच्यावर झालेल्या हल्ल्याविषयी सांगितले आहे. गोरे यांना त्यांच्या बहिणीला घेण्यासाठी जात असताना मारहाण करण्यात आली. जातीच्या

कारणावरून त्यांना लक्ष्य करत पोलिस अधिकाऱ्यांनी त्यांना लाठ्या, पट्टे, आणि लोखंडी रॉड वापरून मारले. या घटनांचे तीव्र शारीरिक व मानसिक आघात गोरे आणि त्यांच्यासारखेच पोलिसांचे लक्ष्य झालेल्या अन्य व्यक्तींवर झाले आहेत. शारीरिक आणि मानसिक जखमांचे दीर्घकालीन परिणाम झाले असून त्यांना वैद्यकीय उपचार घ्यावे लागले. सत्यशोधन समितीकडे गोरेंची 27 डिसेंबरच्या तक्रारीची प्रत उपलब्ध आहे.

या सर्व प्रकरणांमध्ये पीडितांनी सातत्याने काही अधिकाऱ्यांची नावे सांगितली आहेत, ती म्हणजे शरद मारे, तुरनार, पठाण, घोरबंद आणि बंडखडके. तसेच तक्रारींमध्ये जातीय शिवीगाळ, विरोध दडपण्यासाठी धमक्या, आणि जखमींना वैद्यकीय मदत देण्यात केलेला विलंब याचा स्पष्ट उल्लेख आहे. या सर्व तक्रारींतून पोलिसी अत्याचाराचा एक पूर्वनियोजित पॅटर्न समोर येतो - कोठडीतील अत्याचार, भेदभाव, आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची सहेतूक निष्क्रियता. या घटनांमध्ये वैद्यकीय अहवाल आणि साक्षीदारांच्या जबाबांद्वारे पुरावे उपलब्ध असूनही, पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.

## सर्व तक्रारदारांची एकमुखी मागणी आहे की,

1. संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा.
2. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यांतर्गत कठोर कारवाई करा.
3. सोमनाथ सूर्यवंशीच्या कोठडीतील मृत्यू आणि संबंधित घटनांची निष्पक्ष चौकशी व्हावी.
4. तक्रारदारांना पोलिसांकडून मिळणाऱ्या धमक्या व दबावाविरुद्ध संरक्षण मिळावे.



# हिंसाचाराचे मूळ कारण - एफआयआरमध्ये कशाचा समावेश केला गेलेला नाही



*Image: The Wire*

1. **राज्यघटनेच्या प्रतिकृतीची विटंबना करणारी व्यक्ती**

   संविधानाच्या प्रतीकृतीची विटंबना करणाऱ्या दत्ता सोपन पवारला अटकेच्या अवघ्या काही तासांतच पोलिसांनी "मानसिकरित्या अस्थिर" घोषित केले. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, पवार, ओबीसी धनगर समुदायातील रहिवासी, यांनी आपले कृत्य "त्याच्या परिणामांची जाणीव नसल्याने" केले. 10 डिसेंबर रोजी अटकेनंतर काही तासांतच नांदेडचे विशेष महानिरीक्षक शहाजी उमप यांनी पवार यांना"माथेफिरू" असे संबोधले. पण पवारच्या मानसिक स्थितीचे औपचारिक वैज्ञानिक मूल्यमापन होण्याआधीच पोलिसांनी हा निष्कर्ष कसा काढला, याचे कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही.

   **स्रोत:** https://thewire.in/caste/parbhani-violence-police-accused-of-beating-up-dalit-youth-carrying-out-combing-operations

   दत्ता सोपान पवार सध्या अज्ञात तुरुंगात असल्याचे परभणीचे सहाय्यक पोलिस निरीक्षक यशवंत काळेंनी सांगितले आहे.

   **स्रोत:** https://sabrangindia.in/special-report-they-came-like-monkeys-they-came-like-nazis-ambedkari-bastis-in-parbhani-face-the-traumas-of-police-brutality/

**सोपान पवार विरुद्ध दाखल केलेला एफआयआर उपलब्ध आहे.**
**घटनेची तारीख:** 10 डिसेंबर 2024
**FIR नोंदवण्याचा दिनांक:** 10 डिसेंबर 2024



**तक्रारदार:** कचरू विठ्ठलराव गोडबोले, वय ५१ वर्षे, यांनी नवी मोढा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

**तक्रारीचा गोषवारा:** तक्रारदार कचरू विठ्ठलराव गोडबोले यांनी 10 डिसेंबर 2024 रोजी सायंकाळी 5:00 वाजता परभणीतील रेल्वे स्टेशन रोडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ घडलेल्या घटनेची माहिती नवी मोढा पोलीस ठाण्यात नोंदवली. गोडबोले यांनी पाहिले की आंबेडकर पुतळ्याजवळ एक जमाव जमला होता. जवळ गेल्यावर त्यांना ओळखीचे चार जण दिसले –आकाश आहिरे, संतोष खरे, राजू बाबन कांबळे आणि आकाश गंगाधर चिट्टे. हे चौघे दत्ताराव सोपनराव पवार (वय 47 वर्षे, राहणार मिर्झापूर, परभणी) यांना प्रश्न विचारत होते.

आंबेडकर पुतळ्यासमोरील लोखंडी स्टँडवर ठेवलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना केल्याचा आरोप पवारवर होता. त्यांनी ग्रंथ उचलून जमिनीवर फेकल्याचे सांगितले गेले. जमावाने विचारलेल्या प्रश्नांना पवारने उडवाउडवीची उत्तरे दिली. आपण असे का केले याचे स्पष्टीकरण त्याला देता आले नाही. तक्रारदाराने आरोप केला की, पवार यांच्या या कृतीमुळे संविधान प्रतिकृतीचे नुकसान व विटंबना झाली, तसेच आंबेडकरी समाज आणि बौद्ध समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या.

आणखी लोक जमा होत गेले आणि परिस्थिती अधिक चिघळली. काहिंनी पवारशी धक्काबुक्की केली. पोलीस घटनास्थळी पोहोचले, त्यांनी हस्तक्षेप केला आणि पवारला ताब्यात घेतले. त्याला लगेच रुग्णालयात नेण्यात आले. तक्रारदाराने पवारच्या कृत्याविरुद्ध योग्य कायदेशीर कारवाई करण्याची विनंती केली.

10 डिसेंबरपासून घडणाऱ्या सर्व घटनांची जबाबदारी महानिरीक्षक शहाजी उमप यांनी सांभाळली आहे. यासंदर्भात लेखकाशी बोलताना उमप म्हणाले, "पहिल्या दिवसापासून आम्ही परिस्थिती पूर्ण क्षमतेने आणि योग्य रितीने हाताळली. मला याची कल्पना आहे की पोलिसांवर अनेक आरोप होत आहेत, जसे की कलम 144 लागू करण्याची वेळ आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस आणि एसआरपीएफने केलेला बळाचा वापर इत्यादी... पण त्या विशिष्ट परिस्थितीत अधिक मोठे नुकसान टाळण्यासाठी तसे करणे आवश्यक होते. आता या संपूर्ण प्रकरणाची न्यायालयीन चौकशी होत आहे. अशा परिस्थितीत, एक पोलीस अधिकारी म्हणून मी कोणत्याही गोष्टीवर टिप्पणी करणे योग्य नाही. आपण सर्वांनी कोर्टाच्या निर्णयाची वाट पाहणे योग्य ठरेल."

**स्रोत:** https://sabrangindia.in/special-report-they-came-like-monkeys-they-came-like-nazis-ambedkari-bastis-in-parbhani-face-the-traumas-of-police-brutality/

## 2. 10 डिसेंबर 2024 रोजी विटंबनेची घटना घडण्याच्या अवघ्या काही तास आधी झालेला सकल हिंदू समाज समाजाचा कार्यक्रम




**सकल हिंदू समाजाच्या जमावाविरुद्ध कारवाई करण्याचे जाणीवपूर्वक टाळण्यात आले का?**

10 डिसेंबर रोजी, संविधान विटंबनेच्या घटनेच्या काही वेळ आधी, सकल हिंदू समाज या अतिरेकी उजव्या विचारसरणीच्या गटाने शिवाजी पुतळ्याजवळ एक सभा आयोजित केली होती. या सभेचे उद्दिष्ट "बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचारां"च्या निषेधार्थ आंदोलन करणे असे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून काही मीटर अंतरावर असलेल्या शिवाजी पुतळ्याजवळ ही सभा झाली. सभेत प्रक्षोभक भाषणे झाली - जशी या संघटनेच्या सार्वजनिक कार्यक्रमांत नेहमीच होत असतात.

सोपान पवार या सभेला उपस्थित होता का, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही, आणि पोलिसांनी यासंदर्भात कोणतीही चौकशी केलेली नाही.

**स्रोत:** https://thewire.in/caste/parbhani-violence-police-accused-of-beating-up-dalit-youth-carrying-out-combing-operations

# कायदा आणि पोलीस मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन




- **आदेश आणि प्रक्रियांची अंमलबजावणी**

**बॉम्बे पोलीस अधिनियमाचे कलम ६४:**

(१) एखाद्या सक्षम प्राधिकरणाने कायदेशीररित्या दिलेला कोणताही आदेश किंवा प्रक्रिया पोलीस अधिकाऱ्याने तत्काळ पाळणे आणि कायदेशीर पद्धतीने त्याची अंमलबजावणी करणे हे त्याचे कर्तव्य आहे. त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या आदेशांची अंमलबजावणी सर्व कायदेशीर मार्गांनी करणे त्याच्यावर बंधनकारक आहे.

**(कलम ६४, बॉम्बे पोलीस अधिनियम, १९५१)**

**टीप:** हे नियम स्पष्टपणे सांगतात की कोणताही आदेश कायदेशीर असला पाहिजे आणि त्याची अंमलबजावणीही कायदेशीर पद्धतीने केली गेली पाहिजे.

**परभणी येथील घटनांमध्ये:** पोलिसांनी दिलेले आदेश आणि वापरलेली साधने अवाजवी आणि कायद्याच्या मूलभूत तत्त्वांशी आणि मानवी हक्कांशी विसंगत आहेत.

- **सभेवरील बंधने, कायद्याचे उल्लंघन आणि नागरिकांवरील क्रूरता, विशेषतः महिलांविषयी संबंधित नियमावली:**

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम:**

**कलम 37(1):** सामाजिक गोंधळ/अव्यवस्था टाळण्यासाठी काही विशिष्ट कृतींवर बंदी घालण्याचे अधिकार

**कलम 37(3):** लेखी स्वरूपात सभांचा किंवा मिरवणुकींचा प्रतिबंध करण्याचा अधिकार.

**कलम 39:** दंगल किंवा शांततेच्या गंभीर भंगाचे प्रतिबंध किंवा दमन करण्यासाठी आयुक्त व अधीक्षकांना तात्पुरते कोणतीही इमारत किंवा जागा बंद करण्याचा किंवा ताब्यात घेण्याचा अधिकार.

**कलम 40:** सार्वजनिक ठिकाणी धार्मिक, समारंभिक किंवा सांघिक कार्यक्रमांदरम्यान शिस्त राखण्यासाठी आदेश देण्याचा अधिकार.

**कलम 135:** कलम 37, 39 किंवा 40 अंतर्गत दिलेल्या नियमांचे किंवा निर्देशांचे उल्लंघन केल्यास शिक्षा.

**कलम 142:** गुन्हेगारी स्वरूपाच्या सहभागामुळे काही व्यक्तींना विशिष्ट भागातून हटवण्याचे कायदेशीर ढांचा.

**बॉम्बे पोलीस अधिनियम, 1951:**

कलम 56: गुन्हा करण्याच्या तयारीत असलेल्या व्यक्तींना हटवण्याचे अधिकार.

- **कोठडीत असलेल्या व्यक्तींचे आरोग्य आणि स्वास्थ्य:** प्रत्येक पोलीस अधिकाऱ्याने लक्षात ठेवले पाहिजे की त्याच्या कोठडीत असलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्य आणि स्वास्थ्याची जबाबदारी त्याची आहे. त्यामुळे अटक केलेल्या किंवा कोठडीत असलेल्या व्यक्तीला जखमी किंवा आजारी असल्यास त्वरित आवश्यक मदत मिळवण्यासाठी उपाययोजना करणे त्याचे कर्तव्य आहे. अशा व्यक्तीचे रक्षण करताना किंवा त्याला एखाद्या ठिकाणी नेताना, त्या व्यक्तीच्या स्थितीचा विचार केला पाहिजे. तसेच, अशा प्रत्येक व्यक्तीसाठी योग्य आहार आणि निवाऱ्याची व्यवस्था करणेही आवश्यक आहे. **(कलम 58, मॉडेल पोलीस अधिनियम, 2006)**

  **टीप:** पोलिसांनी हे नियम केवळ दुर्लक्षितच केले नाहीत, तर त्यांचा अपमान करत या नियमांचे सर्रास उल्लंघनही केले आहे.

  **संदर्भ:** https://bprd.nic.in/uploads/pdf/6798203243-Volume%202.pdf

- **जिल्हाधिकारीची जबाबदारी:** जिल्हाधिकारी आपल्या जिल्ह्यातील सर्वसमावेशक शांततेसाठी जबाबदार असतो. कोणताही गंभीर व्यत्यय आल्यास, त्याची माहिती सरकारला देणे त्याचे कर्तव्य आहे. अशा प्रत्येक अहवालाची प्रत पोलीस महानिरीक्षकांकडे पाठवावी.

  (G. R., J. D., No. 6577, dated 27th September 1900 and G. L., H. D., No. 87/3-1, dated June 30, 1954.)

  **संदर्भ:** Mumbai Police Manual Part III

**टीप:** परभणी जिल्हाधिकारी आणि पोलीस महानिरीक्षक यांनी अद्याप पोलीस कारवाईत किती लोक - पुरुष, महिला आणि अल्पवयीन जखमी झाले, याबाबतची आकडेवारी जाहीर केलेली नाही.

- **पोलीस फायरिंग किंवा बळाचा वापर फक्त खालील परिस्थितीत करू शकतात:**

  (i) जेव्हा ठिकाणी उपस्थित लष्करी कमांडरने विशेष आदेश दिला असेल.
  (ii) जेव्हा स्वतःच्या संरक्षणासाठी अशा कृतीची आवश्यकता असेल.

  **टीप:** सार्वजनिक पोलीस यंत्रणेकडून बळाचा वापर करण्यासाठी नेमका आदेश कोणी दिला याबाबत अद्याप कोणतीही माहिती उघड करण्यात आलेली नाही. जर अशा प्रकारचा आदेश दिला गेला असेल, तरीही पोलिसांनी किंवा कोणत्याही अन्य अधिकाऱ्यांनी बळाचा वापर फक्त जमाव पांगवण्यापुरता मर्यादित ठेवणे आवश्यक होते. परंतु, पोलिसांनी "कॉम्बिंग ऑपरेशन" राबवून नागरिकांच्या घरांमध्ये प्रवेश केला, त्यांना अटक केली आणि मारहाण केली, जे पूर्णतः बेकायदेशीर आहे.
  दंगलसदृश परिस्थितीत, पोलीसांनी जमावाविरोधात कारवाई करण्याच्या त्यांच्या उद्देशाबद्दल पूर्वसूचना किंवा इशारा देणे अत्यावश्यक आहे. बळाचा वापर करण्यापूर्वी पोलिसांनी त्यांच्या कृतींची शक्यता स्पष्टपणे जाहीर करणे अपेक्षित आहे.

- दंगलसदृश परिस्थितीत पोलिसांनी जमावाविरोधात कारवाई करण्याचा उद्देश असल्यास, त्यांनी ती कारवाई करण्यापूर्वी जमावाला स्पष्ट सूचना किंवा इशारा देणे आवश्यक आहे. बळाचा वापर करण्यापूर्वी जमावाला याची पूर्वकल्पना देणे हा पोलीसांचा कर्तव्याचा एक महत्त्वाचा भाग आहे.

  **संदर्भ:** Précis on Crowd Control (https://bprd.nic.in/uploads/pdf/CrowdControl-All_chapters(1-114)English.pdf)

- **दंगली व अशांततेदरम्यान वैद्यकीय मदत:** नागरी अशांततेशी संबंधित उपाययोजनांची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांनी जखमी व्यक्तींना शक्य तितक्या चांगल्या प्रकारे वैद्यकीय मदत पुरवण्याचे कर्तव्य बजावले पाहिजे. गरज असल्यास, जखमींना शक्य तितक्या लवकर रुग्णालयात पोहोचवण्याची व्यवस्था करणे त्यांचे कर्तव्य आहे. (संदर्भ: G. R., H. D... No. 8108/2, dated 10th October 1930.

- परभणी पोलिसांनी कायद्याचे उल्लंघन करून निर्दोष आणि असहाय्य लोकांवर क्रूर अत्याचार केले. नागरी सुरक्षा व मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी असलेले कायदे आणि प्रतिबंधात्मक उपाय अनुसरण्याऐवजी, पोलिसांनी अत्याचार व अपमानाचे कृत्य केले.

जातीय ओळख केल्यामुळे निर्दोष नागरिकांना निर्दयीपणे मारहाण करण्यात आली व त्यांचा अपमान केला गेला.

- अटकेशी संबंधित नियमांचे उल्लंघन झाले. अटक झालेल्या व्यक्तींचे हक्क आणि अटक प्रक्रियेचे नियम पाळले गेले नाहीत. अटकेच्या आधी आणि नंतर कुटुंबाला माहिती देणे, तसेच नोटीस जारी करणे यासारखे मूलभूत नियम पाळले गेले नाहीत.

- अटक झालेल्या व्यक्तीला (महिला किंवा पुरुष) रिमांडसाठी न्यायाधीशांपुढे नेण्यापूर्वी वकिलाचा सल्ला घेण्याचा अधिकार आहे. परभणी पोलिसांनी सोमनाथ सूर्यवंशी आणि इतर अटक झालेल्या व्यक्तींना त्यांच्या कायदेशीर सल्ला व संरक्षणाच्या हक्कापासून वंचित ठेवले. पीडितांची बाजू मांडण्यासाठी वकीलांना थांबवून, पोलिसांनी त्यांच्या न्याय्य अधिकारांचे उल्लंघन केले.

# शोधमोहीम आणि जमाव पांगवण्यासाठी पोलीस नियमावली व कायदे

**शोधमोहीम (कोंबिंग ऑपरेशन) विषयी**

**जबाबदाऱ्या**

**गुन्हेगारी रोखणे**

- बीट पेट्रोलिंग, मोबाइल व पायदळ गस्त, तपासण्यांसाठी आकस्मिक भेट (नाका बंदी), कॉम्बिंग ऑपरेशन्स/शोधमोहीम आणि छापेमारी.

**स्रोत:** https://mumbaipolice.maharashtra.gov.in/responsibilities.asp

**PI Prevention:**

**III. पोलीस निरीक्षकांकडे गस्त घालणे, कॉम्बिंग ऑपरेशन्स, नाका बंदी, निश्चित ठिकाणे, आणि कायदा व सुव्यवस्थेचे किंवा सुरक्षा तपासणीचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असते.**

**संदर्भ** - अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे अधिकार आणि कर्तव्ये
https://mumbaipolice.gov.in/files/Rti/6.pdf

**अधिकाराचा गैरवापर केल्यास कोणकोणत्या कायद्यांचे उल्लंघन होते**

भारतीय पोलिस अधिनियम कलम 29 - आपल्या कर्तव्यात कसूर करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांनावर दंडात्मक कारवाई

**पोलीस नियमावलीतील छाप्यांसाठी सुरक्षा उपाय**
**भाग 3 पोलीस नियमावली**

**61. दंडाधिका-स्तरीय चौकशीची स्थापना:**

(I) गोळीबारामुळे कोणाला जखम झाली नसेल किंवा जीवितहानी झाली नसेल तरीही खालील परिस्थितीत दंडाधिकारी-स्तरीय चौकशी अनिवार्यपणे होणे आवश्यक आहे:

I. जुगार खेळणारे, बेकायदेशीर दारू गाळणारे किंवा पोलिसांच्या अटकेतील गुन्हेगारांना सोडवण्यासाठी दंगेखोर करणाऱ्या जमावाविरुद्ध आत्मरक्षणात गोळीबार.

II. दंगेखोरांविरुद्ध आत्मरक्षणात गोळीबार.
III. दंगेखोर जमाव पांगवण्यासाठी गोळीबार.

(2) जर गोळीबारामुळे कोणालाही जखम झाली नाही किंवा जीवितहानी झाली नाही, तर खालील परिस्थितीत दंडाधिकारी-स्तरीय चौकशी आवश्यक नाही,:

I. पोलिसांवर हल्ला करणाऱ्या दरोडेखोर, रेल्वे वॅगन लुटारू इत्यादींविरुद्ध आत्मरक्षणात गोळीबार.
II. बेकायदेशीर दारू गाळणारे, छाप्यादरम्यान पोलिसांवर हल्ला झाल्यास आत्मरक्षणात गोळीबार.
III. चाकूने दहशत माजवणाऱ्या मद्यपी गुंडांविरुद्ध आत्मरक्षणात गोळीबार.
IV. दरोडेखोर, महामार्गावरील लुटारू, फरारी इत्यादींना पकडण्यासाठी गोळीबार.


परंतु अशा प्रकरणांमध्येही, जर गोळीबारामुळे कोणाला जखम झाली किंवा जीवितहानी झाली, तर चौकशी करायलाच हवी.

2016 च्या एका प्रकरणात, महाराष्ट्र सरकारने मुंबई उच्च न्यायालयाला सादर केले की, हॉटेल्सवर छापे टाकताना व्यक्तींच्या गोपनीयतेच्या अधिकाराचा भंग होऊ नये यासाठी पोलीस दलासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात आली आहेत. ही मार्गदर्शक तत्त्वे अद्याप सार्वजनिकरीत्या उपलब्ध नाहीत, परंतु कॉम्बिंग ऑपरेशन्स आणि छाप्यादरम्यान सत्तेच्या गैरवापराच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतात.

**स्रोत:** https://www.business-standard.com/article/pti-stories/police-have-framed-guidelines-for-raids-on-hotels-hc-told-116060700939_1.html

https://www.hindustantimes.com/india/cops-arrested-people-in-raids-under-what-law-hc-asks-maha-govt/story-oDz54h3ICdI7REwNM4QnRI.html

# आठ एफआयआरचा एकत्रित गोषवारा आणि विश्लेषण




*Representational Image*

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांनी रेल्वे स्टेशन रोडवरील डॉ. आंबेडकर पुतळ्यासमोर ठेवलेल्या संविधान प्रतिकृतीच्या विटंबनेविरोधात पुकारलेल्या बंदच्या पार्श्वभूमीवर परभणीतील गांधी पार्क आणि नानलपेठ भागात हिंसाचार व अशांतता घडली. बंदचा उद्देश विटंबनेचा निषेध करणे हा होता, परंतु आंदोलनादरम्यान परिस्थिती हाताबाहेर जाऊन मोठ्या प्रमाणावर हिंसा झाली. यामध्ये अनेक व्यवसाय आणि निवासी मालमत्तांचे नुकसान झाले.

एफआयआरमध्ये नमूद करण्यात आले आहे की, 40 ते 50 जणांच्या गटाने लाकडी काठ्या आणि तत्सम हत्यारांचा वापर करून तोडफोड केली. स्थानिक व्यवसाय, वाहने, आणि इन्फ्रास्ट्रक्चरचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. वाहने जाळणे, दुकानांचे साइनबोर्ड फोडणे, सीसीटीव्ही कॅमेरे तोडणे, आणि व्यापारी, रहिवासी, तसेच दुकानदारांना लक्ष्य करणे यांसारख्या घटनांचा समावेश आहे. या हिंसाचारामुळे लाखोंचे आर्थिक नुकसान झाल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

पोलीस शिपाई अमृत आदिनाथ शिराळे यांनी तक्रार दाखल केली की, आंदोलनादरम्यान त्यांच्या मोटारसायकलचे नुकसान झाले आणि त्यांना शारीरिक इजा झाली. एफआयआरमध्ये नमूद आहे

की, दंगेखोरांनी केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचे पालन करण्यासाठी पोलिसांच्या प्रयत्नांमध्ये अडथळा आणला नाही, तर मालमत्ता व वाहनांची तोडफोड करत गोंधळ निर्माण केला. शिराळे यांच्या तक्रारीनुसार रस्त्यांवर तोडफोड व हिंसाचारामुळे कायदा व सुव्यवस्थेचा भंग झाल्याचे वर्णन आहे.

फळ विक्री करणाऱ्या शेख असलम शेख इकबालने त्याची कहाणी सांगितली आहे. बसस्थानकावर लॉक करून ठेवलेली त्याची फळांची गाडी आंदोलकांनी तोडफोड करून जाळून टाकली. इकबालच्या गाडीत रू. 10,000 किमतीची फळे होती, जी नष्ट झाली आणि गाडीचे रू. 20,000 चे नुकसान झाले. आंदोलकांदरम्यान छोट्या व्यापाऱ्यांचे व्यवसाय कसे भरडले गेले याचा प्रातिनिधिक अनुभव इकबालच्या उदाहरणातून दिसतो. मोठ्या व्यवसायांना व उच्चभ्रू व्यक्तींना संरक्षण आणि विम्याची सोय असते, परंतु इकबालसारख्या छोट्या विक्रेत्यांना अशा हिंसाचाराचा फटका सहन करावा लागतो, त्यांचा उपजीविकेचा स्रोत आणि मालमत्ता दोन्हीचे नुकसान होते.

गांधी पार्क भागातील एका दागिन्यांचे व्यापारी प्रदीप दिगंबरराव शहाणे यांच्या दुकानाची आंदोलकांनी तोडफोड केल्याची तक्रार त्यांनी दाखल केली आहे. आंदोलनादरम्यान त्यांच्या मोटरसायकलला आग लावण्यात आली, आणि त्यांची स्कूटरही खराब झाली. दंगेखोरांनी या भागातील इतर व्यवसाय व दुकानांचे सीसीटीव्ही कॅमेरे आणि साइनबोर्ड यांचीदेखील नासधूस केली. शहाणेंच्या तक्रारीवरून हल्ले पूर्वनियोजितपणे झाल्याचे दिसते. दंगेखोरांनी जाणूनबुजून व्यावसायिक आस्थापनांना लक्ष्य करत त्यांच्या सुरक्षा व्यवस्था नष्ट केल्या. शहाणेंचे एकूण नुकसान रू. 5,49,000 झाल्याचे त्यांनी सांगितले. गांधी पार्क परिसरातील एकूणच नुकसान मोठ्या प्रमाणावर होते. यामध्ये अमोल रामराव दहाळे, किरण प्रकाशराव शहाणे, गौरव दिलीपराव तापके आणि इतर व्यवसायिकांचे नुकसानही समाविष्ट आहे.

शहाणेंच्या शेजारच्या परिसरात केवळ लक्ष्य केलेल्या व्यवसायांचे नुकसान झाले नाही, तर त्यापेक्षा अधिक झाले. उदाहरणार्थ, रामकृष्ण मनोहरराव शहाणेंच्या गाडीची तोडफोड झाल्याची नोंद केली, तर अमोल अशोक राव कुळथे यांच्या दुकानाचे साइनबोर्ड आणि स्टील ग्रिडसह मोटरसायकलचेही नुकसान झाले. हाच दंगेखोरांचा पॅटर्न दिसून येतो. त्यांनी एकाच उद्देशाने व पॅटर्नने काम करत ठिकठिकाणी विध्वंस घडवून आणल्याचे स्पष्ट होते. त्यांच्यातील परस्पर समन्वय आणि तोडफोड व नुकसानीचे एकूण मोठे प्रमाण यावरून हा हिंसाचार एकाएकी अचानक घडलेला नसून, जाणीवपूर्वक जास्तीत जास्त नुकसान करण्याच्या उद्देशाने पूर्वनियोजितपणे आखलेला होता, असे दिसून येते.

गौरव दिलीपराव तापके आणि विलास खेरुडकर यांनीही त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक मालमत्तेच्या नुकसानीविषयी एफआयआर दाखल केले. यामध्ये इलेक्ट्रिक बाईक, मोटरसायकल आणि सीसीटीव्ही यंत्रणेचे नुकसान समाविष्ट होते. प्रत्येक घटनेतील नुकसान रू. 20,000 ते रू. 35,000 दरम्यान होते. सार्वजनिक ठिकाणी पार्क केलेल्या वाहनांची, विशेषतः धोदिराज

दंतोपंत शहाणे आणि आकाश प्रमोदराव शहाणे यांच्या वाहनांची, तोडफोड दंगेखोरांनी केली. या वाहनांना केवळ नुकसानच झाले नाही तर हेतुपुरस्सर तोडफोड करण्यात आली.

एफआयआरनुसार, गांधी पार्क परिसरातील व्यावसायिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. दुकानांचे साइनबोर्ड, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, आणि वाहनांचे नुकसान मिळून एकूण हानी रू. पाच लाखांपेक्षा जास्त आहे. दंगेखोरांनी सय्यद रिजवान सय्यद हनीफ यांच्या बेकरीवर हल्ला केला, सीसीटीव्ही कॅमेरे आणि नावाचे फलक नष्ट केले. तसेच, विलास खेरुडकर यांच्या सायकल दुकानातील सुरक्षा उपकरणांची तोडफोड केली. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या तोडफोडीमुळे व्यवसायांची असुरक्षितता अधिकच वाढली. केवळ मालमत्तेचे नुकसानच झाले नाही, तर सुरक्षा व्यवस्थेच्या अभावामुळे व्यवसायांना पुढेल धोका राहील.

**परभणी पोलिसांनी केलेल्या FIR मध्ये लावलेली कलमे:**

**सामान्य कलमे:**
पोलिसांनी दाखल केलेल्या आठ एफआयआरमध्ये काही सामान्य कलमांचा समावेश करण्यात आला आहे. ही कलमे खालीलप्रमाणे आहेत:

1. भारतीय न्याय संहिता (BNS):
    - कलम 189(2): बेकायदेशीर जमाव (पूर्वीच्या आयपीसीतील कलम 141).
    - कलम 126(2): चुकीची अडवणूक (पूर्वीच्या आयपीसीतील कलम 339).

2. महाराष्ट्र पोलीस अधिनियम:
    - कलम 135: नियमांचे किंवा कलम 37, 39 किंवा 40 च्या अंतर्गत दिलेल्या आदेशांचे उल्लंघन केल्याबद्दल दंड.

**इतर एफआयआर:**
एफआयआर क्रमांक 469, 589, 694, 695 मध्ये वापरलेली अतिरिक्त कलमे:

1. भारतीय न्याय संहिता (BNS):
    - कलम 326(f): जखम, पुर, आग किंवा स्फोटक पदार्थाद्वारे दुर्दैवी कृत्य (पूर्वीच्या आयपीसीतील कलम 435).
    - कलम 324(5): ₹1,00,000 किंवा त्याहून अधिक नुकसान करणारे दुर्दैवी कृत्य (पूर्वीच्या आयपीसीतील कलम 425).
    - कलम 223: सार्वजनिक अधिकाऱ्यांच्या आदेशांचे उल्लंघन (पूर्वीच्या आयपीसीतील कलम 188).
    - कलम 191(2): दंगल (पूर्वीच्या आयपीसीतील कलम 146).

- कलम 190: बेकायदेशीर जमावाचा सदस्य (पूर्वीच्या आयपीसीतील कलम 142).

**इतर काही एफआयआर (क्रमांक 591, 590, 588):**

1. फौजदारी कायदा (सुधारणा) अधिनियम:
    - कलम 7: एखाद्या व्यक्तीला त्याच्या नोकरी किंवा व्यवसायास हानी पोहोचवण्यासाठी छेडछाड करणे.

2. सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंध कायदा, 1984:
    - कलम 3: सार्वजनिक मालमत्तेला नुकसान करण्याचे दुर्दैवी कृत्य.
    - कलम 4: आग किंवा स्फोटक पदार्थाद्वारे सार्वजनिक मालमत्तेला जाणूनबुजून नुकसान.

3. भारतीय न्याय संहिता (BNS):
    - कलम 115(2): स्वेच्छेने दुखापत करणे (पूर्वीच्या आयपीसीतील कलम 323).
    - कलम 118(2): धोकादायक शस्त्रे किंवा हानिकारक साधनांचा वापर करून जाणूनबुजून दुखापत किंवा गंभीर दुखापत करणे (पूर्वीच्या आयपीसीतील कलम 326).
    - कलम 121(1): कर्तव्य बजावत असलेल्या सार्वजनिक सेवकाला दुखापत करणे (पूर्वीच्या आयपीसीतील कलम 332).
    - कलम 121(2): सार्वजनिक सेवकाला गंभीर दुखापत केल्याबद्दल शिक्षा (पूर्वीच्या आयपीसीतील कलम 335).
    - कलम 132: सार्वजनिक सेवकावर हल्ला किंवा गुन्हेगारी शक्तीचा वापर (पूर्वीच्या आयपीसीतील कलम 353).
    - कलम 352: शांतीभंग घडवण्यासाठी किंवा इतर अपराधासाठी उद्देशपूर्ण अपमान करणे (पूर्वीच्या आयपीसीतील कलम 504).

ही कलमे सार्वजनिक गोंधळ, मालमत्तेचे नुकसान, पोलीस व सार्वजनिक सेवकांवरील हल्ले, आणि इतर गंभीर आरोपांशी संबंधित आहेत.

# परिशिष्टे

# Annexures

1. **C**opy of Post Mortem/Forensic Report
2. Final Post Mortem Report (Divya Marathi dtd 22-1-2025)
3. List of FIRs lodged by Police between December 11-13, 2024
4. List of Private Complaints Filed by Victim survivors between December 19-24, 2024
5. Links to media reports and videos

# Annexure 1

## Copy of Post Mortem/Forensic Report

Department Of Forensic Medicine And Toxicology
GOVT. MEDICAL COLLEGE AND HOSPITAL, AURANGABAD 431001
Email-gmcafmt@gmail.com

PM ID: 2900/ 2024

PROVISIONAL POST-MORTEM REPORT cum MEDICAL CERTIFICATE OF CAUSE OF DEATH

Hereby certify that the deceased whose particulars are given below has been died (As per police inquest) on dated : **15-12-2024** at **06.49 am** at place **DECLARED DEAD at government hospital parbhani, state- maharashtra**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Requested by | MR. C. U. TELGAONKAR JMFC, COURT NO. 3, PARBHANI | | | | |
| Brought by | MR. VISHNU PAKWANE, NAIB TEHSILDAR, SDM OFFICE, PARBHANI | | | | |
| Police Station | NAWA MONDHA, PARBHANI | | | | |
| CR-ADR No. | 61/2024 | | | | |
| PM No. | **2900/ 2024** | Date of P.M. | 16-12-2024 | Time of P.M. | 08.00 AM To 11.00 AM |
| Name of Deceased | **SOMNATH VYANKAT SURYAWANSHI** | | | | |
| Address of Deceased | [redacted] | | | | |
| Gender | MALE Age : 35 YEARS | | Interval between on set & death approx. | For use of Statistical Office | |
| **Immediate Cause** State the disease, injury or complication which caused death, not the mode of dying such as heart failure, asthenia etc. | **(a.) SHOCK FOLLOWING MULTIPLE INJURIES** | | | | |
| **Antecedent Cause** Morbid conditions, if any, giving rise to the above Cause, stating underlying condition last | (b.)<br>(c.) | | | | |
| **Other Significant Conditions** contributing to the death but not related to the disease or conditions causing it | | | | | |
| **Manner of Death** PENDING INVESTIGATION | | | | | |
| If deceased was a female, was the death associated with pregnancy? NA<br>If yes, was there a delivery NA | | | | | |
| Remarks | ROUTINE VISCERA PRESERVED FOR CHEMICAL ANALYSIS, BLOOD SOAKED GAUZE PIECE FOR BLOOD GROUPING AND RH TYPING,ORGAN PIECES PRESERVED FOR HISTOPATHOLOGICAL EXAMINATION. FINAL OPINION WILL BE GIVEN AFTER RECEIPT OF REPORTS. IO IS INSTRUCTED TO SUBMIT PREVIOUS MEDICAL DOCUMENTS IF ANY. | | | | |

**1)**DR. TALKA RANJITH KUMAR (RESIDENT DOCTOR) **2)**DR R P THAKUR(RESIDENT DOCTOR)

**3)**DR. D.V. MASKE(RESIDENT DOCTOR) **4)**DR NITIN S NINAL(ASSISTANT PROFESSOR) **5)**DR. R.R. KHETRE(ASSOCIATE PROFESSOR) **6)**DR G.D. NITURKAR(ASSOCIATE PROFESSOR)

16/12/24 16/12/24 16/12/24

1. Original Certificate to concerned Police.
2. Copy to relative through Police while handling over the dead body.

# Annexure 2

## Final Post Mortem Report (Divya Marathi dtd 22-1-2025)



अकोला 22-01-2025

सुविचार
स्वप्नांची कालमर्यादा निश्चित असेल तर ती लक्ष्य बनते.

आपण वाचत आहात देशातील सर्वात विश्वासार्ह अन् प्रथम क्रमांकाचे वृत्तपत्र

# दिव्य मराठी

अकोला

divyamarathi.com | बुधवार | २२ जानेवारी २०२५ | १२ राज्ये | ६१ आवृत्त्या

**दिव्य मराठी इन्व्हेस्टिगेशन** • मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत सांगितले होते, मारहाणीमुळे नव्हे, तर श्वसनविकारामुळे मृत्यू; पण...

## पोलिस मारहाणीत मणक्यावर घाव बसल्याने सोमनाथचा मृत्यू

**डॉ. शेखर मगर** | छत्रपती संभाजीनगर

पोलिसांच्या मारहाणीनंतरच्या जखमांमुळेच परभणीच्या सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. सोमनाथच्या घाटीत केलेल्या शवविच्छेदन अहवालाचे संपूर्ण तपशील 'दिव्य मराठी'च्या हाती आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सोमनाथचा मृत्यू श्वसनाच्या विकाराने झाल्याचा दावा केला होता. शरीरावरील जखमाही जुन्याच असल्याचे म्हटले होते. अहवालातून मात्र मृत्यूचे खरे कारण स्पष्ट झाले.

### शवविच्छेदनाचा तपशील सर्वप्रथम 'दिव्य मराठी'कडे

| | | |
|---|---|---|
| PM No. | 2900/ 2024 | Date of P.M. |
| Name of Deceased | SOMNATH VYANKAT SURYAWANSHI | |
| Address of Deceased | SHANKAR NAGAR, PARBHANI TALUKA: PARBHANI DISTRICT: PARBHANI | |
| Gender | MALE | Age : 35 YEARS |
| Immediate Cause State the disease, injury or complication which caused death, not the mode of dying such as heart failure, asthenia etc. | (a.) SHOCK FOLLOWING MULTIPLE INJURIES | |
| Antecedent Cause Morbid conditions, if any, giving rise to the above Cause, stating underlying condition last | (b.) (c.) | |
| Other Significant Conditions contributing to the death but not related to the disease or conditions causing it | | |

छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयाचा शवविच्छेदन अहवाल

मानेवर व्रण
पाठीवर जखमा
स्पाइनला दुखापत
कंबरेवर जखमा
पोटरीवर जखमा

जबर मारहाणीमुळे सोमनाथ सूर्यवंशी यांना मानसिक धक्का बसला, मग त्यांचा कोठडीत मृत्यू झाला.

### मुख्यमंत्री म्हणाले होते, श्वसनाच्या आजारानेच मृत्यू

मुख्यमंत्री म्हणाले होते 'मॅजिस्ट्रेटच्या ऑर्डरची कॉपी माझ्याकडे आहे. मॅजिस्ट्रेटने त्यांना दोनदा विचारलं होतं की, पोलिसांनी मारहाण केली का? सोमनाथने नाही असं म्हटलं होतं. कोठडीत असतानाचे व्हिडिओही आहेत. त्यात त्यांना मारहाण झालेली दिसत नाही. त्याच्या शरीरावरील जखमा जुन्या आहेत. शवविच्छेदन अहवालात श्वसनविकाराने सोमनाथचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचे नमूद आहे!'

**२० डिसेंबर, स्थळ : विधानसभा**

### आधीपासून म्हणतोय पोलिसांनीच मारले

*'सोबत अटक असलेलेही सांगतात की, सोमनाथला पोलिसांनीच मारले होते. तरी मुख्यमंत्री म्हणतात श्वसनाचा आजार होता. पोलिसांना शिक्षा देण्याऐवजी ते त्यांना पाठीशी घालत आहेत.*- **प्रेमनाथ सूर्यवंशी**, सोमनाथचा भाऊ

### परभणीत संविधान प्रतिकृती तोडफोडीनंतरचा घटनाक्रम

**१० डिसेंबर :** संविधान प्रतिकृतीची माथेफिरूने तोडफोड केली होती.

**११ डिसेंबर :** घटनेच्या निषेधार्थ परभणी बंदची हाक दिली होती. दरम्यान, शहरात दंगल झाली. पोलिसांनी कोम्बिंग ऑपरेशन केले.

**१२ डिसेंबर :** दंगलीच्या संशयावरून एलएलबीचा विद्यार्थी सोमनाथला अटक केली. पोलिस कोठडीत त्याला मारहाण केली अन् नंतर कारागृहात डांबल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला होता.

**१३ डिसेंबर :** सोमनाथवर एकूण १६ गंभीर कलमांन्वये गुन्हे दाखल करून पोलिसांनी न्यायालयात नेले होते.

**१४ डिसेंबर :** मग रवानगी न्यायालयीन कोठडीत म्हणजेच परभणी जिल्हा कारागृहात केली.

**१५ डिसेंबर :** कारागृहातूनच नंतर रुग्णालयात नेले. डॉक्टरांनी तपासून सकाळी ६.४९ वा. मृत घोषित केले.

**१६ डिसेंबर :** घाटीच्या डॉक्टरांनी शरीरावरील जखमा अन् मानसिक धक्क्यातून मृत्यू झाल्याचे स्पष्ट केले.

## Annexure 3

List of FIRs lodged by Police between December 11-13, 2024

**588 FIR –11/12/2024 – 01:21 AM**

मी, बाबासाहेब बालासाहेब लोमटे वय-30 वर्षे व्यवसाय नोकरी पोशि/1417 ने. पोलीस ठाणे नवामोंढा परभणी

सरकार तर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, मी पोलीस स्टेशन नवामोंढा येथे पोलीस शिपाई या पदावर मागील तिन वर्षापासुन नेमणुकीस असुन चार्ली डयुटी करीत आहे.

आज दि.10/12/2024 रोजी मी पोलीस ठाणे नवामोंढा येथे चार्ली क्र. 06 वर सकाळी 08.00 ते 20.00 वा पावेतो कर्तव्यावर होतो. तसेच माझे सोबत चार्ली क्र. 04 पोशि/315 काळे व चार्ली क्र. 05 पोशि/411 रायभोळे हे देखील होते. आम्ही चार्ली डयुटी करत असताना अंदाजे 17.00 वाजता आम्हाला वायरलेस सेटवर माहिती मिळाली की, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी जवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ जमाव जमलेला असून तेथे एका ईसमास मारहाण करीत आहेत.

अशी माहिती मिळाल्याने मी सोबत चार्ली क्र. 04 पोशि/315 काळे व चार्ली क्र.05 पोशि/411 रायभोळे असे आम्ही तात्काळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ गेलोत. तेथे गेल्यावर आम्हास समजले की, आज 16.30 ते 17.00 वा. चे दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळयाचे समोर ठेवलेली प्रतिकात्मक संवीधान पुस्तीकेचे एका ईसमाने नुकसान केले म्हणुन तेथे जमलेला जमावा पैकी सात ते आठ जन सदर ईसमास मारहाण करीत होते.

मारहाणीमध्ये सदर ईसमाचे डोके फुटुन रक्त निघत होते. तसेच त्यास मुक्का मार देखील लागलेल्याचे दिसत होते. तसेच सदर ईसमास शिवीगाळ करुन जिवे माण्याची धमकी देत होते. म्हणुन आम्ही तात्काळ सदर ईसमास आमचे ताब्यात घेतले व मारणा-या ईसमांपासुन त्याची सुटका केली. सदर ईसमास त्याचे नाव, गाव विचारले असता त्याने त्याचे नाव दत्तराव सोपानराव पवार, वय-47 वर्षे अंदाजे, रा. मिर्झापुर ता.जि.परभणी असे सांगीतले.
आत्ता तात्काळ चेकची माहिती आम्ही पोलिस निरीक्षक श्री. शरद माझ्या साहेबांनी दिली. तेंव्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळया जवळ तात्काळ पोनि/मरे साहेब, सपोनि/बंदखडके पोउपनि/तुरनर, उपपनि/टर्के पोह/728 मुंढे, पोह/960 उगले, पोह/144 वाकळे, पोह/1152, पोह/1266,/5 पोह मुंढे, पोशि/१३४८ जोगदंड, पोशि/१४५६ उमर, पोशि/१५०६ यादव, पोशि/२७१

सय्यद असे आले. नंतर आम्ही पोनि श्री.मरे साहेबांना नेहमीच अस्तित्वभूत माहिती दिली की, एक ईसम नामे दत्तराव सोपानराव पवार, वय-47 वर्ष अंदाजे, रा.मिर्झापुर ता.जि.परभणी याने आज. 10/12/2024 रोजी 16.30 ते 17.00 वा पावेतोच्या दरम्यान डॉ.बाबासाहेब आंबेडकर समोर पुतळयाचे ठेवलेली प्रतिकात्मक संवीधान पुस्तीका काढुन पुस्तीकेचे नुकसान केले आहे.

त्यानंतर तेथे जमाव जमाव सात ते आठ जनांनी प्रधान ईसमास जमा केली. पुन्हा मापोनि मारे साहेबांचे आदेश तात्काळाने ईसमास घेतल्यानंतर एका उपचारकामी जिल्हा सामान्यपणे घडवून आणले. तरी आज दि. 10/12/2024 रोजी चे 16.30 ते 17.00 वा पावेतोच्या दरम्यान ईसम नामे दत्तराव सोपानराव पवार, वय-47 वर्षे अंदाजे, रा.मिर्झापुर ता.जि.परभणी याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळयाचे समोर ठेवलेली प्रतिकात्मक संविधान पुस्तीका काढुन सदर पुस्तीकेस खाली जमीनीवर पाडुन सदर संविधान पुस्तीकेचे नुकसान केल्याने तेथे जमलेल्या जमावातील सात ते आठ जनांनी मिळुन ईसम नामे दत्तराव सोपानराव पवार, वय-47 वर्षे अंदाजे, रा. मिर्झापुर ता.जि.परभणी यास मारहाण करुन त्याचे डोके फोडुन त्यास मुक्का मार देवून जखमी केले तसेच त्यास शिवीगाळ करुन जिवे माण्याची धमकी दिली तसेच त्यानी मा. जिल्हा अधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, परभणी. यांचे महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 37 (1) (3) जमाव बंदी आदेशाचे उल्लंघन केले म्हणुन माझी सदर ठिकाणच्या अनोळखी सात ते आठ ईसमांविरुध्द कलम 118(1),115(2), 352,351(2),189(2), 191(2),190 बी.एन.एस सहकलम 37 (1) (3)/135 म.पो.का प्रमाणे कायदेशीर फिर्यादी आहे. माझी फिर्याद माझे संगणे प्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली ती मी वाचुन पाहिली असता माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

फिर्याद दिली सही.

**589 FIR - 11/12/2024 - 01:57**

फिर्याद

दि.10/12/2024
मी कार्तिकेश्वर गुनाजी तुरनर, वय 30 वर्ष, व्यवसाय- नोकरी पोलीस उप निरीक्षक, नेमणुक- पोलीस ठाणे नवा मोढा परभणी

सरकार तर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी मागील चार महीन्यापासुन पोलीस उपनिरीक्षक या पदावर नेमणुकीस आहे.

आज दिनाक 10/12/2024 रोजी मी पोलीस ठाणे नवा मोढा परभणी येथे हजर असताना 16.30 ते 17.00 वाजण्याचे सुमारास आम्हास माहीती मिळाली की, डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा समोर काचामध्ये लावण्यात आलेली संविधान पुस्तीका ही कोणीतरी अज्ञात इसमाने फोडलेली असुन सदर ठिकाणी बरेच लोक जमा झालेले आहेत व ज्या इसमाने सदर संविधान पुस्तीका फोडली आहे अशा इसमास तेथील जमाव हा मारहाण करत आहे. अशी बातमी मिळाल्यानंतर मी लगेच सदर ठिकाणी गेलो. सदर ठिकाणी अनोळखी 80 ते 100 जणांचा जमाव जमलेला होता व जमावातील लोक हे एका इसमास मारहाण करत होते. त्यावेळी मी व तेथे हजर असलेले सपोनि बंदखडके साहेब, पोह/728 मुंढे, पोह/144 वाकळे, पोशि/1417 लोमटे,पोशि/315 काळे,पोशि/411 रायभोळे, पोशि/08 मुरकुटे व ईतर पोलीस अमंलदार अशा सर्वांनी मिळुन जमाव मारहाण करत असलेल्या इसमास आम्ही आमचे ताब्यात घेतले. सदर इसम यास जमावाने मारहाण केल्याने त्यास शासकिय वाहनामध्ये सरकारी दवाखाना येथे उपचार कामी पाठविले.

त्यानंतर तेथील जमावाने जयभिम च्या घोषणा देवुन 17.30 वाजण्याचे सुमारास डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळया जवळुन जाणारा परभणी ते वसमत हा राष्ट्रीय महामार्ग अडवुन रास्ता रोको आंदोलन केले व सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण केला. त्यानंतर वरीष्ठ अधिकारी व ईतर पोलीस स्टॉप मदतीला आल्यानंतर वरीष्ठ अधिकारी यांनी रास्ता रोको करणाऱ्या जमावास समजावुन सांगितल्याने अंदाजे 21.00 वाजण्याचे सुमारास त्यांनी रास्ता रोको आंदोलन मागे घेतले व ते तेथुन निघुन गेले.

तरी दि.10/12/2024 रोजीचे 17.30 ते 21.00 वाजण्याचे दरम्यान डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयाचे समोरील राज्य महामार्ग क्र.61 येथे वर नमुद अनोळखी 80 ते 100 जनांच्या जमावाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयाचे समोरील प्रतिकात्मक संविधान पुस्तीकाचे नुकसान केल्याचे निषेधार्थ गैरकायद्याची मंडळी जमऊन अचानक पणे विनापरवाना रस्ता उडवुन, बेकायदेशिर पणे रास्ता रोको आंदोलन केले. तसेच त्यांनी मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, परभणी. यांचे महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 37 (1) (3) जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केले म्हणुन वर नमुद आंदोलनकर्ते याचे विरुध्द माझी कलम 126 (2), 189(2), 191(2),190 बी.एन.एस. सहकलम 37 (1) (3)/135 महाराष्ट्र पोलीस कायदा प्रमाणे फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही

**694 FIR - 11/12/2024, 23:25**

फिर्याद

दिनांक. 11/12/2024

मी बाबासाहेब आश्रोबा बिक्कड वय 40 वर्ष पोना/889 ने. पो.स्टे. नानलपेठ परभणी जि.परभणी.

सरकार तर्फे फिर्यादी होवून फिर्याद देतो की, मी पो.स्टे. नानलपेठ येथे मागील 3 वर्षा पासून पोलीस नाईक या पदावर नेमणुकीस आहे.

दिनांक 10/12/2024 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा समोरिल लोखंडी स्टँडवर ठेवलेली प्रतिकात्मक संविधान पुस्तीकेची विटंबना झाल्याचे निषेधार्थ दिनांक 11/12/2024 रोजी परभणी बंद चे आवाहन दलीत संघटना तर्फे करण्यात आल्याची गोपनीय माहिती मिळाल्याने बंदोबस्त स्किम प्रमाणे संकाळी 08.00 वाजता पासुन पोलीस ठाणे हद्दित बंदोबस्त लावण्यात आला होता.

10.15 वाजताच्या सुमारास विसावा फाटा परभणी येथे 1) रुतीक ऊजागरे रा. नेहरु नगर परभणी 2) तुशार कांबळे रा. नेहरु नगर परभणी 3) सोमनाथ धोत्रे रा. नेहरु नगर परभणी 4) संजय कुमार खिल्लारे रा. भारत नगर परभणी 5) आकाश अंभोरे रा. नेहरु नगर परभणी 6) आकाश उजागरे रा. शाहु नगर परभणी 7) तुषार सोनकांबळे रा. शाहु नगर परभणी 8) रत्नदिप कांबळे रा. शाहु नगर परभणी 9) नागेश पैठणे रा. शाहु नगर परभणी 10) सुनिल भालेराव 11) रमाकांत हजारे 12) विजय व्हावळे 13) योगेश चव्हाण व इतर 40 ते 50 ईसम हे रस्ता रोका आंदोलन करीता जमले असतां मी व सपोनि/कारवार, पोह/685 पवार, पोशि/293 कांबळे, पोशि/1414 चव्हाण, पोशि/1710 जवादे असे बंदोबस्त करीता हजर असतांना आंदोलनकर्ते यांना रस्तारोको आंदोलन करु नका.

सध्या मा. जिल्हादंडाधिकारी साहेब परभणी यांनी जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये म्हणुन म.पो.का कलम 37 (1) (3)

नुसार जमावबंदी आदेश केलेले आहे असे आम्ही सागुन सुध्दा त्यांनी 10.00 ते 11.30 वाजे दरम्यान विसावा फाटा परभणी येथे गैरकायदयाची मंडळी जमा होवुन अचानक रस्तारोको आंदोलन केले.

तरी दिनांक 11/12/2024 रोजी 10.00 ते 11.30 वाजे दरम्यान विसावा फाटा परभणी येथे यातील 1) रुतीक ऊजागरे रा. नेहरु नगर परभणी 2) तुशार कांबळे रा. नेहरु नगर परभणी 3) सोमनाथ धोत्रे रा. नेहरु नगर परभणी 4) संजय कुमार खिल्लारे रा. भारत नगर परभणी 5) आकाश अंभोरे रा. नेहरु नगर परभणी 6) आकाश उजागरे रा. शाहू नगर परभणी 7) तुषार सोनकांबळे रा. शाहु नगर परभणी 8) रत्नदिप कांबळे रा. शाहु नगर परभणी 9) नागेश पैठणे रा. शाहू नगर परभणी 10) सुनिल भालेराव 11) रमाकांत हजारे 12) विजय व्हावळे 13) योगेश चव्हाण व इतर 40 ते 50 ईसम यांनी आम्ही दिलेल्या तोंडी आदेशाचे पालन न करता मा. जिल्हाधिकारी परभणी यांचे जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करुन गैरकायदयाची मंडळी जमा करुन रस्तारोको आंदोलन केले म्हणुन त्यांचे विरुध्द कलम 126(2), 189(2),190, 223 बिएनएस सह कलम 135 मपोका प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही

**590 FIR - 11/12/2024, 23:29**

दि.11/12/2024

मी बळीराम रामदास बंदखडके, वय 43 वर्ष, व्यवसाय सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे नवामोंढा, जि.परभणी सरकार तर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, काल दि.10/12/2024 रोजी 16.45 वाजण्याचे सुमारास स्टेशन रोड परभणी येथे असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळया समोरील प्रतिकात्मक संविधानपत्रीकेची नासधूस केल्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायांनी आज दि.11/12/2024 रोजी विजय वाकोडे, रवि सोनकांबळे, सुधीर साळवे यांच्या नेतृत्वात परभणी बंद पुकारला होता.

त्या अनुषंगाने पोलीस दलातर्फे शहरातील पो.स्टे.नानलपेठ, नवामोंढा व कोतवाली पो.स्टे.हद्दीत महत्वाचे ठिकाणी बंदोबस्त लावण्यात आला होता. पोस्टे नवामोंढा हद्दीमध्ये उघडा महादेव मंदीर, दत्तधाम परिसर, रेल्वे स्टेशन, गुलशन बाग कॉर्नर, एम.आय.डी.सी. कॉर्नर, काळी कमान, खानापुर फाटा या ठिकाणी फिक्स पॉईन्ट लावण्यात आला होता, फस्ट मोबाईल मध्ये श्री.शरद मरे साहेब व त्यांचे सोबत पोह/441 कटारे, पोह/717 टाक व सेकंड माबाईलमध्ये मी व माझे सोबत पोशि/08 मुरकुटे असे पेट्रोलींग करीता होतो व नमुद वेगवेगळया फिक्स पॉईंटवर अधिकारी व अंमलदार नेमण्यात आले होते.

आम्ही पेट्रोलीग दरम्यान सकाळी 10.00 वा सु पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना खानापुर फाटा, वसंतराव नाईक पुतळा, काळी कमान, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळया समोर असे काल दि. 10/12/2024 रोजी घडलेल्या घटनेच्या निषेधार्त ठिकठिकाणी लोकांचा बेकायदेशीर जमाव जमुन मुख्य रोडवर सार्वजणीक वाहतुकीस अडथळा निर्माण होईल या उद्देशाने हातामध्ये लाठया, काठया, लोखंडी पाईप घेवून रस्तारोको केला व सदर जमावातील लोक यांना आम्ही तुमचा जमाव बेकायदेशीर आहे तुम्ही सार्वजणीक वाहतुकीस अडथळा निर्माण करु नका असे अवाहण केले परंतु जमावातील लोकांनी आमचे आव्हाणाकडे दर्लक्ष करून त्यांनी त्यांचा रस्तारोको सुरुच ठेवला. दुपारी अंदाजे 11.45 वा.सु. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळया समोर बंदोबस्तावर असलेले पोउपनि/गिते यांनी आम्हाला पेट्रोलीग दरम्यान फोनद्वारे माहिती दिली की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळया समोर रस्तारोको जमलेले बेकायदेशीर जमावातील लोंक हे हातात लाठया, काठया, लोखंडी पाईप, दगड घेवून ते

डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळया समोर ते नारायण चाळ कडे जाणा-या रोड वरील लोकांच्या बंद असलेल्या दुचाकी, चारचाकी या वाहनांवर दगडफेक करुन काचा फोडल्या तसेच बंद दुकानांच्या शटरवर दगडफेक केली व वर असलेल्या दुकानांच्या नावांच्या बोर्डावर दगडफेक करुन नुकसान केले व सदर दुकानांचे दिसनारे काचा हे दगड मारुन फोड्न दगडफेक करीत आहेत असे आम्हाला सांगीतले.

तेंव्हा मी व माझ्या सोबतचा स्टाफ पोशि/08 मुरकुटे सह तात्काळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ गेलो. तेथे पोनि श्री.मरे साहेब व सोबतचा स्टाफ पोह/441 कटारे, पोह/717 टाक असे व गोपणीय अंमलदार सपोउपनि/कटारे व पोशि/815 मोहित पठाण असे हजर होते व नमुद ठिकाणी मा.पोनि दंतुलवार साहेब व त्यांचे सोबत स्ट्रायकींग अंमलदार हजर होते. सदर ठिकाणी स्था.गु.शा येथील पोनि / श्री.अशोक घोरबांड साहेब व सोबत स्टाफ असे सदर ठिकाणी हजर आले. तसेच आरसीपी अंमलदार यांची व्हॅन देखील सदर ठिकाणी हजर आली. त्याचप्रमाणे सदर ठिकाणी मा.उप विभागीय पोलीस अधिकारी श्री. डंबाळे साहेब सोबत त्यांचा स्टाफ हे देखील तेथे हजर आले. श्री.डंबाळे साहेब यांनी सदर जमावास शांततेचे आवाहण केले परंतु सदर जमावातील लोकांनी श्री. डंबाळे साहेब यांचे आवाहणा दुर्लक्ष करुन घोषणाबाजी करुन पोलीसांच्या दिशेने दगडफेक सुरु केली. नंतर आम्ही सर्व स्टाफ हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळया समोर ते नारायण चाळीकडे जाणा-या रोडवर असताना अंदाजे 500 पुरुष व 100 महिला असे बेकायदेशीर जमावातील लोकांनी बंद असलेल्या दुकानांच्या समोर प्लास्टीकचे बोअरवेल पाईप, रोडवर टाकुन जाळपोळ सुरु केली तेंव्हा सदर ठिकाणी अग्णीशामक दलास पाचारण करण्यात आले व सदर आगीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला.

सदर बेकायेशीर जमावातील लोकांनी महिलांना समोर करुन पोलीसांच्या दिशेने दगडफेक करण्यास सुरवात केली. सर्व जमावातील लोकांच्या हातात दगड,लाठया,काठया लोखंडी पाईप घेवुन होते जमावाने पोलीसांच्या दिशेने, शासकीय वाहनांवर, अग्नीशामक दलाच्या वाहनावर देखील दगडफेक कली त्यामध्ये मा.उप विभागीय पोलीस अधिकारी श्री. डंबाळे साहेब व पोस्टे नवामोंढा चे पोनि / श्री. शरद मरे साहेब, पोह/728 मुंढे, पोशि/1715 राखोंडे, पोह/1262 मोसीन, ने.क्युआरटी, मपोशि/723 अंकीता कदम ने. आरसीपीअसे पोलीस अधिकारी/अंमलदारसदर दगडफेकीमध्ये जखमी झाले. परत सदर जमावातील महिला व पुरुष हे मा.जिल्हाधिकारी, कार्यालयासमोर जमा झाले व तेथे जमावातील काही लोकांनी

दुकानासमोर लावलेली एक मोटार सायकल तोडुन सदर मोटार सायकल रोडवर आणुन तीची नासधूस करुन तिला आग लावली.

सदर ठिकाणी मा.अपर पोलीस अधिक्षक साहेब यांनी जमावातील लोकांना शांतता राखण्याचे आवाहन केले. मात्र सदर जमावातील लोकांनी त्यांच्या आवाहणाकडे दुर्लक्ष केले.

मा.जिल्हाधिकारी, परभणी यांनी सदर घटनेचे गांभीर्य पाहुन कलम 163 भा.ना.सु.स.प्रमाणे परभणी शहर व जिल्हयामध्ये सार्वजनिक ठिकाणी पाच पेक्षा जास्त व्यक्तींना जमा होण्यास प्रतिबंध करीत आहोत असे आदेश दुपारी 13.00 वा पावेतो ते पुढील आदेशापावेतो जारी केले. सदर आदेशाबाबत बेकायदेशीर जमावातील लोकांना मा. जिल्हाधिकारी, परभणी यांनी काढलेल्या आदेशाबाबत शासकीय वाहनातुन पी.ए.सिस्टीमद्वारे माहिती देण्यात आली, तरी सदर जमाव हा अतिउग्र होत होता व सदर जमावातील काही महिला हया शासकीय वाहनावर चढुन घोषणाबाजी करत होत्या. तसेच सदर जमावातील काही महिलांनी हातात लाठया व दांडुके घेवून मा.जिल्हाधिकारी परभणी यांचे कार्यालयात जावून तेथे कार्यालयातील शासकीय मालमत्तेचे नुकसान केले. सदर कार्यालयात महत्वाचे कागदपत्रांची फेकाफेकी करुन नासधूस केली. नंतर दुपारी 15.00 वा.सु. एसआरपीएफचे अतिरीक्त पोलीस बल सदर ठिकाणी आल्याने परिस्थीती नियंत्रणामध्ये आणली व जमाव नियंत्रण करतेवेळी जमावातील काही ईसम पळ काढताना पडले. यामध्ये बेकायदेशील जमावातील एकुण 31 पुरुष व 05 महिला यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांची नावे पुढील प्रमाणे 1) साई रामा नरवाडे, वय-23 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा. रेल्वे कॉटर न.62, आनंद नगर, परभणी 2) महादेव आश्रोबा नंदनवरे, वय-52 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.रामकृष्ण नगर, मारोती तिथेच्या घराजवळ, परभणी 3) किशोर खंडु बोराडे, वय-30 वर्ष, व्यवसाय-पेंटर, रा. लहुजी नगर, परभणी 4) सतिश रमेश भालेराव, वय-34 वर्ष, व्यवसाय-पानपट्टी चालक, रा. रमाबाई आंबेडकर नगर, हत्तीअंबिरे यांचे घराजवळ, परभणी 5) विनोद मधुकर दवने, वय-31 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.साखला प्लॉट, माऊली नगर, परभणी 6) आत्माराम शांताराम राऊत, वय-35 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा. गौतम नगर, परभणी 7) विशाल राजकुमार जंगले, वय- वय-21 वर्ष, रा. अहिल्याबाई होळकर नगर, परभणी 8) सुरज काशिराम खिल्लारे, वय-24 वर्ष, रा.बाबर कॉलनी, रमेश खिल्लारे यांचे घरी, परभणी 9) रमेश बाबुराव गोरे, वय-29 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा. भोगाव साबळे, ता.जि.परभणी 10) श्रीशांत भारत वाकळे, वय-19 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा. सुभेदार नगर, दर्गा रोड, पारवा गेट जवळ, परभणी 11) महेश बाबासाहेब कोकाटे, वय-20 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.आसेफ नगर, आसाराम बापुचे मठाजवळ, दर्गा जवळ, परभणी 12) चंद्रकांत पांडुरंग जोंधळे, वय-31 वर्ष, व्यवसाय-शेती, रा. मौजे-टाकळगाव, ता. जि.परभणी 13) सिध्दार्थ

अशोकराव काकडे, वय-35 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा. सिध्दार्थ नगर, समाज मंदीराचे जवळ, परभणी 14) अमोल तुकाराम जोंधळे, वय-28 वर्ष, व्यवसाय शिक्षण, रा. सरगम कॉलनी, हाडको, परभणी 15) सिध्दार्थ शंकर रायभोले, वय-40 वर्ष, व्यवसाय शिक्षण, रा. रमाबाई आंबेडकर नगर, बौध्द विहार जवळ, परभणी 16) किरण श्रीरंग जोंधळे, वय-27 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा. टाकळगव्हाण, ता. जि. परभणी 17) सोमनाथ व्यंकट सुर्यवंशी, वय-35 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.शंकर नगर, ऊर्दू शाळेच्या जवळ, परभणी 18) आदित्य विजय नंद, वय-22 वर्ष, व्यवसाय- मजुरी, रा. भिमनगर रेल्वेगेट जवळ, परभणी 19) रितेश संजु फोनसे, वय-20 वर्ष, व्यवसाय-शिक्षण, रा. अंजिठा नगर, कनकुटे दवाखान्याचे जवळ, परभणी, 20) संतोष आनंद खरे, वय-31 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा. सारंग नगर, बौध्द विहाराचे जवळ, खानापुर फाटा, परभणी 21) अमरदिप वसंत सोनकांबळे, वय-25 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा. साखला प्लॉट, माऊली नगर, परभणी 22) आशिष लिबंगजी बनसोडे, वय 19 वर्ष, व्यवसाय-शिक्षण, रा.हर्ष नगर, वांगी रोड, परभणी 23) सतिश बाबुराव जोगदंड, वय-24 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा. अशोक नगर, तांबोळी हॉस्पीटलचे जवळ, परभणी 24) किरण शामराव सावंत, वय-28 वर्ष, मजुर, रा. भिमनगर गेटच्या समोर, परभणी 25) राजु मोतीराम मोरे, वय-35 वर्ष, व्यवसाय मजुरी, रा.आनंद नगर, धार रोड, परभणी 26) भिमराव रघुनाथ तलवारे, वय-32 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा. राहुल नगर, समाज मंदीराचे जवळ, परभणी 27) रवि अचितराव काळे, वय-38 वर्ष, व्यवसाय-ऍटो चालक, रा. भिमनगर, समाज मंदीराचे जवळ, परभणी 28) सुनिल लिंबाजी आळणे, वय-43 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा. सिध्दार्थ नगर, हायात हॉस्पीटल जवळ, परभणी 29) रवि विजय पंडीत, वय-16 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.रहिम नगर, वसिम कबाडी याचे घराजवळ, परभणी. 30) विनोद संजय खिल्लारे, वय-16 वर्ष, दुधगाव, ता. जि. परभणी 31) करण किशन सरकटे, वय-17 वर्ष, व्यवसाय-शिक्षण रा.भारत नगर, झेंडयाचे जवळ, परभणी 32) ऋतुजा पंडीत भालेराव, वय-21 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा. भिमनगर, परभणी 33) पुजा आकाश जाधव, वय-27 वर्ष, रा. भिमनगर, परभणी 34) उन्नती प्रभाकर जोंधळे, वय-15 वर्ष, व्यवसाय-शिक्षण, रा. भिमनगर, परभणी 35) प्रतिक्षा दयानंद कनकुटे, वय-13 वर्ष, व्यवसाय-शिक्षण, रा. भिमनगर, परभणी 36) प्रिती दयानंद कनकुटे, वय- 16 वर्ष, व्यवसाय-शिक्षण, रा. भिमनगर, परभणी. तसेच सदर घटनेचे व्हिडीयो शुटींग व गोपणीय अंमलदारांमार्फत निष्पन्न करण्यात आलेले ईसमांची नावे पुढील प्रमाणे 37) अर्जुन पंडीत रा. रमाबाई नगर, परभणी 38) दत्ता नंद रा. एकरुखा ता. जि. परभणी 39) वैभव काकडे रा. भिम नगर, 40) अमित काळे रा. भिम नगर, परभणी 41) सचीन फुलवरे रा. भिम नगर, परभणी 42) अमोल भालेराव

रा. परसावत नगर, परभणी 43) पवन घाडगे, रा. भिम नगर, परभणी 44) पंकज वावले रा. तथागत नगर, परभणी 45) लखन जामकर रा. कृषी नगर, परभणी 46) सुनंदा सोनकांबळे रा.साकला प्लॉट, परभणी. 47) गुलाम मोहमद मिठु रा. दर्गा रोड परभणी तरी आज दि.11/12/2024 सकाळी 10.00 ते 15.00 वाजेचे दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळया समोरील प्रतिकात्मक संविधानाची विटंबना झाल्याचे निषेधार्थ 1) विजय वाकोडे 2) रवि सोनकांबळे 3) सुधीर साळवे यांच्या नेतृत्वात 4) साई रामा नरवाडे, वय-23 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा. रेल्वे कॉटर न.62, आनंद नगर, परभणी 5) महादेव आश्रोबा नंदनवरे, वय-52 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.रामकृष्ण नगर, मारोती तिथेच्या घराजवळ, परभणी 6) किशोर खंडु बोराडे, वय-30 वर्ष, व्यवसाय-पेंटर, रा. लहुजी नगर, परभणी 7) सतिश रमेश भालेराव, वय-34 वर्ष, व्यवसाय-पानपट्टी चालक, रा. रमाबाई आंबेडकर नगर, हत्तीअंबिरे यांचे घराजवळ, परभणी 8) विनोद मधुकर दवने, वय-31 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा. साखला प्लॉट, माऊली नगर, परभणी 9) आत्माराम शांताराम राऊत, वय-35 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा. गौतम नगर, परभणी 10) विशाल राजकुमार जंगले, वय- वय-21 वर्ष, रा. अहिल्याबाई होळकर नगर, परभणी 11) सुरज काशिराम खिल्लारे, वय-24 वर्ष, रा.बाबर कॉलनी, रमेश खिल्लारे यांचे घरी, परभणी 12) रमेश बाबुराव गोरे, वय-29 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा. भोगाव साबळे, ता. जि. परभणी 13) श्रीशांत भारत वाकळे, वय-19 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.सुभेदार नगर, दर्गा रोड, पारवा गेट जवळ, परभणी 14) महेश बाबासाहेब कोकाटे, वय-20 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.आसेफ नगर, आसाराम बापुचे मठाजवळ, दर्गा जवळ, परभणी. CCTNS ची शब्द मर्यादा संपल्याने उर्वरित फिर्याद याचे सोबत जोडलेली आहे.

**468 FIR - 12/12/2024 00:01 AM**

फिर्याद

दि 11.12.2024

मी सम्राट अजितराव कोरडे वय 46 वर्ष पोह 1018 पोस्टे कोतवाली परभणी

समक्ष पोस्टे ला फिर्याद देतो कि मी मागिल तीन वर्षापासुन पोस्टे कोतवाली येथे गोपनीय शाखेचे कामकाज करतो. दिनांक 12.12.2024 रोजी डा बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळील प्रतिकात्मक संविधान पुस्तिकेची एका इसमाने विठंबणा केली म्हणुन दि 11.12.2024 रोजी आंबेडकरी समाज वतीने सदर घटणेचा निषेध म्हणुन परभणी जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती.

सदर परभणी बंदच्या संदर्भाने पोस्टे हददीत योग्य तो बंदोबस्त लावण्यात आला होता. मी व माझे सोबती पोह150/ धंदे हददीत पेट्रोलींग करीत भिम नगर येथे पोहोचलो त्यावेळी तेथे पोनि ननवरे, श्रेणिपोउपनि मुंढे, पोह 1060/ ताटीकोंडलवार, 1463 दुधाटे, पोशि 396 पौळ हे हजर होते, तेथे काही लोक जमलेले होते. ते सदर घटणेचा निषेध म्हणुन रॅली काढण्याच्या विचारात होते त्यावेळी त्यांना आम्ही जिल्हाभरात मा. जिल्हाधिकारी साहेब यांचे जमावबंदी आदेश लागु असुन आपण कोणत्याही प्रकारची रॅली काढु नये अशा सुचना देण्यात आल्या होत्या परंतु त्यांनी आमचे काही एक न एकता भीम नगर येथील डा बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथुन अंदाजे 11.00 वाजता रॅलीस सुरुवात झाली.

सदर रॅलीमधे अजय रसाळ, वैभव काकडे, अविनाश अवचार, अमोल भालेराव, गंगाधर गायकवाड, विशाल सावंत, स्वरूप गाढे, दिपक पंडीत, प्रताप पंडीत, अर्जुन आळने, अरुण सोनवने, राहुल कांबळे, किरण सावंत सर्व रा. परभणी इत्यादी प्रमुख कार्यकर्ते व इतर 100 ते 125 जण सहभागी झाले होते, सदरची रॅली ही भिम नगर रेल्वे गेट पार करूण उडाण पुल संपणारे रस्त्यावर आली व तेथे परभणी ते जिंतुर व जिंतुर ते परभणी येणारे जाणारे रोडवर रास्ता रोको सुमारे 11.15 ते 11.45 वा. पर्यंत करुण रोडवरूण येणारे जाणारे पादचारी व

त्यांचे वाहणास येण्या जाण्यास अडथळा निर्मान करुण त्यानंतर रॅली घेवुन बसस्थानकाकडे जाणारे रोडने गेले. सदर घटणेचे आमचेकडील शासकीय कॅमे-यात चित्रीकरण केलेले आहे. तरी आज दि 11.12.2024 रोजी अजय रसाळ, वैभव काकडे, अविनाश अवचार, अमोल भालेराव, गंगाधर गायकवाड, विशाल सावंत, स्वरूप गाढे, दिपक पंडीत, प्रताप पंडीत, अर्जुन आळने, अरुण सोनवने, राहुल कांबळे, किरण सावंत, यांनी व इतर 100 ते 125 जनांनी सकाळी 11.00 वाजणेच्या सुमारास भिमनगर परभणी येथे गैरकायदयाची मंडळी जमवुन विनापरवाणा रॅली काढुन 11.15 ते 11.45 वा. पर्यंत जिंतुर रोडवर उडाणपुल संपणारे ठिकाणी मुख्य रस्त्यावर रास्ता रोको करुण रहदारीस अडथळा निर्मान केला व मा. जिल्हाधिकारी साहेब परभणी यांचे खबरदारी म्हणुन जमावबंदी आदेशाचे उलंघण केले म्हणुन वर नमुद लोकांविरुध्द माझी सरकारतर्फे कलम 189(2), 126(2) BNSसहकलम 135 मपोका प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

समक्ष

फिर्याद दिली सही

**0591 FIR - 12/12/2024 - 01:07 AM**

फिर्याद

दि.11/12/2024

मी अमृत अदिनाथ शिराळे, वय 34 वर्ष, व्यवसाय पोशि/765 ने. पोलीस ठाणे नवामोंढा, जि. परभणी

सरकार तर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, काल दि.10/12/2024 रोजी 16.45 वाजण्याचे सुमारास स्टेशन रोड परभणी येथे असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळया समोरील प्रतिकात्मक संविधानपुस्तीके नासधूस केल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायांनी आज दि.11/12/2024 रोजी परभणी बंद पुकारला होता. त्या अनुषंगाने पोलीस दलातर्फे शहरातील पो.स्टे.नानलपेठ, नवामोंढा व कोतवाली पो.स्टे.हद्दीत महत्वाचे ठिकाणी बंदोबस्त लावण्यात आला होता.

पोस्टे नवामोंढा हद्दीमध्ये उघडा महादेव मंदीर, दत्तधाम परिसर, रेल्वे स्टेशन, गुलशन बाग कॉर्नर, एम.आय.डी.सी. कॉर्नर, काळी कमान, खानापुर फाटा या ठिकाणी फिक्स पॉईन्ट लावण्यात आला होता, तसेच खानापुर फाटा या ठिकाणी पोह/1266 चुडावकर, पोशि/1206 यादव व स्ट्रॅकींग फोर्स क्र.1 पोउपनि चित्तरजन ढेमकेवाड, आ.गु.शा. परभणी व सोबत 08 अंमलदार होते त्यांचा फिक्स पॉईंट लावण्यात आलेला होता व माझी चार्ली क्र.4 ची मोटार सायकल एमएच 12 डब्लुएस 6146 वर सकाळी 08.00 वा ते रात्री 20.00 वा पावेतो पेट्रोलींग होती.

आज दि. 11/12/2024 रोजी सकाळी 10.00 वा पासुन खानापुर फाटा येथे दि. 10/12/2024 रोजी घडलेल्या घटनेच्या निषेधार्त लोकांचा बेकायदेशीर जमाव जमुन 40 ते 50 जनाच्या जमावाने मुख्य रोडवर सार्वजनीक वाहतुकीस अडथळा निर्माण होईल या उद्देशाने हातामध्ये लाठया, काठया, लोखंडी पाईप घेवून रस्तारोको केला. मी पेट्रोलींग दरम्यान 16.00 वाजातचे सुमारास खानापुर फाटा येथे आलो त्यावेळेस तेथे मा.उप विभागीय पोलीस अधिकारी साहेब श्री. डंबाळे साहेब यांनी रास्ता रोको करणा-या बेकायदेशीर जमावाला तुम्ही बेकायदेशीररित्या रस्तारोको करीत आहात व मा. जिल्हाधिकारी, परभणी यांनी कलम 163 भा.ना.सु.स.प्रमाणे

परभणी शहर व जिल्हयामध्ये सार्वजनिक ठिकाणी पाच पेक्षा जास्त व्यक्तींना जमा होण्यास प्रतिबंध करीत आहोत असे आदेश दुपारी 13.00 वा पासुन ते पुढील आदेशा पावेतो जारी केले अशा सुचना सदर ठिकाणच्या बेकायदेशीर जमावास दिल्या.

परंतु जमावाने मा.उप विभागीय पोलीस अधिकारी साहेब श्री. डंबाळे साहेब यांनी केलेल्या आवाहनाकडे दुर्लक्ष करुन त्यांचा रस्ता रोको चालुच ठेवला. त्या जमावातील काही लोकांनी घोषनाबाजी करुन अचाणकपणे पोलीसांवर दगडफेक सुरु केली. त्यावेळेस मी मा.उप विभागीय पोलीस अधिकारी साहेब श्री. डंबाळे साहेब यांना घेवून बाजुला झालो असता माझी चार्ली क्र. 04 ची मोटार सायकल पल्सर क्र एमएच 12 डब्लुएस 6146 ही जागेवरच रोडवर पडल्याने जमावातील लोकांनी माझ्या शासकीय मोटार सायकलवर मोठ्या दगडाने पेट्रोलच्या टाकीवर व समोरील भागस दगडाने ठेचुन अंदाजे 50,000/- रुपयाचे नुकसान केले. तसेच जमावाने केलेल्या दगडफेकीमध्ये माझ्या डाव्या पायाच्या गुडघ्याला व पोटरीला दगड लागुन मी जखमी झालो. तेवढयात तेथे एस.आर.पी.एफ चे अतिरीक्त पोलीस बल आल्याने परिस्थीती नियंत्रणामध्ये आणली व जमाव नियंत्रण करतेवेळी जमावातील काही ईसम पळ काढताना पडले. यामध्ये बेकायदेशील जमावातील एकूण 07 पुरुष व 01 महिला यांना ताब्यात घेण्यात आले.

त्यांची नावे पुढील प्रमाणे 1) गौतम शिवाजी थोरात, वय-18 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.प्रियदर्शनी नगर, परभणी 2) सोनु गोविंदराव खरात, वय-25 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.प्रियदर्शनी नगर, परभणी. मोबाईल नाही 3) शिवाजी श्रावण थोरात, वय-46 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.प्रियदर्शनी नगर, परभणी 4) भिमराव शिवाजी थोरात, वय-19 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.प्रियदर्शनी नगर, परभणी 5) सुमित रमेश खेबाडे, वय-30 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.प्रियदर्शनी नगर, परभणी 6) अनिल अंगदराव सावंत, वय-32 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.प्रियदर्शनी नगर, परभणी. 7) किरण प्रभु थोरात, वय-25 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा. प्रियदर्शनी नगर, परभणी 8) वत्सला भगवान मानवते, वय-50 वर्ष, व्यवसाय-परतानी यांचे दवाखान्यात मजुरी, रा.प्रियदर्शनी नगर, परभणी तसेच सदर घटनेचे व्हिडीयो शुटींग व गोपणीय अंमलदारांमार्फत निष्पन्न करण्यात आलेले ईसमांची नावे पुढील प्रमाणे 9) सुमीत भालेराव रा.प्रियदर्शनी नगर, परभणी 10) सुरज शेळके रा. परभणी 11) संदेश जाधव रा. खानापुर झोपडपटी परभणी 12) रवि कांबळे रा.परभणी 13) विशाल खंदारे 14) राहुल कांबळे रा.प्रियदर्शनी नगर, परभणी 15) आकाश मुस्तदार रा.प्रियदर्शनी नगर, परभणी 16) चंद्रमुनी

थोरात रा. खानापुर परभणी 17) शंड्या गवळे, रा. खानापुर परभणी 18) सुरज नरवाडे रा. प्रियदर्शनी नगर, परभणी 19) ओमकार रेखाटे रा. प्रियदर्शनी नगर, परभणी 20) अशोक वायवळ रा.परभणी. 21) नितीन डबडे रा. प्रियदर्शनी नगर, परभणी

तरी आज दि.11/12/2024 सायंकाळी 16.00 वा पावेतोच्या दरम्यान खानापुर फाटा, वसमत रोड परभणी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळया समोरील प्रतिकात्मक संविधानाची विटंबना झाल्याचे निषेधार्थ करीत असलेल्या रस्ता रोको दरम्यान 1) गौतम शिवाजी थोरात, वय-18 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.प्रियदर्शनी नगर, परभणी 2) सोनु गोविंदराव खरात, वय-25 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.प्रियदर्शनी नगर, परभणी. मोबाईल नाही 3) शिवाजी श्रावण थोरात, वय-46 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.प्रियदर्शनी नगर, परभणी 4) भिमराव शिवाजी थोरात, वय-19 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.प्रियदर्शनी नगर, परभणी 5) सुमित रमेश खेबाडे, वय-30 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.प्रियदर्शनी नगर, परभणी 6) अनिल अंगदराव सावंत, वय-32 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.प्रियदर्शनी नगर, परभणी. 7) किरण प्रभु थोरात, वय-25 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा. प्रियदर्शनी नगर, परभणी 8) वत्सला भगवान मानवते, वय-50 वर्ष, व्यवसाय-परतानी यांचे दवाखान्यात मजुरी, रा.प्रियदर्शनी नगर, परभणी तसेच सदर घटनेचे व्हिडीयो शुटींग व गोपणीय अंमलदारांमार्फत निष्पन्न करण्यात आलेले ईसमांची नावे पुढील प्रमाणे 9) सुमीत भालेराव रा.प्रियदर्शनी नगर, परभणी 10) सुरज शेळके रा.परभणी 11) संदेश जाधव रा. खानापुर झोपडपटी परभणी 12) रवि कांबळे रा.परभणी 13) विशाल खंदारे 14) राहुल कांबळे रा.प्रियदर्शनी नगर, परभणी 15) आकाश मुस्तदार रा.प्रियदर्शनी नगर, परभणी 16) चदमुनी थोरात रा. खानापुर परभणी 17) शंड्या गवळे, रा.खानापुर परभणी 18) सुरज नरवाडे रा. प्रियदर्शनी नगर, परभणी 19) ओमकार रेखाटे रा. प्रियदर्शनी नगर, परभणी 20) अशोक वायवळ रा.परभणी. 21) नितीन डबडे रारा. प्रियदर्शनी नगर, परभणी यांनी व इतर 20 ते 25 ईसमांनी गैरकाद्याची मंडळी जमवुन बेकायदेशीररित्या रस्तारोको करुन पोलीसांवर दगडफेक करुन कर्तव्यात अडथळा आणला. त्यामध्ये माझी चार्ली क्र. 04 ची मोटार सायकल पल्सर क्र एमएच 12 डब्लुएस 6146 ही जागेवरच रोडवर पडल्याने जमावातील लोकांनी माझ्या शासकीय मोटार सायकलवर मोठ्या दगडाने पेट्रोलच्या टाकीवर व समोरील भागस दगडाने ठेचुन अंदाजे 50,000/- रुपयाचे नुकसान केले. तसेच जमावाने केलेल्या दगडफेकीमध्ये माझ्या डाव्या पायाच्या गुडघ्याला व पोटरीला दगड लागल्याने मी जखमी झालो व वरील जमावातील लोकांनी शासकीय कामामध्ये अडथळा निर्माण केला. तसेच जमावातील लोकांनी मा. जिल्हाधिकारी परभणी यांचे कलम 37 (1) (3) मपोका व कलम 163 बी.एन.एस.एस प्रमाणे जामावबंदीचे आदेशाचे उल्लंघन केले. म्हणुन माझी वर नमुद बेकायदेशीर जमावातील

ईसमांवर कलम 132, 121(1), 121(2), 118(1), 324(4), 223, 126(2), 189(2),191(2), 191(3), 190, 191(2) भा. न्या. सं सहकलम 135 म.पो.का. सहकलम 3,4 सार्वजनीक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक अधिनियम सहकलम 7 फौजदारी कायदा दुरुस्ती कायदा 1932 प्रमाणे फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही
अमृत अदिनाथ शिराळे,

**469 FIR - 12/12/2024 - 19”02 PM**

फिर्याद

दि.11.12.2024

मी शेख असलम शेख एकबाल वय 30वर्ष, व्यवसाय व्यापार, जात मुस्लीम रा.बरकत नगर परभणी.

समक्ष पोस्टे कोतवाली येथे हजर येवुन तोंडी सांगुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी मी माझे आइ-वडील, पत्नी व तिन मुले असे एकत्र राहतोत. मी मागील चार वर्षा पासुन बस स्थानकाच्या शेजारील असलेल्या रोड लगत साइ मेडीकलच्या समोरील बाजुस वेग वेगळी फळे विक्री करण्याचा व्यवसाय करतो.माझा त्याठिकानी आलमारी पध्दतीचा गाडा असुन तो बंदीस्त असल्याने त्याच्या ठिकानी थांबुन असतो.त्या गाडया मध्ये फळे ठेवण्यासाठी जाग असुन सध्या मी सफरचंद, केवी, ड्रॅगनफुट, केळी, नारळ, इंपोर्टेट अंगुर इत्यादी फळे, विक्री करत आहे.

दिनांक 09/12/2024 रोजी रात्री 08.00 वाजे पावेतो फळ विक्रीचा व्यवसाय करुन फळांचा गाडा बंद करुन त्याला लाक लावुन मी घरी गेलो होतो.त्यावेळी अलामारी मध्ये अंदाजे 10,000/-रुपयेची फळे ठेवलेली होती.दि.10/12/2024रोजी बागलादेशा मध्ये हिंदु लोकावर हाणा-या आन्याच्या विरोधात हींदु समाजाचा मार्चा असल्याने त्यांदिवसी मी गाडा उघडला नाही. तसेच दि.11/12/2024 रोजी आंबेडकरी समाजाच्या वतीने संविधानच्या पुस्तकेची विटंबनेच्या निषेधार्थ बंद पुकारल्याने त्यादिवशी ही मी माझा फळाचा गाडा व्यापारासाठी उघडला नव्हता.

दुपारी अंदाजे 01.00 वाजण्याच्या सुमारास मला माझ्या मित्राने फोन करुन सांगीतले की, बस स्थानका शेजारी तोडफोड चालु आहे तु तुझया गाड्या कडे जावुन बघ असे कळवील्याने मी लग्गेच बस स्थानका जवळ जावुन पाहीले असता त्या ठिकानी माझा गाडा व त्यावरील अलमारी रोडवर पडलेली होती व ती जळत असताना मला दिसली त्या ठिकानी 25 ते 30लोक हातामध्ये काठ्या घेवुन दुस-या दुकानांची व गाड्यांची तोडफोन करीत जात असताना मला दिसले.

त्यांतील ब-याच लोकांनी त्यांच्या तोंडाला कपडा बांधलेला होता मी माझ्या गाड्या जवळ जावुन पाहीले असता आलमारीत आसलेल्या 10,000/-रुपये किमतीच्या सर्व फळाचे नुकसान झालेले दिसले तसेच आलमारी व गाडयाचे अंदाजे 20,000/-रुपये किमतीचे तोडफोडी मुळे व जाळल्यामुळे नुकसान झाल्याचे दिसले.

दि.11.12.2024 रोजी दुपारी अंदाजे 01.00 वाजण्याच्या सुमारास संविधानच्या पुस्तकेची विटंबनेचा निषेध करण्यासाठी आलेल्या 25 ते 30 अनोळखी लोकांनी माझा परभणी बस स्थानकाच्या शेजारील असलेल्या रोड लगत साइ मेडीकलच्या समोरील बाजुस असलेला वेग वेगळी फळे विक्री करण्याचा आलमारी पध्दतीचा गाडा जाळुन व त्याची तोडफोड करुन आलमारीत आसलेल्या 10,000/-रुपये किमतीच्या सर्व फळाचे तसेच आलमारी व गाडयाचे अंदाजे 20,000/-रुपये किमतीचे तोडफोड व जाळुन नुकसान केले.

तसेच माझ्या गाड्या शेजारी असलेल्या काही अंतरावरील डॉ. प्रसाद कलकोटे, यांच्या होंडा सिटी कारचे पाठीमोगचा काच,साइड ग्लास,फोड्डुन अंदाजे 08 ते 10 हजाराचे नुकसान केले असल्याचे दिसले. तसेच इतर दुकानाचे व गाडयांचे तोडफोड करुन नुकसान केले आहे म्हणुन माझी त्या अनोळखी 25 ते 30 व्यक्तीविरूध्द तक्रार असुन त्यांच्या विरुध्द कारवाइ होणेस विनंती आहे.

माझा वरील जवाब माझ्या सांगण्याप्रमाणे संगणकावर टाइप केला असुन तो मी वाचुन पाहीला असुन तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष

फिर्याद दिली सही.

**695 FIR - 13/12/2024 - 23:54 PM**

फिर्याद

मी, प्रदीप दिगांबरराव शहाणे, वय 58 वर्ष, व्यवसाय-व्यापार, रा. गांधी पार्क, परभणी समक्ष पोलीस स्टेशन नानलपेठ येथे येवुन तोंडी सांगुन फिर्यादी देतो की,मी वरिल ठिकाणचा राहणारा असुन माझे गांधी पार्क परभणी येथे शरद दिगांबरराव शहाणे सुवर्णकार हे सराफा दुकान आहे. सदर दुकान मी स्वतः चालवतो. माझ्या दुकानाचे वरच माझे राहते घर आहे.

दि.10.12.2024 रोजी परभणी येथील रेल्वे स्टेशन रोड परभणी येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळयासमोरील प्रतिकात्मक संविधान पत्रिकेची नासधूस केल्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे अनुयायांनी दि.11.12.204 रोजी परभणी बंद पुकारला होता. त्यामुळे परभणी शहरातील सर्व व्यापा-यानी दुकाने बंद ठेवली.त्याप्रमाणे गांधी पार्क,स्टेशन रोड येथील सर्व दुकाने बंद होती.

दि.11.12.2024 रोजी सकाळी 11.30 वाजण्याच्या सुमारास मी माझे घरी असताना माझे दुकानाचे समोर असलेल्या रोडवर बंद पुकारलेला जनसमुदाय अंदाजे 40 ते 50 हा बाबासाहेब आंबेडकराचा विजय असो व संविधान अमर रहे अश्या मोठ मोठयाने घोषणा देत व हातात लाकडी काठ्या घेवुन रोडवरील दुकानाचे बोर्डची तोडफोड करत व रोडवर उभ्या असलेल्या वाहनाची मोडतोड करत होते.

त्यांनी सर्वानी तोडफोड करुन तेथुन निघुन गेल्यावर मी घरातुन खाली रोडवर येवुन पाहिले असता माझ्या दुकानासमोर माझी उभी केलेली स्पेंल्डर मोटार सायकल क्र.एमएच-22,डब्ल्यु-9091 हिला बंद पुकारलेल्या लोकानी आग लागुन दिल्याने ती जळत होती तेव्हा मी व तेथील इतर लोकानी मोटार सायकलवर पाणी टाकुन विझवली. तसेच मोटार सायकलचे बाजुला उभी असलेली माझी होंडा कंपनीची अॅक्टीवा स्कुटी क्र.एमएच-22,एएफ-5674 हीचा समोरील भाग फोडण्यात आलेला दिसला.माझ्या मोटार सायकलला आग लावुन जाळुन अंदाजे 25000 रुपयाचे व अॅक्टीवाची तोडफोड करुन 15000 रुपयाचे नुकसान केले.

माझ्या दुकानासमोर गांधीपार्क येथील बरेच दुकानदार आले असता मी व त्यासर्वानी माहिती

घेतली असता नारायण चाळ ते गांधी पार्क पर्यत असलेल्या बरेच दुकानाचे नेमबोर्ड, सिसिटिव्ही कॅमेरे व दुकानासमोरील मोटार सायकल असे त्या जनसमुदायाने लाकडी काठया व लोंखडी पाईपने मारुन तोडफोड केली आहे. त्या सर्वाची माहिती खालील प्रमाणे आहे.

1) अमोल रामराव डहाळे यांचे अमोल ज्वेलर्स, गांधी पार्क या बंद दुकानाचे ठिकाणचे दोन सिसिटिव्ही कॅमेरा व साईन बोर्ड याची तोडफोड करुन अंदाजे 90,000 रुपयाचे नुकसान केले.
2) किरण प्रकाशराव शहाणे यांचे किरण ज्वेलर्स, गांधी पार्क या बंद दुकानाचे ठिकाणचे एक सिसिटिव्ही कॅमेरा व ॲक्रॉलिक बोर्ड याची तोडफोड करुन अंदाजे 25,000 रुपयाचे नुकसान केले.
3) गौरव दिलीपराव तपके, रा. गांधी पार्क परभणी यंगची गांधी पार्क येथे उभी असलेली इलेक्ट्रीक बाईक हिची तोडफोड करुन अंदाजे 20,000 रुपयाचे नुकसार केले.
4) सचिन विष्णु टेहरे, यांचे वरद ज्वेलर्स, दुकान नंबर 8 गांधी पार्क या बंद दुकानाचे ठिकाणचे दोन
सिसिटिव्ही कॅमेरा व निवा साईन बोर्ड याची तोडफोड करुन अंदाजे 60,000 रुपयाचे नुकसान केले.
5) अनिल दंतोपंत शहाणे यांचे गांधी पार्क येथील राहते घराची काच व स्टील ग्रील यांची तोडफोड करुन अंदाजे 12,000 रुपयाचे नुकसान केले.
6) संकेत तुषार शहाणे यांचे श्रीकृष्ण ज्वेलर्स, गांधी पार्क या बंद दुकानाचे ठिकाणचे एक सिसिटिव्ही कॅमेरा, ॲक्रॉलिक डिटीटल बोर्ड व एक फोकस याची तोडफोड करुन अंदाजे 35,000 रुपयाचे नुकसान केले.
7) रामकृष्ण मनोहरराव शहाणे, रा. गांधी पार्क परभणी यंत्राचे राहते घरासमोर त्यांची उभी केलेली मारोती सुझुकी रियाज या कारची काच,साईड ग्लास व बोनेट याची तोडफोड करुन अंदाजे 50,000 रुपयाचे नुकसार केले.
8) अमोल अशोकराव कुल्थे यांचे पांगरकर ज्वेलर्स गांधी पार्क या बंद दुकानाचे ठिकाणचे डिजीटल बोर्ड, स्टील ग्रीड व त्याची मोटार सायकल क्र. एमएच-22, एएफ-7908 या सर्वाचे तोडफोड करुन अंदाजे 35,000 रुपयाचे नुकसान केले.
9) धोडीराज दंतोपंत शहाणे यांचे गांधी पार्क येथील राहते घरासमोर उभी असलेली स्कुटी लेझर हिरो होडा क्र.एमच-22, डब्ल्यु-2316 हिची तोडफोड करुन अंदाजे 20,000 रुपयाचे नुकसान केले.

10) आकाश प्रमोदराव शहाणे यांचे प्रमोद रत्नाकरराव शहाणे सराफा दुकान गांधी पार्क यांचे बंद दुकानाचे ठिकाणचे डिजीटल बोर्ड व दुकानासमोरील दोन स्कुटर क्र.1) एमएच-22,बीडी-2170 2) एमएच-22,एएस-8912 यांची तोडफोड करुन अंदाजे 35,000 रुपयाचे नुकसान केले.

11) मोहन शिवाजीराव गरुड रा. पिंगळी, ता.जि-परभणी यांची मोटार सायकल क्र.एमएच-26,बिएफ-3478 ही रामकृष्ण शहाणे ज्वेलर्स, मुल्ला मस्जीद या बंद दुकानासमोर लावलेली असताना तिची तोडफोड करुन अंदाजे 35000 रुपयाचे नुकसान केले आहे.

12) राजेश माधवराव सवनेकर, रा. देवाशीष पेट्रोल पंपामागे गंगाखेड रोड परभणी यांची होंडा ॲक्टीवा स्कुटी क्र.एमएच-22, एझेड-8716 ही गांधी पार्क येथील शेळके बार समोर लावलेली असताना तिची तोडफोड करुन अंदाजे 30000 रुपयाचे नुकसान केले आहे.

13) सय्यद रिजवान सय्यद हनीफ यांचे नारायण चाळ येथील हुस्टर बेकरीचे ठिकाणचे दोन सिसिटीव्ही कॅमेरे व नेमबोर्ड यांची तोडफोड करुन अंदाजे 22000 रुपयाचे नुकसान केले.

14) विलास खेरुडकर यांचे प्रदिप सायकल स्टोअर्स या स्टोअर्सचे ठिकाणचे तिन सिसिटीव्ही कॅमेरे, खिडकीची काच, हॅलोजन लाईट, बोर्ड यांची तोडफोड करुन अंदाजे 80,000 रुपयाचे नुकसान केले.

तरी दि.11.12.2024 रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे अनुयायांनी पुकारलेल्या परभणी बंद अनुषंगाने अज्ञात 40 ते 50 असलेल्या जनसमुदाय यांनी सकाळी 11.30 ते दुपारी 12.30 दरम्यान नारायण चाळ ते गांधी पार्क दरम्यान घोषणा देत व हातात लाकडी काठ्या घेवुन रोडवरील व्यापा-यांनी बंद केलेल्या दुकानाचे नेमबोर्डची तोडफोड करत व रोडवर उभ्या असलेल्या वाहनाची तोडफोड केली. तसेच माझी मोटार सायकल जाळली व स्कुटीची तोडफोड करुन असे एकुण 5,49,000 रुपयाचे नुकसान केले आहे. तसेच त्या लोकांनी इतरही काही बंद दुकानाचे ठिकाणचे सिसिटिव्ही कॅमेरा, नेमबोर्ड व वाहनाची सुध्दा तोडफोड केलेली आहे.त्या सर्वावर कारवाई करण्यात यावी म्हणुन माझी तक्रार आहे.

माझी फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टाईप केली ती मी वाचुन पाहिली बरोबर व खरी आहे.

समक्ष

फिर्याद दिली सही

# Annexure 4

List of Private Complaints Filed by Victim survivors between December 19-24, 2024

दिनांक :- १८-१२-२०२४

प्रति
माननीय पोलीस निरीक्षक साहेब,
मोंढा पोलीस स्टेशन, परभणी

मी फिर्यादी नामे श्रीमती विजयाबाई व्यंकट सुर्यवंशी वय 60 वर्ष धंदा मजुरी रा. रामलिंग मुदगड ता. विलंगा जि. लातूर येथील रहीवाशी असून माझे पती सहा वर्षापुर्वी वारले. मला तीन मुले व एक मुलगी आहे. त्यापैकी माझा मोठा मुलगा सोमनाथ व्यंकट सुर्यवंशी यंदा शिक्षण हा परभणी येथील शिवाजी महाविद्यालयामध्ये कायद्याच्या तिसऱ्या वर्षात शिक्षण घेत होता, तो शंकरनगर परभणी येथे खोली किरायाने राहत होता.

दिः 15/12/2024 रोजी परभणी पोलीस या मो नं वरून अंदाजे सकाळी ९:०० वाजता फोन आला त्यांनी मला फोन वर सांगीतले की, तुमचा मुलगा सोमनाथ हार्ट अटॅक ने मरण पावला असून तुम्ही त्याची बॉडी घेऊन जाण्यासाठी परभणी येथे येऊन बॉडी घेऊन जावे. त्यामुळे मी अंदाजे दुपारी एक च्या सुमारास मुले व माझी बहीण व मेहुणे परभणीच्या सरकारी दवाखान्यात येण्यासाठी निघालो.

परभणीच्या जवळ आल्यानंतर अंदाजे रात्री साडेनऊच्या दरम्यान मला समजले की माझ्या मुलाचे प्रेत घाटी रूग्णालयात नेले आहे त्यामुळे मी व माझे मुले, बहीण व मेहुणा असे औरंगाबाद येथे जाण्यासाठी निघालो असता परभणी येथील पोलीस कर्मचारी यांनी आम्हाला अडवून परभणी येथील पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये आणले त्या ठीकाणी पोलीस अधीकारी यांनी मला म्हणाले आम्ही तुमच्या मुलास मारले नाही तो अटॅक नी वारला आहे व तुम्हाला आम्ही मदत करतो तुमच्या एका मुलास पोलीस प्रशिक्षण देतो.

तुम्ही मुलाचे प्रेत गावी घेऊन जा असे माझ्याजवळ बसलेले पोलीस अधीकारी घोरबांड यांनी सांगीतले आम्ही त्यांचे न ऐकता त्या ठीकाणाहून निघून औरंगाबादला गेलो, त्या ठिकाणी माझ्या मुलाचे पोस्टमार्टम केले त्यानंतर तेथे हजर असलेले कार्यकर्ते यांनी मला सांगितले की PM रिपोर्टमध्ये पोलिसांनी मारहाण केल्यामुळे सोमनाथचा मृत्यू झाला आहे असे सांगीतले.

तरी माझ्या मुलाला मोंढा पोलीस स्टेशन मध्ये लॉकअप मध्ये पोलिसांनी सतत तिन दिवस मारहाण केल्यामुळे त्याचे निधन झाले आहे. माझ्या मुलाच्या निधनास मोंढा पोलीस स्टेशनमधील अधीकारी व कर्मचारी है जबाबदार आहेत. तरी त्यांच्यावर योग्य तो गुन्हा नोंद करून कार्यवाही करावी.

फिर्यादी नि.अ. विजयाबाई व्यंकट सूर्यवंशी

दिनांक :- १८-१२-२०२४

प्रति

माननीय जिल्हा पोलीस अधीक्षक साहेब
जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी

मी फिर्यादी नामे श्रीमती विजयाबाई व्यंकट सुर्यवंशी वय 60 वर्ष धंदा मजुरी रा. रामलिंग मुदगड ता. विलंगा जि. लातूर येथील रहीवाशी असून माझे पती सहा वर्षापुर्वी वारले. मला तीन मुले व एक मुलगी आहे. त्यापैकी माझा मोठा मुलगा सोमनाथ व्यंकट सुर्यवंशी यंदा शिक्षण हा परभणी येथील शिवाजी महाविद्यालयामध्ये कायद्याच्या तिसऱ्या वर्षात शिक्षण घेत होता, तो शंकरनगर परभणी येथे खोली किरायाने राहत होता.

दिः 15/12/2024 रोजी परभणी पोलीस या मो नं वरून अंदाजे सकाळी ९:०० वाजता फोन आला त्यांनी मला फोन वर सांगीतले की, तुमचा मुलगा सोमनाथ हार्ट अटॅक ने मरण पावला असून तुम्ही त्याची बॉडी घेऊन जाण्यासाठी परभणी येथे येऊन बॉडी घेऊन जावे. त्यामुळे मी अंदाजे दुपारी एक च्या सुमारास मुले व माझी बहीण व मेहुणे परभणीच्या सरकारी दवाखान्यात येण्यासाठी निघालो.

परभणीच्या जवळ आल्यानंतर अंदाजे रात्री साडेनऊच्या दरम्यान मला समजले की माझ्या मुलाचे प्रेत घाटी रूग्णालयात नेले आहे त्यामुळे मी व माझे मुले, बहीण व मेहुणा असे औरंगाबाद येथे जाण्यासाठी निघालो असता परभणी येथील पोलीस कर्मचारी यांनी आम्हाला अडवून परभणी येथील पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये आणले त्या ठीकाणी पोलीस अधीकारी यांनी मला म्हणाले आम्ही तुमच्या मुलास मारले नाही तो अटॅक नी वारला आहे व तुम्हाला आम्ही मदत करतो तुमच्या एका मुलास पोलीस प्रशिक्षण देतो.

तुम्ही मुलाचे प्रेत गावी घेऊन जा असे माझ्याजवळ बसलेले पोलीस अधीकारी घोरबांड यांनी सांगीतले आम्ही त्यांचे न ऐकता त्या ठीकाणाहून निघून औरंगाबादला गेलो, त्या ठिकाणी माझ्या मुलाचे पोस्टमार्टम केले त्यानंतर तेथे हजर असलेले कार्यकर्ते यांनी मला सांगितले की PM रिपोर्टमध्ये पोलिसांनी मारहाण केल्यामुळे सोमनाथचा मृत्यू झाला आहे असे सांगीतले.

तरी माझ्या मुलाला मोंढा पोलीस स्टेशन मध्ये लॉकअप मध्ये पोलिसांनी सतत तिन दिवस मारहाण केल्यामुळे त्याचे निधन झाले आहे. माझ्या मुलाच्या निधनास मोंढा पोलीस स्टेशनमधील अधीकारी व कर्मचारी है जबाबदार आहेत. तरी त्यांच्यावर योग्य तो गुन्हा नोंद करून कार्यवाही करावी.

फिर्यादी नि.अ. विजयाबाई व्यंकट सूर्यवंशी

दिनांक : 19/12/2024

पोलीस निरीक्षक साहेब

पोलीस स्टेशन नवा मोंढा परभणी.

फिर्याद

मी नाव धम्मदिप जनार्धन मोगले वय-33 वर्षे. व्यवसाय-शिक्षण, रा. आरोग्य कॉलनी ता. जी. परभणी येथील रहिवाशी असुन माझे शिक्षण D.T.ed, B.A., B.ed MA.med, झालेले आहे व मी सरकारी नोकरी मिळविण्यासाठी मी स्पर्धा परीक्षेची तयारी करीत होतो.

दिः 11/12/2024 रोजी सायं, अंदाजे 4:30 वाजता माझा मावस भाऊ नामे अजय गायकवाड यांना त्यांचे कार्यालय कृषी अधीक्षक ऑफिस पेडगाव रोड येथे घेवून येण्यासाठी माझी मोटर सायकल पल्सर एमएच -22, AE-3257 या मोटरसायकलने निघाले असता अंदाजे 4:45 ते 5:00 च्या दरम्यान पोलीस अधिक्षक कार्यालयामार आलो असता, त्या ठिकाणी बाहेर रोडवर पोलीसांची व्हॅन उभी होती. त्या व्हॅनमधुन एक पोलीस आला व त्यांनी माझी गाडी थांबवली व माझे नाव-गाव विचारले, माझ्या कपाळावर निळा टिळा लावलेला होता, ते पाहून तो म्हणाला हा पण त्याच समाजाचा दिसतो, असे म्हणून मला अर्वाच्च भाषेत जातीवाचक शिवीगाळ केली व म्हणाला हा पण जयभीम चा आहे, याला धरा असे म्हणून, त्याने अचानक पणे त्याच्या हातातील काठीने मला मारहाण करण्यास सुरवात केली. त्या ठिकाणी उभे असलेले 7-8 कर्मचारी माझ्याकडे आले. त्या सर्वांनी त्यांच्या हातातील काठी ने माझ्या दोन्ही दंडावर, हातावर, पाठीवर, कमरेवर, व दोन्ही पायांवर बेदमपणे मारहाण केली.

त्यामुळे माझ्या डाव्या पायाच्या नळीवर जखम होवून नस तूटली. व रक्तस्त्राव झाला. त्यानंतर मला त्यांनी पोलीस अधिक्षक कार्यालयाच्या समोर असलेल्या झेंड्याच्या ओट्यावर बसविले. त्या ठिकाणी परत ४-५ पोलीस वाल्यांनी माझ्या डाव्या पायाच्या नळीवर जोरजोरात मारहाण केली. त्यामुळे माझ्या पायातून जास्त प्रमाणात रक्तस्त्राव होत होता. मला असंख्य वेदना होत होत्या मी जोरजोरात रडत होतो. मला मारहाण करणाऱ्या पोलीसांनी त्या ठिकाणी उभ्या असलेल्या पोलीस कर्मचारी म्हणाला बांगर याला गाडीत टाका. आणि पोलीस स्टेशनला घेवून जा.

त्यानंतर बांगर नावाचा पोलीस कर्मचारी माझ्या जवळ आला तो मला म्हणाला चल गाडीत बस. मला चढता येत नसल्याने परत मला त्या सर्वांनी मला लाथा बुक्क्यांनी मारहाण केली व मला बळजबरी गाडीत बसविले व माझ्या Vivo V २९ कंपनीचा मोबाईल त्याची किंमत 45000 हजार, हा हिसकावून घेतला आणि माझी मोटरसायकल S.P. ऑफिस समोर लावली. व मला

जिपमध्ये बसवून मोंढा पोलीस स्टेशनला घेऊन आले, मल जिपमधुन उतरता येत नसल्यामुळे त्यांनी मला लाथा घालुन खाली पाडले. व जिपमध्ये असलेला पोलीस कर्मचारी त्याच्या खांद्यावर दोन स्टार होते. त्या पोलीस कर्मचा-याने मला परत मारहाण केली. मी त्यांना विनवण्या करत होतो. कि मी well educated आहे, माझ्या परिक्षा आहेत, माझे करीयर खराब करु नका, त्यावेळी गाडीसोबत असलेला बांगर नावाचा कर्मचारी म्हणाला तु मादरचोद तु तोंडावरून तर आतंकवादी दिसतोस असे म्हणाला.

त्यानंतर मला लॉकअप कडे घेवून जावू लागले, व त्यांनी मला बळजबरी लॉकअप मध्ये टाकले. त्या लॉकअप मध्ये सोमनाथ व्यंकट सूर्यवंशी हा देखील होता. त्याच्या अंगावर भरपूर मारहाणीच्या जखमा होत्या. त्यांनी त्याच्या शरीरावरच्या जखमा व मार मला दाखवला. तो अस्वस्थ वाटत होता. मला पोलिसांनी केलेल्या मारहाणीमुळे माझ्या पायातून रक्तस्त्राव होत होता. आणि खुप वेदना होत होत्या. त्या स्थितीत मला पोलिसांनी १ ते १ १/२ तास मला पोलीसांनी काही कारण नसताना मला १ ते 2 तास पोलीस लॉकअप मध्ये डांबून ठेवले. मला चकरा येत असल्यामुळे मी अस्वस्थ होत होतो. ते पाहून मला पोलीस त्यांच्या जिपमध्ये टाकून सरकारी दवाखाना येथे घेऊन गेले. त्या ठिकाणी हजर असलेल्या डॉक्टर ने माझी तपासणी करून माझ्या डाव्या पायाला प्लास्टर केले होते मी सरकारी दवाखान्यात 13/12/२०२४ पर्यंत उपचार घेतला. मला मारहाणीमुळे होणाऱ्या वेदना कमी होत नसल्यामुळे मी दवाखान्यातून सुट्टी घेतली व घरी आलो.

त्यानंतर 16/12/202४ रोजी खाजगी दवाखाना सुश्रुत हॉस्पीटल येथे ईलाज केला. माझ्या मनात पोलीसांची भिती होती. त्यामुळे मला फिर्याद दाखल करण्यास विलंब झाला. तरी दि. 11/12/2024 रोजी सायंकाळच्या ५ च्या दरम्यानच्या पोलीस अधीक्षक कार्यालया समोर व मोंढा पोलीस स्टेशनच्या समोर मारहाण करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर योग्य गुन्हा नोंद करावा.

हि विनंती.

टीप :- सदरची घटना पो. अधीक्षक व नवा मोंढा पो. स्टे. सीसीटीव्ही ची सखोल चौकशी करून संबंधितांवर गुन्हा नोंद करा.

प्रति,

माननीय जिल्हा पोलीस अधीक्षक,
परभणी

फिर्यादी

नाव : धम्मदीप जनार्धन मोगले

दिनांक :- १९/१२/२०२४

प्रति,

मा. जिल्हा पोलीस अधीक्षक साहेब

जि. पो. अधीक्षक कार्यालय परभणी

**विषय : मोंढा पोलीस स्टेशन परभणी येथे कार्यरत असलेले API श्री बंदखडके यांनी माझ्यावर गंभीर गुन्हाची नोंद करतो अशी धमकी दिल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करणे बाबत.**

महोदय,

वरील विषयास अनुसरून आपल्याकडे अतिनम्रपणे तक्रार करण्यात येते की, मी दि. १९/१२/२०२४ रोजी पोलीस स्टेशन मोंढा या ठिकाणी मला दि. ११/१२/२०२४ रोजी, पोलिसांनी मारहाण करून गंभीर स्वरुपाच्या जखमा केल्या होत्या, या संबंधी लेखी फिर्याद घेऊन गेलो होतो, त्यावेळी माझ्या सोबत आलेले सिद्धार्थ भरोडे, व इतर यांच्या समोर पोलीस स्टेशनमध्ये हजर असलेले API हे मला म्हणाले तू पोलीस विरुद्ध का तक्रार देतो, तुझ्यावर मोठी केस करून, तुला जेल ची हवा दाखवतो, अशी धमकी दिली. त्यामुळे मला धमकी देणारे पोलीस अधीकारी बंदखडके यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

तक्रारदार

नाव - धम्मदीप जनार्दन मोगले

पत्ता - आरोग्य नगर, कोरेगाव रोड, परभणी

दि :- 9/12/2024

प्रति,

पोलीस निरिक्षक साहेब,

पोलीस स्टेशन नवा मोंढा,

परभणी

**विषय: माझे वडील नामे विजय दशरथ वाकोडे यांच्या मृत्यूस कारणीभूत असलेले पोलीस निरिक्षक शरद मरे, तुरणर आणि अशोक घोरभांड (रथानीक गुन्हे शाखा) यांच्या विरुध्द अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदयान्वये योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.**

महोदय,

वरिल विषयास अनुसरून सविनय अर्ज सादर करण्यात येते की, मी आशिष विजय वाकोडे रा. राहुल नगर, परभणी येथील रहिवासी असून माझे वडील विजय दशरथ वाकोडे हे रिपब्लीकन सेनेचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष होते. तसेच ते परभणी जिल्हयातील दलित चळवळीचे ज्येष्ठ नेते होते, तसेच वरील अधिकाऱ्यांना माझे वडील व माझी जात माहित आहे. तसेच त्यांना हे देखील माहीत की, मी व माझे वडील हे अनुसूचित जातींतील महार या जातीचे आहोत.

दि. 10/12/2021 रोजी परभणी येथे जिल्हाधिकारी कार्यालय समोरील डॉ. बाबासाहेव आंबेडकर यांच्या पुतळया समोरील संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना झाली होती व त्याबाबत नवा मोंढा परभणी येथे गुन्हा देखील नोंदवला आहे व या घटनेबाबत निवेदने नोंदविण्या व शांततापुर्ण निषेध करण्याकरिता दि. 11/12/2024 रोजी परभणीतील जनता हे निवेदने देण्याकरिता जनतेने मोर्चा काढला होता. तसेच माझे वडील विजय दशरथ वाकोडे हे देखील निवेदन देण्याकरिता सकाळी 11:00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे गेले होते व निवेदने घेऊन माझे वडील घरी परत आले होते. त्यानंतर दुपारी 01:00 वाजताच्या सुमारास काही अज्ञात समाजकंटकानी दुपारी 01:00 वाजण्याच्या सुमारास तोंडावर रूमाल बांधून व ओळख लपवून परभणी शहरात जागोजागी दगडफेक व जाळपोळ केलेली आहे.

त्या घटनेबाबत माझ्या वडीलांना व इतर सामाजीक कार्यकर्ते व पुढारी यांना स्वतःहुन पोलीस व प्रशासनाने सदरील परिस्थिती आटोक्यात आणण्याकरिता संपर्क केला व विनंती केली की, आपणच सदरचे परिस्थिती हाताळावी व शासनाची तथा पोलीस प्रशासनाला मदत करावी या प्रशासनाच्या विनंती वरून सदर माझे वडील व इतर पुढारी यांनी स्वतः रस्त्यावर येवून सर्व जणांची समजुत काढण्याची आतोनात प्रयत्न केले, त्यामध्ये माझे वडील विजय उर्फ बाबा वाकोडे यांच्यावर सुध्दा काही समाजकंटकांनी रॉड भिरकावला सुदैवाने तो रॉड त्यांच्या बाजुला उभा असलेल्या राहुल घनसांवत यांच्या डोक्यात लागला व ते जखमी झाले, त्यावेळेस आपल्या पोलीस

प्रशासनाचे अधिकारी अतिरिक्त तथा प्रभारी पोलीस अधिक्षक यशवंत काळे साहेब हे देखील तेथे उपस्थित होते अशा तऱ्हेने माझे वडील व इतर पुढारी यांनी स्वतचा जीव धोक्यात घालून रस्त्यावर येवून प्रशासनाची मदत करून सुध्दा फक्त सूडबुद्धीने सर्व परिस्थिती माहित असून सुध्दा नवा मोंढा पोलीस स्टेशन येथे दि. 11/12/2024 रोजी गु.र.नं. 590/2024 हा दाखल झाला असून सदरील गुन्हयांमध्ये माझ्या वडीलांना आरोपी क्रं. १ म्हणून नमुद केले आहे.

त्यानंतर सदरच्या गुन्हयातील आरोपी यांना बेकायदेशीररित्या कोंबीगद्वारे आणि अत्यंत अमानुषपणे मारहाण करत घरात घुसून महिला व मुला-मुलींना मारहाण करत अटक करण्यात आले यामुळे या घटनेचे तीर्व प्रतिसाद हे संपुर्ण महाराष्ट्रभर दिसून आले व सदर घटनेमध्ये माझे वडील वाकोडे बाबा हे पुर्णपणे संपुर्ण झालेल्या अन्यायविरोधात उभा टाकलेल्या या लढयाचे नेतृत्व करत होते. त्यामध्ये असे दिसून आले की, सदरचे अत्याचार हे मुख्यतः पोलीस अधिकारी शहाजी उमाप, पोलीस निरिक्षक शरद मरे, पोलीस अधिकारी तुरणर व अशोक घोरबांड (स्थानिक गुन्हा शाखा पो.नि.) यांनी व यांच्या सांगण्यावरून इतरांनी केले. यावरून वरील नमुद अधिका-यांना विरोधात आंदोलनात नाराजीचा सुर वाढला व त्याचबरोबर या लढ्याला तसेच लढयाचे नेतृत्व करत असलेल्या वाकोडे बाबांना सदर अधिकाऱ्यांनकडून अटकेच्या व मारहाणीच्या वारंवार धमक्या येवू लागल्या.

त्यानंतर दि. 14/11/2024 रोजी रात्री माझे वडील घरी आले असतांना माझ्या वडीलांनी आम्हाला सांगितले की, अशोक घोरबांड, तुरणर व पो. नि. शरद मरे हे त्यांना धमक्या देत आहेत की, तुम्ही जास्त नाटके करू नका व जास्त भाषणे झाडू नका अन्यथा तुम्हाला व तुमच्या मुलाला दि. 11/12/2024 रोजी झालेल्या घटनेबाबत दाखल झालेल्या तक्रारी मध्ये आरोपी करेल व तुमची जामीन आम्ही कोर्टातून होवू देणार नाहीत तसेच तुम्हा बाप लेकरास पोलीस कस्टडी काय असते हे सुध्दा दाखवून देताल. तेंव्हापासून माझे वडील हे बैचेन व अस्वस्थ राहु लागले.

दि. 15/11/2024 रोजी सकाळी 8:30 ते 9:00 च्या सुमारास माझ्या वडीलांना सोमनाथ सुर्यवंशी यांचा जेलमध्ये मृत्यु झाले आहे याबाबत माहिती कळाली असता, माझे वडील सरकारी दवाखाना, परभणी येथे गेले होते व त्यानंतर त्यांनी सोमनाथ सुर्यवंशी यांचे शवविच्छेदन हे औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे करणे बाबत माननीय जिल्हाधिकारी, परभणी यांना निवेदन दिले होते. हा पाठपुरावा करतांनी सुध्दा आपले वरील पोलीस अधिकारी वेगवेगळ्या मार्गाने माझे वडील वाकोडे बाबा यांना भिती घालत होते.

दि. 16/12/2024 रोजी माझ्या वडिलांसोबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या जवळ गेलो असता, तेथे सुध्दा दोन अनोळखी इसम हे आम्हाला भेटण्याकरिता आले व ते माझ्या वडीलांना म्हणाले की, आम्हाला अशोक घोरबांड यांनी पाठविले आहे व आम्ही पोलीस कर्मचारी साहेबांचा निरोप घेवून आलोत ते असे म्हणाले की, सोमनाथ सुर्यवंशी हा मारहाणीमुळे मयत झालेला आहे हे तुम्हाला माहित नाही का? व आता सदरचे प्रकरण तुम्ही जास्त उचलून धरू नका.

जर का सदरच्या प्रकरणात तुमचा हस्तक्षेप वाढला तर तुम्हाला त्याचे वाईट परिणाम भोगावे लागतील आणि सोमनाथ सुर्यवंशी यांच्या अंत्यविधीनंतर आम्ही तुम्हाला व तुमच्या मुलाला अटक करून पी.सी.आर. काढणार आहोत.

त्या दिवशी दुपारी छ.शिवाजी महाराजांच्या पुतळ्या शेजारील मैदानावर भिम अनुयायी व इतर सामाजबांधवानी व सर्व नेत्यांनी सोमनाथ सुर्यवंशी यांच्या झालेल्या हत्येप्रकरणी निवेदन व धरणे आंदोलन केले, त्यामध्ये माझे वडील वाकोडे बाबा यांनी त्यांची भुमिका स्पष्ट केली व दोषी पोलीस अधिकारी तथा कर्मचारी यांना शिक्षा व्हायला पाहिजे अशी भुमिका मांडली. सदरील सभेनंतर आम्ही सर्वजण शहीद सोमनाथ सुर्यवंशी यांच्या अंत्येविधीच्या कार्यक्रमासाठी गेलो.

शहीद सोमनाथ सुर्यवंशी यांच्या अंत्येविधीचा कार्यक्रम आटोपून जेंव्हा मी घरी आलो तेंव्हा माझे वडील वाकोडे बाबा हे मला अत्यंत अस्वस्थ दिसले, त्यावरून भी त्यांना कारण विचारले असता, त्यांनी मला सांगितले की, पोलीस अधिकारी शहाजी उमाप, पोलीस निरिक्षक शरद मरे, पोलीस अधिकारी तुरणर व अशोक घोरबांड (स्थानिक गुन्हा शाखा पो.नि.) यांनी त्यांना खुप धमक्या दिल्यामुळे ते चिंताग्रस्त व घाबरलेले आहेत.

वरील अधिकारी आपल्याला सोडणार नाहीत व माझ्या सुध्दा जिवाचे काहीतरी बरे वाईट करतील असे माझे वडील म्हणाले तसेच पुढे मी त्यांना समजावून सांगितल्यानंतर त्यांनी मला म्हणाले की, आशिष तुझ्या सुध्दा जिवीतास वरील लोकांपासून धोका आहे, यामुळे मला जास्तच चिंता वाटत आहे.

वरील सर्व लोकांच्या दाब दडपणामुळे माझे वडील वाकोडे बाबा हे खुपच अस्वस्थ झाले, त्यामुळे मी त्यांना डॉ. रसाळ साहेब यांच्या अनन्या हॉस्पीटल येथे नेले, त्यांना हृदय विकाराचा तीव्र झटक्याने माझे वडील मयत झाले. परंतू सदरचा माझ्या वडीलांच्या मृत्युस वरील अधिकारी हे कारणीभुत आहेत. माझ्या वडीलांचा मृत्यु हा नैसर्गिक नसून तो केवळ वरील अधिकाऱ्यांच्या दमदाटीमुळे व भितीपोटी त्यांनी घातलेल्या धमक्यांमुळे झाला असून वरील अधिकाऱ्यांनी अशा रितीने केवळ माझे वडील हे मागासवर्गीय असल्यामुळे व ते मागासवर्गीयांचे सदरचा लढ्याचे नेतृत्व करत होते. म्हणून वरील अधिकाऱ्यांविरोधात अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदयाअंतर्गत व सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा ही विनंती.

अर्जदार

आशिष विजय वाकोडे रा. राहुल नगर, परभणी

**Complaints of Vijayabai Suryawanshi filed between December 18-December 27, 2024**

दिनांक: २५.१२.२०२४

प्रति,

माननीय विशेष पोलीस उपमहानिरीक्षक,
पोलीस उपमहानिरीक्षक परिक्षेत्र कार्यालय, नांदेड.

**मार्फत : माननीय पोलीस अधिक्षक साहेब, परभणी.**

**विषय : सोमनाथ व्यंकट सुर्यवंशी यांना मोंढा पो.स्टे. परभणी यांच्या मारहाणीमुळे कोठडीत झालेल्या मृत्युसंबंधी संबंधीत पोलीस अधिकारी व कर्मचा-यांवर तात्काळ सदोष मनुष्य वधाचा गुन्हा नोंद करणे बाबत.**

संदर्भ : दिनांक १८.१२.२०२४ रोजीची माझी फिर्याद.

महोदय,

वरील विषयास अनुसरुन सेवेत विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, माझा मुलगा सोमनाथ व्यंकटी सुर्यवंशी रा. शंकरनगर, परभणी हा येथे मागील तीन वर्षापासून कायद्याचे शिक्षण घेत होता.

दिनांक १५.१२.२०२४ रोजी परभणी पोलीसांनी मला सकाळी अंदाजे ०९.०० वाजता फोन करुन माझा मुलगा सोमनाथ मरण पावला असून बॉडी घेवून जाण्यासाठी परभणीत येण्याचे कळविले.

मी माझ्या ईतर नातेवाईकासह परभणीत आल्यानंतर परभणी पोलीसांनी माझ्या मुलाचे प्रेत छत्रपती संभाजीनगर येथे पी एम साठी नेल्याचे सांगीतले. माझ्या मुलाच्या पी.एम. नंतर त्याचा मृत्यु हा त्याला झालेल्या मारहाणीमुळे झाल्या बाबत मला सांगीतले व तसे प्रमाणपत्र दिले.

मी अधिकची चौकशी केली असता मला समजले की, माझ्या मुलाला त्याचा काहीही गुन्हा नसतांना मोंढा पोलीसांनी अटक करुन त्याची पोलीस कोठडी घेवून त्याला जबर मारहाण केली, त्यामुळे माझ्या मुलाचा मृत्यु झाला आहे.

मुलाचा अत्यंविधी झाल्यानंतर मी दिनांक १८.१२.२०२४ रोजी मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, परभणी तसेच मा. पोलीस निरीक्षक, मोंढा पोलीस ठाणे परभणी यांच्याकडे माझ्या निरपराध मुलाला जबरदस्तीने पकडून नेवून, मोंढा पोलीसांनी जबरी मारहाण केल्यामुळे त्याचा मृत्यु झाल्यामुळे सर्व संबंधीत पोलीसांच्या विरुध्द तात्काळ सदोष मनुष्य वधाचा गुन्हा नोंद करावा म्हणून मी अर्ज सादर केलेला आहे, परंतू अद्याप पावेतो संबंधीत पोलीसांच्या विरुध्द कोणताही गुन्हा नोंद केलेला दिसत नाही. यावरुन माननीय पोलीस अधिक्षक परभणी व माननीय पोलीस निरिक्षक, नवा मोंढा परभणी हे जाणीवपूर्वक पोलीसांच्या विरुध्द गुन्हा नोंद करण्यास टाळाटाळ करीत आहेत असे दिसते.

तरी माझ्या मुलाच्या मृत्युस जवाबदार असणा-या सर्व पोलीस अधिकारी व कर्मचा-यांविरुध्द तात्काळ सदोष मनुष्य वधाचा गुन्हा नोंद करण्याचे संबंधीत अधिकारी/कर्मचा-यांना आदेश द्यावेत ही नम्र विनंती.

**सोबत :**

१. माननीय पोलीस अधिक्षक, परभणी यांना दिलेल्या अर्जाची प्रत.
२. माननीय पोलीस निरीक्षक, मोंढा पोलीस ठाणे, परभणी यांना दिलेल्या अर्जाची प्रत.

**अर्जदार**

(विजयाबाई भ्र. व्यंकट सुर्यवंशी)

**याची प्रत**

१. माननीय मुख्यमंत्री तथा गृहमंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई
(मार्फत मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी.)

२. माननीय राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, नई दिल्ली.
(मार्फत: माननीय जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी.)

यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर.
जिल्हा पोलिस अधिक्षक साहेब वरवली
दि. २७/१२/२०२४

**विषय:- मोंढा पोलीस ठाण्यातील गु. र. नं. ५९०/२०२४ मध्ये अटक करून जातीवरून पोलीस ठाण्यात केलेल्या मारहाणीमुळे संबंधित पोलिसांवर कारवाई करणे बाबत.**

महोदय, वरील विषयास अनुसरून आपणांस विनंती

अर्ज सादर करणात येत की मोंढा पोलिस ठाणे परभणी यांनी दि. ११/१२/२०२४ रोजी मला भीमनगर रॉड जवळ मी बहिणीला परिक्षावरून घेवून येण्याकरिता जात असताना मला थांबवले आणि विचारले कुठ जात आहे. त्यांना मी सांगितले मी बहिणीला आणण्यासाठी जात आहे. त्यांनी मला विचारले मोर्चा मध्ये होता काय. मी त्यावर नाही म्हणालो. मग ठीक आहे, जा, असे त्यांनी मला सांगितले. तर दुसऱ्या पोलिसाने सांगितले टाक रे याला पण आत मध्ये हा पण तोच आहे तेथून घेऊन जाताना मला त्यांनी गाडीपर्यंत लाकडी काठ्याने मारत नेले. गाडीत बसलो तेव्हा 7-8 जण अगोदर पकडलेले होते. नंतर गाडी चालू केली आम्हाला जातीवाचक शिवीगाळ केली, हे महार बाराचे आहेत असे म्हणत होते. या मध्ये महिला पोलिस देखील शिव्या देत होत्या.

नंतर आम्हाला नवा मोंढा पोलिस ठाणे येथे नेऊन त्यांनी बंद करून ठेवले. आणि एक-एक जणांना बोलावून कैमेरा नसलेल्या रूम मध्ये नेऊन मारत होते. यामध्ये तूर्नर, पठाण, घोरबांड हे यांनी लाकडी मूठ असलेल्या पट्ट्याने, लाकडी बांबूने, प्लॅस्टिकच्या काठीने मारहाण केली. याच कारणाने आमच्या सोबत असलेला L.L.B. T.Y. चा विद्यार्थी सोमनाथ सुर्यवंशी याचा मृत्यू झाला आहे. आम्हाला आणखी देखील शौचालयास बसण्यासाठी अडचण येते व चालण्यासाठी देखील त्रास होत आहे.

अजुनही आमच्यावर उपचार चालू आहेत. आम्ही सुशिक्षित असल्याचे पाहून आमचे आयुष्य खराब केले गेले आहे. याने माझे मनोबल खचले गेले आहे.

तरी वरील सर्व पोलिसांवर योग्य कार्यवाही करावी ही आपणास नम्र विनंती.

अर्जाच्या सोबत
1) वैद्यकिय दाखला

आपला विश्वासु

रमेश बाबुराव गोरे

जि. परभणी.

दि. २७-१२-२०२४

प्रति

मे. जिल्हा पोलीस अधीक्षक, परभणी,

**विषय :- पो. ठा. मोंढा परभणी, येथील गु. र क्र. 590/2024 मध्ये अटक करून जातीवचक शिविगाळ करून जबरी मारहाण करणाऱ्या पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्या बाबत.**

महोदय,

वरिल संदर्भ विषयी तक्रार निवेदन सादर करण्यात येते कि दि. ११/१२/२०२४ रोजी मी आशिष लिंबाजी बनसोडे हर्ष नगर, हडको येथील अजून मला ११/१२/२०२४ रोजी घरी जाता वेळेस S.P. ऑफिस जवळ पकडले आणि माझ्यावर मारहाण करण्यात आली. 20 ते 25 LCB वाल्यानी माझ्यावर मारहाण केली आणि मला पकडण्याचे कारण होते की गळ्यात निळा रूमाल होता म्हणून पकडले त्यानंतर मला पोलीस गाडीमध्ये टाकले त्यामध्ये मला पकडण्यासाठी पोलीस कर्मचारी सह घोरभांड होते.

तेव्हा सदर पोलीस कर्मचारीसह, घोरभांड यांनी मला पोलीस गाडीत टाकुन भिनग परिसरात घेवून गेले. तेथिल काही लोकांच्या घरात घुसून दोषी असल्याची चौकशी न करता बिनअपराध लोकांना कोम्बिंग ऑपरेशन करून अमानुष अशी मारहाण केली. तेव्हा तेथील पाच महिला तरुणींची लज्जास्पद असा छळ करून आम्ही असलेल्या गाडीत त्यांना पण टाकले. तेथुन आम्हाला पो. ठा. नवा मोंढा या ठिकाणी घेवून आले आणि आम्हाला सर्वांना लॉकअप टाकले. त्यानंतर एक एकाला बोलवून मारू लागले, मला त्या पोलीस कर्मचारी तोर्णर साहेबांनी बोलवले आणि माझ्यावर मारहाण चालु केली त्यांनी मारत असताना घरच्यांनवर आणि जातिवर शिव्या दिल्या. त्यारूममध्ये ५ ते ६ जण मला मारण्यासाठी होते. त्या सर्वांनी मला मारहाण केली मला म्हणत होते बाप म्हण बाप पोलिवाले आम्ही तुमचे बाप आहोत. मला त्यांनी मारून  मारून बळजबरी बाप म्हणायला लावले त्यांनंतर त्यांनी मला सोडले रूम च्या

बाहेर आणि दुसऱ्याला बोलवले त्यांना पण मारहाण केली 2 ते 3 जणांना मारल्यानंतर परत मला तोर्णर साहेबांनी आत नेल आणि परत मारहाण केली आणि मारत मारत बोलत होते तुमच्या घरात खायला भाकरी नाहीत आणि अन एवढ काढून माजल्यावानी करता महाराचे हो अस लेडीज कॉन्स्टेबल म्हणली आणाव का तुमच्या घरच्या माया बहिणीला अस बोलत होती.

त्यानंतर मला मारहाण करून परत रूमच्या बाहेर बसवले आणि बाकीच्यांना मारले. आम्हाला सुर्यवंशी सांगत होता की हे आपल्याला खूप त्रास देत आहेत मी पण एक वकिलच आहे मला कायदा माहित आहे आपण बाहेर गेल्यावर कार्यवाही करू तर तेवढ्यात तुर्णर साहेब व त्यांच्याभोवत पठाण या दोघांनी आम्हाला सांगत असलेल्या सूर्यवंशी च बोलण ऐकून त्याला बोल्ले ए चल उठ तु अस बोलून त्याला एका रूममध्ये परत बोलवले आणि मारहाण केली व मारहाण करत असताना सूर्यवंशी चा आवाज आम्हाला येत होता.

अस आम्हाला रात्रभर मारत होते न जेवायला देता न पाणी देता खुप मारत होते आणि जातिवाचक शिवीगाळ करत होते. मध्य रात्रीच्या सुमारात पोलिस कर्मचाऱ्यानी सरकारी दवाखान्यातला कर्मचारी 2 ते 3 जण बोलविले. आणि आम्हाला तपासायला एक एक जणांना बोलवत होते. सर्वांना तपासून झाल्यावर काही जणांना एक्सरे साठी सांगीतले आणि मला मोठ्या गाडीत बसवले तेव्हा रात्री मला नानलपेठ या ठिकाणी घेऊन गेले. तर आम्हाला दुसऱ्या दिवशी त्या ठिकाणी जेवण दिले.

त्याच दुसऱ्या दिवशी आम्हा सर्वांना व मला दुपारी न्यायालयात धरून गेले आणि गाडीत जात असताना आम्हाला असे सांगीतले की जर कोणी मारहाण केली शिविगाळ केलेल अस कोणी जर सांगितल तर परत आम्ही २ दिवसांचा PCR काढून परत मारू अशी धमकी दिली आणि अजून अशी एक धमकी दिली की तुमच्या मुळे 2 पोलिस कर्मचाऱ्यांचा जीव गेला आहे आणि ४ लेडिज गंभीर अवस्थेत दवाखान्यान ॲडमिट आहेत अस आम्हाला सांगितल आहे. म्हणून आम्ही न्यायालयात मारहाण झालेली काहीच सांगीतल नाही. तेथुन आम्हाला परत नानल पेठ या ठिकाणी परत आणले. आणि सरकारी आम्हाला तपासायला आणले तेथून मला व माझ्या सोबतच्यांना परभणी जिल्हा कारागृह येथे घेऊन गेले.

तेथून आमच्यासोबत सुर्यवंशी आणि सर्व जण सोबत होतो. आम्ही सुर्यवंशी अंदाजे 12 ते 1 पर्यंत बोलत बसलो होतो नंतर आम्ही झोपलो. अचानक मध्य रात्री मला गोंधळाचा आवाज ऐकू आला मी उठल्यावर अस पाहिल की सोमनाथ ला खुप त्रास होत होता. तो सांगत होता मला श्वास घेता येत नाही. छाती दुखत आहे. आणि आमच्यातले काही जण त्याचे हात पाय घासत होते आणि तिथल्या कर्मचाऱ्यांनी सोमनाथला एक गोळी दिली सोमनाथ ने गोळी घेतली व म्हणाला मला जरा बर वाटत आहे मी आराम करतो तो आराम करत होता याणि आम्ही सुध्दा तेवढ्यात काही वेळानंतर परत आवाज ऐकू आला आणि मी उठलो पाहिल तर सोमनाथ काहीच बोलत नव्हता त्याच अंग आकडुन गेल होत काही वेळानं तेथील कर्मचारी सोमनाथला पहाटेच्या सुमारात घेऊन गेले व आम्ही सर्व जण झोपलो. दुसऱ्या दिवशी आमच्यातला सोमनाथ आम्हाला सोडून गिला.

सोमनाथचा जीव त्या पोलीस कर्मचाऱ्यांमुळे गेला कारण सोमनाथला खूप मारले होते या पोलिस आरोपींना सजा झालीच पाहिजे. हि माझी कळकळीची विनंती आहे. मी सुटल्यानंतर माझ अंग दुखत होत. तर मी सरकारी दवाखान्यात गेलो आणि माझी तपासणी झाल्यानंतर तेथील पोलीस स्टेशनला गेलो आणि पोलीस कर्मचारी मला व माझ्या सोबतच्यांना असा म्हणाला की मला तुमचा विषय माहीत आहे तुमचा विषय हा इंटरनैशनल आहे आणि येथुन तुम्ही निघून जा. असं बोलुन आम्हाला बाहेर हाकालवले.

म्हणून प्रशासनाला माझी विनंती आहे कि आम्हाला न्याय मिळावा यात आमची काही चुक नाही हे माझा अर्ज आपण स्विकारावा हि नम्र विनंती.'

वैदकिय दाखला सोबत मा. जिल्हाअधिकारी साहेब जिल्हा कार्यालय परभणी

आपला विश्वासू

आशिष लिंबाजी बनतोडे परभणी

**Satish Bhalerao Jogdand Complaint dated Dec 27 2024 and others**

दि. २७/१२/२०२४

जिल्हा पोलीस अधिक्षक साहेब परभणी

**विषयः मोंढा पोलीस ठाणे येथील गु. र. क्र. 590/2024 मध्ये अटक करून जातीवाचक शिवीगाळ व मारहाण करण्याऱ्या अधिका-यावर गुन्हा दाखल करणे बाबत.**

महोदय:

वरील विषयी अनुसरून आपणांस विनंती अर्ज सादर करण्यात येत आहे की, ११/१२/२०२४ रोजी झालेल्या कोम्बिंग ऑपरेशन मध्ये मी सतीश बाबुराव जोगदंड रा. अशोक नगर मी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या जवळून घरी जात असताना मला काही पोलिसांनी लाकडी वोडे, रॉड, लोखंडी फायबर दांडा यांनी  मला बेदम मारहाण करून पोलीसांच्या गाडी मध्ये बसवून नवा मोंढा पोलिस ठाणे येते नेले. त्या वेळी अनेक लोक त्यांनी तेथे पकडून ठेवले होते. नंतर पकडून ठेवलेल्या लोकांना ते आळीपाळीने कैमेरा नसलेल्या रूम मध्ये नेऊन लाकडी काठी, लाकडी मुठ असलेला पट्टा प्लॉस्टिक बांबूने मारहाण करत होते. यामध्ये तूर्नर साहेब, पठाण साहेब, घोरबांड साहेब, यांनी मरहाण करुन आम्हाला जातीवाचक शिवीगाळ केली.

यामध्ये तुम्ही लोक महाराचे नसून तुम्ही बाराचे आहेत. घरी खायला आहे का ?  तुमच्या बाया रस्त्यावर आहेत, तर तुमच्या पोरी आणा आमच्या पोलिस वाल्याच्या खाली. आणि आमच्या बरोबर असलेला सोमनाथ सूर्यवंशी यांच्या माराने मरण पावला. नंतर त्यांनी आमच्या मेडीकल टेस्ट पोलिस सेशनमध्ये करून अम्हाला नानलपेठ मध्ये घेऊन ठेवण्यात आले. आणि अम्हाला दुसऱ्या दिवशी कोर्टात हजर केले. कोर्टाच्या जवळ सांगितले कोणी विचारलं, मारलं का? तर नाही म्हणून सांगा. नाही तर मग आहे, आणखी मारील. असे अम्हाला सांगितले.

म्हणून आम्ही कोणीही जज साहेबांनी विचारले तुम्हाला मारले का? तर आम्ही भीती पोटी, आम्हाला नाही मारले असे सांगितले. आणि आम्हाला परत नानलपेठ ला नेऊन बंद केले. बंद

करून आम्हाला दुसऱ्या दिवशी कोर्टात हजर करून आम्हाला वापस नेऊन तिथे मेडीकल करून आम्हा सर्वांना जिल्हा कारागृह येथे नेले. आमच्या सोबत सोमनाथ देखील होता. आणि त्याच रात्री तो खूप घाबरलेला होता. आणि सकाळी त्याचे हातपाय थंड झाल्याने आम्ही तेथील लोकांना सांगितले नंतर त्याला दवाखान्यात नेण्यात आले. व आम्हाला दुसऱ्या दिवशी समजले, तो वारला. नंतर आम्ही बाहेर आल्यावर आम्ही दवाखान्यात गेलो तर आमचा इलाज करण्यास देखील नकार दिला होता.

तरी साहेबांनी योग्य न्याय द्यावा हि आपणास नम्र विनंती
आपला विश्वासु

सतिश बाबुराव जोगदेड
रा. अशोक नगर, परभणी

दि: २६/१२/२०२४

प्रति,

पोलीस निरिक्षक साहेब पो. ठा. मोंढा (परभणी)
जिल्हा पोलीस अधिक्षक, परभणी,

**विषय :- पो. ठा. मोंढा परभणी येथील गुर क्रः 590/2024 मध्ये अटक करून जातिवाचक शिविगाळ करून जबरी मारहाण करणाऱ्या पोलीस कर्मचारी व आधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्या बाबत.**

महोदय,

वरिल, विषयी तक्रार निवेदन दाखल करण्यात येते की, दि. ११-१२-२०२४ रोजी २:३० ते ३ च्या दरम्यान माझ्या मामासोबत त्यांच्या मुलाची लग्नाची पत्रिका वाटत होतो. पत्रिका वाटून झाल्यावर मी माझ्या घराकडे परत आलो. ३:४० ते ४ दरम्यान घरी येऊन बसलो. यानंतर पोलीसांच्या गाडीचा आवाज येताच मी बाहेर पहायला आलो. बाहेर थांबलेला असताच पोलीसांच्या गाडीतून ५ ते ६ कर्मचारी अचानक माझ्याकडे धावत आले. त्यांना बघून मी खूप घाबरलो मला काहीच कळाले नाही. मी स्वतःला वाचवण्यासाठी मित्राच्या घरात धावत गेलो.

तिथेपण पोलीस कर्मचारी माझ्या मागे आले आणि मला ओढून मारत बाहेर आणताना माझ्या मित्राची आई त्यांच्या पाया पडत होती. त्यांना विनंती करत होती. साहेब सोडा त्याल तो कोणाच्या मदात नसतो. तुम्ही का नेत आहात त्याला. त्याचे तीन छोटे छोटे लेकरं आहेत.

असे म्हणताच त्यांनी माझ्या मित्राच्या आईला, सरक तु बाजुला, नाहीतर तूला पण घेऊन जातो आम्ही, आणि लेडीज पोलिसला त्यांच्यासमोर उभे केले. लेडीज पोलिसांनी त्यांना ओढून बाजूला सरकवलं. सरकतीस का देऊ तुझ्या पायावर दंडे, असे म्हणाले. आणि मला रस्त्यावरून मारत शर्टचे बटन तुटले पंन्टीला पकडले आणि जबरदस्ती व्हॅन मध्ये टाकले. त्यानंतर मी त्यांना म्हणत होतो की साहेब मी कुठल्याही मोर्चा, आंदोलनात शामील नव्हतो. मला जाऊ दया माझी पत्नी आणि तिन मुली घरी आहेत. माझे आई वडील गावाकडे आहेत. माझी पत्नी लेकरं परेशान होतील. असे म्हणताच त्यांनी माझा फोन हिसकावून घेतला. मला एक कॉल सुद्धा करू दिला नाही.

नाही करायचा कॉल, वगैरे. बसतोस का तोडू तुझे पाय. त्यानंतर त्यांनी भीमनगरात व्हॅन नेली आणि २ ते ३ मुलांना मारत आणले. लोकांच्या घरात घुसून त्यांनी मारहाण केली. आणि २ ते ४ मुली आणल्या. त्यांना व्हॅन मध्ये टाकले आणि त्यांना जेन्ट्स पोलीस पण मारत होते. आणि व्हॅन मध्ये मला व अन्य मुला मुलींना मारत नवीन मोंढा पोलीस स्टेशन मध्ये नेले. तिथे अगोदरच दुसरे मुलं मुली पण होते. ते त्यांना मारहाण करत होते. त्यानंतर आम्हाला तूर्नर नावाचा पोलीस कर्मचारी एकएक करून मारत होता. आणि त्यामध्ये पठ्ठाण नावाचा पोलीस कर्मचारी पण मारत होता. अन्य पोलीस पण होते. व त्यानंतर घोरबांड नावाचा पोलीस आधिकारी पण येऊन मारत होता. मारताना आम्हाला शिवी देत होते. महारडे, धेडगे तुम्हाला आम्ही तोडल्याशिवाय राहणार नाही. तुमची मस्ती जिरवल्याशिवाय आम्ही गप्प राहणार नाही यांच्या हातात लाकडी व स्टील चे दंडे, लाकडी मुठ असलेला पट्टा या साहित्याने मारत होते.

त्यामध्ये सर्वात जास्त मार दिला, अमर सोनकांबळे, होमगार्ड किशोर बोराडे, आणि सोमनाथ सुर्यवंशी, आशिष बनसोडे, भिमराव तलवारे या सर्वांना मार दिला. मारताना ते म्हणत होते तुमच्यामुळे आमचे दोन पोलिस कर्मचारी शहीद झाले. व २ ते ३ सिरियस आहेत. आणि ते आम्हाला तुमची लायकी आहे का? तुमच्या घरात खायला आहे का? असे तूर्नर व पठ्ठाण म्हणत होते. त्यानंतर ते आम्हाला विचारत होते कोणाला भूक लागली का? किशोर बोराडे याने हो म्हणताच त्याला रूममध्ये नेऊन बेदम मारहाण केली, आणि बाहेर येऊन विचारत होते कशी लागली खिचडी. आणि आम्हाला विचारत होते आणखीन कोणाला लागली का? त्यांना भिऊन सर्वजण नाही म्हणत होते.

तसेच ते आम्हाला म्हणत होते, जर तुम्ही बाहेर जाऊन, जज साहेबांना, वकीलांना व मोठ्या अधिकाऱ्याला माराबद्दल सांगीतले तर लक्षात ठेवा. तुमची दोन दिवसाची पोलीस कस्टडी आहे. आणी कोणत्याही कारणाने आम्ही तुमच्या घरच्यांना ही इथे आणून मार देऊ. त्यानंतर आम्हाला नानलपेठ पोलीस स्टेशनमध्ये नेऊन तिथे दोन दिवस नग्न अवस्थेत ठेवले. त्यानंतर आम्हाला मोठ्या जेल मध्ये नेलं. तिथे नेताच त्याच रात्री सोमनाथ सूर्यवंशी ला हॉस्पीटल मध्ये नेण्यात आलं. नंतर आम्हाला कळाले की, सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यु झाला. त्यानंतर आम्ही पाच दिवस जेल मध्ये राहीलो. दुसऱ्या दिवशी आम्ही बाहेर आलो त्यानंतर मी सरकारी दवाखान्यामध्ये माझ्या पायावर लागलेला माराचा उपचार करायला गेलो. उपचार घेऊन मी तिथल्या पोलिस स्टेशन ला गेलो तक्रार दाखल करायला.

तिथे मला कुठल्याही प्रकारच सहकार्य नाही मिळालं. तिथे मला म्हणत होते, तुम्ही या विषयाला इंटरनेश्नल विषय केलात. यांच्या अशा वागण्यामुळे मला माझ्या घरच्यांना खुप त्रास झाला. माझ्या घरी माझी पत्नी व तीन छोट्या मुली आहेत. त्यांना मी नसताना  मानसिक त्रास झाला. त्यांची परेशानी झाली. त्यांची खाण्याची सुध्दा सोय झाली नाही.

ज्यांच्यामुळे हे झाले अशा पोलिसांवर कठोर शिक्षा व कारवाही झाली पाहीजे.

सोबत.
वैद्यकीय दाखला
प्रति लिपी
माननीय अधिकारी साहेब
जिल्हा कार्यालय परभणी.


आपला विश्वासु
सतीश रमेश भालेराव
परभणी

## Annexure 5

Links to media reports and videos



***A man's back after brutal beating***



***A brusied leg***



***A female victim of brutality with a swollen arm***



***A bruised and swollen hand***



***Cuts and bruises on a man's arm***

# VIDEOS



***CCTV shows police beating a woman in Parbhani for allegedly recording their entry into Dalit Basti (Courtesy: The Wire)***

***Link: [https://www.youtube.com/watch?v=41xoyn1RHyQ](https://www.youtube.com/watch?v=41xoyn1RHyQ)***



***VIDEO - Police destroying vehicles during combing***

***Link:***
***https://x.com/deepali_writes/status/1867479889798123737***

